# तृतीय वर्ष कला

## सत्र - V (CBCS)

## अभ्यासपत्रिका – IX

## भारतातील निवडणूक राजकारण

# भारतातील निवडणूक प्रक्रिया

## विषय कोड : 97186

© UNIVERSITY OF MUMBAI

**डॉ. सुहास पेडणेकर**
कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक रविन्द्र कुलकर्णी**
प्रभारी कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवर**
संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था
मुंबई विद्यापीठ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| **कार्यक्रम समन्वयक** | : | **प्रा. अनिल आर बनकर**<br>**सहयोगी प्राध्यापक**<br>दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई |
| **अभ्यास समन्वयक** | : | **दत्तात्रय म. तोंडे**<br>सहायक प्राध्यापक<br>दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई |
| **संपादक** | : | **डॉ. बालासाहेब चंद्रप्रकाश किलचे**<br>सहायक प्राध्यापक<br>श्रीनाथ कॉलेज ऑफ एज्युकेशन, औरंगाबाद |
| **लेखक** | : | **प्रा. निलेश पाटील**<br>सहायक प्राध्यापक<br>राज्यशास्त्र विभाग, गोगटे-जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी |
| | | **डॉ. बालासाहेब चंद्रप्रकाश किलचे**<br>सहायक प्राध्यापक<br>नाथ कॉलेज ऑफ एज्युकेशन, औरंगाबाद |

**सप्टेंबर २०२२, मुद्रण - १**

**प्रकाशक**
**संचालक, दूर आणि मुक्त अध्ययन संस्था.**
मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई- ४०० ०९८.

**अक्षर जुळणी आणि मुद्रण**
**मुंबई विद्यापीठ मुद्रणालय**
विद्यानगरी, मुंबई

# अनुक्रमणिका


| अध्याय क्र. | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | निवडणूक आयोग | १ |
| २ | निवडणूक प्रक्रिया | २१ |
| ३ | निवडणुकांचा इतिहास | ५१ |
| ४ | समूह आणि निवडणूक सहभाग | ६१ |

तृतीय वर्ष कला

सत्र - V (CBCS)

अभ्यासपत्रिका – IX

भारतातील निवडणूक राजकारण

# भारतातील निवडणूक प्रक्रिया

## अभ्यासक्रम

**Module 1: Election Commission**

1.1 Role

1.2 Ensuring free and fair elections

1.3 Maintenance of Law, Order and Security

**Module 2: Electoral Process**

2.1 Representation of the People Act

2.2 Electoral Reforms: 61st Constitution Amendment

2.3 Proposals for Reforms

**Module 3: History of General Elections**

3.1 General Elections: 1952

3.2 General Elections: 1977

3.3 General Elections: 1989 to the present

**Module 4: Group and Electoral Participation**

4.1 Women, Dalits and Tribals

4.2 Minorities

# १

# निवडणूक आयोग

**घटक रचना**


१.१ उद्दिष्टे

१.२ प्रास्ताविक

१.३ विषय विवेचन

१.३.१ निवडणूक आयोग

१.३.२ निवडणुकीला कोण उभे राहू शकते

१.४ निवडणूक आयोगाची भूमिका

१.५ भारतीय संविधानातील निवडणूक विषय तरतुदी

१.६ भारताचे सध्याचे मुख्य निवडणूक आयुक्त व माजी निवडणूक आयुक्त


## १.१ उद्दिष्टे :

"निवडणूक आयोग" या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला पुढील बाबी समजून घेण्यास मदत होईल.

१. निवडणूक आयोग म्हणजे काय हे स्पष्ट करता येईल.

२. निवडणूक आयोगाच्या भूमिका सांगता येतील.

३. निवडणूक आयोगाचे नियंत्रण आणि संचालन प्रक्रियेचे स्वरूप समजावून सांगता येईल.

४. कायदा सुव्यवस्था आणि सुरक्षा या संदर्भातील निवडणूक आयोगाची भूमिका सांगता येईल.

## १.२ प्रास्ताविक:

आधुनिक राजकीय व्यवस्थेत लोकांचा सहभाग वाढवणे गरजेचे आहे. कारण आज लोककल्याणकारी राज्याच्या कार्याची व्याप्ती आणि स्वरूप हे मोठ्या प्रमाणात बदललेले आहे. कायदा,सुव्यवस्था, सुरक्षा ही कामे राजकीय व्यवस्थेत लोककल्याणकारी राज्याला करावी लागतात. एकंदरीतच या सर्व कामांची पार्श्वभूमी पाहता या कामासाठी लोकांचा सहभाग हा मोठ्या प्रमाणात वाढवणे गरजेचे आहे. केवळ लोकांचा सहभाग असून चालत नाही तर त्या लोकसभागाला नियंत्रित करणारी व्यवस्था ही राज्यव्यवस्थेला कार्यान्वित करावी लागते.त्यासाठी प्रातिनिधिक स्वरूपाची लोकशाही व्यवस्था अस्तित्वात आली. प्रातिनिधिक लोकशाही व्यवस्थेत लोकांचे प्रतिनिधी हे लोककल्याणकारी राज्याचे घटक असतात.म्हणून प्रातिनिधिक लोकशाही व्यवस्थेत लोकप्रतिनिधींना अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. मग या लोकप्रतिनिधींच्या स्वरूपाच्या बाबतीत चर्चा करताना लोकप्रतिनिधीची निवड कशी

होते? लोकप्रतिनिधीची निवड करणारी व्यवस्था कोणत्या प्रकारची आहे ?लोकप्रतिनिधी निवड करणाऱ्या व्यवस्थेची कार्यप्रणाली आणि भूमिका ह्या कोणत्या प्रकारच्या आहेत? याविषयी आपल्याला विचारमंथन करण्यासाठी या प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे निवडणूकाकडे पाहावे लागते. भारताच्या वैदिक काळापासून आपल्याकडे निवडणुकीचा मोठा इतिहास आहे.आपल्याकडे निवडणूक पद्धतीचे वेगवेगळे संदर्भ आहेत.आधुनिक प्रातिनिधिक लोकशाहीमध्ये प्रतिनिधी निवडण्याचे साधन म्हणून निवडणुकीचा वापर केला जातो. म्हणून प्रस्तुत प्रकरणांमध्ये आपण निवडणूक आयोग,निवडणूक आयोगाच्या भूमिकांची प्रामुख्याने चर्चा करणार आहोत.

## १.३ विषय विवेचन:

### १.३.१ निवडणूक आयोग:

भारत एक समाजवादी,धर्मनिरपेक्ष,लोकशाही प्रजासत्ताक आणि जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेले राष्ट्र आहे. १५ऑगस्ट १९४७ रोजी आधुनिक भारतीय राष्ट्र अस्तित्वात आले. भारतीय राज्यघटना, निवडणूक कायदे ह्यांचा विचार करता मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका घेण्यासाठी भारताचा निवडणूक आयोग हा भारतातील संघ आणि राज्य निवडणूक प्रक्रियेचे व्यवस्थापन करण्यासाठी जबाबदार आणि स्वायत्त घटनात्मक प्राधिकरण आहे. भारतीय राज्यघटनेने सरकारचे संसदीय स्वरूप स्वीकारले आहे. भारताच्या संसदीय प्रणालीत भारताचे राष्ट्रपती आणि दोन सभागृहे ते म्हणजे राज्यसभा आणि लोकसभा यांचा समावेश होतो. भारत राज्यांचे संघराज्य असल्याने प्रत्येक राज्यासाठी स्वतंत्र राज्य विधानमंडळे आहेत.देशात आंध्र प्रदेश, तेलंगणा, बिहार, जम्मू आणि काश्मीर, कर्नाटक, महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश या सात राज्यांमध्ये विधिमंडळाची दोन सभागृह आहेत. एकंदरीतच भारतातील लोकसभा, राज्यसभा, राज्य विधानसभेच्या निवडणुका आणि देशातील राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपतींच्या निवडणूक प्रक्रियेचे देखरेख, दिशा आणि नियंत्रण भारतीय निवडणूक आयोगाला करावे लागते.भारतीय राज्य घटनेच्या पंधराव्या भागात कलम ३२४ मध्ये भारतीय निवडणूक आयोगाच्या संदर्भात सविस्तर वर्णन करण्यात आलेले आहे.भारतीय निवडणूक आयोग ही घटनात्मक व स्वायत्त संस्था असून निवडणूक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५० रोजी राज्यघटनेच्या कलम ३२४ नुसार करण्यात आली आहे. **रचना:**

निवडणूक आयोग हा मुख्य निवडणूक आयुक्त आणि राष्ट्रपतीनी वेळोवेळी निश्चित करतील तेवढ्या संख्येचे अन्य निवडणूक आयुक्त मिळून बनलेला असतो. मुख्य निवडणूक आयुक्त व अन्य निवडणूक आयुक्त यांची नियुक्ती, संसदेने केलेल्या कायद्याच्या तरतुदींना अधीन राहून राष्ट्रपतीकडून केली जाते.मुख्य निवडणूक आयुक्त हे निवडणूक आयोगाचे अध्यक्ष म्हणून कार्य करतात.सुरुवातीच्या काळात आयोगाकडे फक्त मुख्य निवडणूक आयुक्त होते. सध्या निवडणूक आयोगात मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर दोन निवडणूक आयुक्तांचा समावेश आहे.१६ ऑक्टोबर १९८९ रोजी प्रथमच दोन अतिरिक्त आयुक्तांची नियुक्ती करण्यात आली.परंतु त्यांचा कार्यकाळ १ जानेवारी १९९० पर्यंत अत्यंत कमी होता. त्यामुळे १ ऑक्टोबर १९९३ रोजी दोन अतिरिक्त निवडणूक आयुक्तांची नियुक्ती करण्यात आली.

त्यातून देशात बहुसदस्यीय आयोगाची संकल्पना कार्यरत करण्यात आली.ज्यामध्ये बहुमताच्या आधारावर निर्णय घेतले जातात.

भारतातील निवडणूक यंत्रणेची पदानुक्रमनुसार रचना ही पुढील प्रमाणे सांगता येईल,निवडणूक आयोग, मुख्य निवडणूक अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी, मतदार नोंदणी अधिकारी, बूथ लेवल अधिकारी अशा पद्धतीने निवडणूक आयोग आपले कामकाज करताना दिसून येते.

**भारतातील निवडणूक यंत्रणेची पदानुक्रम जाणून घ्या**




**आयुक्तांची नियुक्ती आणि कार्यकाळ:**

राष्ट्रपती मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्तांची नियुक्ती करतात. सहा वर्षे किंवा ६५ वर्षे वयापर्यंत, यापैकी जे आधी असेल तो कार्यकाळ ग्राह्य धरला जातो.मुख्य निवडणूक आयुक्त व आयुक्तांना भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांप्रमाणे वेतन आणि भत्ते मिळतात.मुख्य निवडणूक आयुक्तांना संसदेद्वारे महाभियोगाद्वारे पदावरून दूर केले जाऊ शकते.आयोगाच्या निर्णयात सर्व निवडणूक आयुक्तांची भूमिका ही समान  असते.

**निवडणूक आयोगाचे मुख्यालय आणि कामकाज:**

आयोगाचे नवी दिल्ली येथे एक स्वतंत्र कार्यालय आहे. ज्यामध्ये सुमारे ३०० अधिकारी आहेत. आयोग आपल्या कामकाजासाठी नियमित बैठका घेऊन आणि देशातील निवडणुकीच्या संदर्भातील कागदपत्रे प्रसारित करून आपला व्यवहार करत असते. तसेच निवडणूक आयोगात दोन किंवा तीन उपनिवडणूक आयुक्त आणि महासंचालक जे सचिवालयातील सर्वात वरिष्ठ अधिकारी आहेत ते आयोगाला मदत करतात. त्यांची नियुक्ती सामान्यतः देशाच्या राष्ट्रीय नागरी सेवेतून केली जाते.

संचालक, प्रधान सचिव,सेक्रेटरी आणि डेप्युटी डायरेक्टर हे उपनिवडणूक आयुक्त आणि महासंचालकांना सहकार्य करतात.आयोगामध्ये कामाचे कार्यात्मक आणि प्रादेशिक वितरण करण्यात आले आहे. त्यामध्ये कार्य विभाग, शाखा आणि वेगवेगळ्या विभागाद्वारे आयोजित केले जाते.प्रत्येक युनिटला प्रभारी विभाग अधिकारी नेमून दिलेले आहेत. नियोजन, न्यायिक, प्रशासन, पद्धतशीर मतदारांचे शिक्षण आणि निवडणूक सहभाग, SVEEP, माहिती प्रणाली, मीडिया आणि सचिवालय समन्वय हे मुख्य कार्यात्मक विभाग आहेत.

राज्य स्तरावर, निवडणूक कामाचे पर्यवेक्षण आयोगाच्या संपूर्ण निगराणीखाली, दिशा आणि नियंत्रणाच्या अधीन राहून, राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याद्वारे केले जाते, ज्याची नियुक्ती संबंधित राज्य सरकारने प्रस्तावित केलेल्या वरिष्ठ नागरी सेवकांमधून आयोगाद्वारे केली जाते.

जिल्हा आणि मतदारसंघ स्तरावर, जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक नोंदणी अधिकारी आणि निवडणूक अधिकारी, ज्यांना मोठ्या संख्येने कनिष्ठ अधिकारी मदत करतात, ते निवडणुकीचे काम करतात. ते सर्व त्यांच्या इतर जबाबदाऱ्यांव्यतिरिक्त निवडणुकीशी संबंधित कार्ये पार पाडतात. निवडणुकीच्या काळात, तथापि, ते कमी-अधिक प्रमाणात पूर्णवेळ आयोगाकडे निवडणूक कार्यासाठी उपलब्ध असतात.

देशव्यापी सार्वत्रिक निवडणुका ज्यावेळी आयोजित केल्या जातात त्यावेळी निवडणुकांचे नियंत्रण आणि संचालन  करण्यासाठी प्रचंड कर्मचारी लागतात. निवडणूक कार्यासाठी लागणारी निवडणूक यंत्रणा निवडणूक आयोगाकडे प्रतिनियुक्तीवर असल्याचे मानले जाते आणि निवडणूक काळात तिचे नियंत्रण, देखरेख आणि शिस्तीच्या अधीन असते.

**निवडणूक आयोगाचा खर्च:**

आयोगाच्या सचिवालयाचा स्वतंत्र अर्थसंकल्प असतो, जो आयोग आणि केंद्र सरकारचे वित्त मंत्रालय यांच्यात थेट सल्लामसलत करून अंतिम केला जातो. तथापि, निवडणुकांच्या प्रत्यक्ष संचालनावरील मोठा खर्च केंद्र व संबंधित घटक राज्याच्या अर्थसंकल्पात दिसून येतो. जर केवळ संसदेच्या निवडणुका होत असतील, तर त्याचा खर्च संपूर्णपणे केंद्र सरकारकडून केला जातो. तर केवळ राज्य विधानमंडळाच्या निवडणुकांसाठी हा खर्च संपूर्णपणे संबंधित राज्याकडून केला जातो. संसद आणि राज्य विधानमंडळाच्या निवडणुका एकाच वेळी घेतल्यास, खर्च केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये समान रीतीने वाटून घेतला जातो.

**कायदेमंडळ व  विधिमंडळ हस्तक्षेपासुन प्रतिबंधित:**

निवडणूक आयोगाची कार्ये पार पाडताना कार्यकारी हस्तक्षेपापासू निवडणूक आयोगाला दूर ठेवण्यात आलेले आहे. सार्वत्रिक निवडणुका असोत की पोटनिवडणुकानिवडणुकांचे वेळापत्रक ठरवण्याची संपूर्ण जबाबदारी ही आयोगची असते. तसेच मतदान केंद्रांचे स्थान, मतदान केंद्रांवर मतदारांची नियुक्ती, मतमोजणी केंद्रांचे स्थान, मतदान केंद्रे आणि मतमोजणी केंद्रांच्या आसपासची व्यवस्था आणि सर्व संबंधित बाबींवर आयोगच निर्णय घेतो.

## १.३.२ निवडणुकीला कोण उभे राहू शकते:

मतदार म्हणून नोंदणी केलेला कोणताही भारतीय नागरिक व कायद्यानुसार अपात्र ठरणार नाही आणि त्याचे वय २५ वर्षांपेक्षा जास्त असेल तर त्याला लोकसभा किंवा राज्य विधानसभेची निवडणूक लढवण्याची परवानगी आहे.राज्यसभेसाठी वयोमर्यादा ३० वर्षे आहे. विधानसभेसाठी उमेदवार ज्या राज्यातून निवडणूक लढवू इच्छितो त्याच राज्यातील रहिवासी असावा. प्रत्येक उमेदवाराला लोकसभा निवडणुकीसाठी २५०००/- आणि विधानसभा निवडणुकीसाठी रु. १००००/- अनामत रक्कम भरावी लागेल.अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींमधील उमेदवारांना यापैकी निम्मी अनामत रक्कम भरावी लागेल. मतदारसंघात मतदान झालेल्या एकूण वैध मतांच्या एक षष्ठांशपेक्षा जास्त मते मिळाल्यास उमेदवाराची अनामत रक्कम परत केली जाते.

एखाद्या मान्यताप्राप्त पक्षाने प्रायोजित केलेल्या उमेदवाराला निवडणूक अर्ज भरताना मतदारसंघातील किमान एका नोंदणीकृत मतदाराने सूचक म्हणून पाठिंबा दिला पाहिजे.तसेच इतर व स्वतंत्र निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत मतदारसंघातील दहा नोंदणीकृत मतदारांनी सूचक म्हणून पाठिंबा दिला पाहिजे.लोकसभा आणि विधानसभेच्या राखीव जागांवरील उमेदवार हे त्याच प्रवर्गाचे असले पाहिजे. राखीव जागांची संख्या ही प्रत्येक राज्यातील अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातींमधील लोकांच्या संख्येच्या प्रमाणात असावी. सध्या लोकसभेत अनुसूचित जातीसाठी ८४ जागा आणि अनुसूचित जमातीसाठी ४७ जागा राखीव आहेत. निवडणूक आयोगाने नियुक्त केलेल्या रिटर्निंग ऑफिसर्सना प्रत्येक मतदारसंघातील उमेदवारांचे नामांकन प्राप्त करण्यासाठी आणि निवडणुकीच्या औपचारिकतेवर देखरेख ठेवण्यासाठी प्रभारी म्हणून नियुक्त केले जाते.

**सारांश** :

भारतातील लोकसभा, राज्यसभा, राज्य विधानसभेच्या निवडणुका आणि देशातील राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपतींच्या निवडणूक प्रक्रियेचे देखरेख, दिशा आणि नियंत्रण भारतीय निवडणूक आयोगाला करावे लागते.भारतीय राज्य घटनेच्या पंधराव्या भागात  कलम ३२४ मध्ये भारतीय निवडणूक आयोगाच्या संदर्भात सविस्तर वर्णन करण्यात आलेले आहे.भारतीय निवडणूक आयोग ही घटनात्मक व स्वायत्त संस्था असून निवडणूक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५० रोजी राज्यघटनेच्या कलम ३२४ नुसार करण्यात आली आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. निवडणूक आयोगाची रचना स्पष्ट करा.

___

___

___

___

२. भारतातील निवडणूकीस उभे राहण्याची पात्रता स्पष्ट करा.

___

___

___

___

## १.४ निवडणूक आयोगाची भूमिका व कार्य :

निवडणूक आयोगाकडे संसद आणि राज्य विधानसभा आणि राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपतींच्या निवडणुकाच्या आयोजनाची जबाबदारी आहे. त्यामुळे निवडणूक आयोगास निवडणुकीच्या संदर्भात आपल्या भूमिका ठरवाव्या लागतात व त्यानुसार काम करावे लागते. म्हणून निवडणूक आयोगाची भूमिका पुढील प्रमाणे सांगता येईल.

**१. मतदार यादी तयार करणे:**

भारतातील लोकशाही व्यवस्था सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराच्या तत्त्वावर आधारित आहे. १८ वर्षांपेक्षा जास्त वयाचा कोणताही नागरिक निवडणुकीत मतदान करू शकतो. ( १९८९ पूर्वी वयोमर्यादा २१होती). मतदानाचा अधिकार हा जात, पंथ, धर्म, लिंग यांचा विचार न करता देण्यात आला आहे. एकंदरीतच १८ वर्षावरील सर्व मतदारांची नोंदणी करून घेणे हे काम प्रामुख्याने निवडणूक आयोगाला करावे लागते.१८ वर्षावरील सर्व मतदारांनी नोंदणी केलेल्या मतदाराच्या मतदारसंघात मतदाराची यादी निवडणूक आयोगाला तयार करावी लागते.मतदारसंघाची मतदार यादी ही त्या मतदारसंघातील सर्व नोंदणीकृत मतदारांची यादी असते.ज्यांची नावे मतदार यादीत आहेत त्यांनाच 'मतदार' म्हणून मतदान करण्याची परवानगी आहे. मतदारसंघातुन स्थलांतरित झालेल्यांची नावे काढून टाकणे,नवीन मतदारांची नोंदणी करणे,ज्यांचा मृत्यू झाला आहे किंवा मतदारसंघाबाहेर गेला आहे अशाची नावे कमी करणे, ही कामे निवडणूक आयोगाला करावी लागतात. मतदार याद्या अद्ययावत करणे ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे.जी नामांकन दाखल करण्याच्या शेवटच्या तारखेपासून ते निवडणूक पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीत केवळ निवडणुकीच्या वेळीच खंडित होते. मतदार याद्या तयार करणे, देखभाल करणे आणि परिनिरीक्षण (छाननी) करणे यात निवडणूक आयोगाची यंत्रणा गुंतलेली असते.

**मतदार यादीत नाव नोंदवण्यासाठी निवडणूक आयोगाचे वेगवेगळे फॉर्म उपलब्ध आहेत ते पुढील प्रमाणे**

- मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी फॉर्म नंबर ६
- परदेशातील भारतीय मतदाराने मतदार यादीत नाव समाविष्ट करण्याचा फॉर्म नंबर ६A
- मतदार यादीमध्ये प्रविष्ट केलेल्या तपशीलांमध्ये सुधारणा करण्यासाठी फॉर्म नंबर ८

**तुम्ही मतदार म्हणून नावनोंदणी करू शकता जर तुम्ही:**

- भारतीय नागरिक आहेत.
- पात्रता तारखेला म्हणजेच मतदार यादीच्या पुनरिक्षणाच्या वर्षाच्या १ जानेवारी रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण केली आहेत.
- नावनोंदणी करण्याची ईच्छा असलेल्या मतदारसंघातील भाग/मतदान क्षेत्राचे रहिवासी असल्यास.
- मतदार म्हणून नावनोंदणी करण्यास अपात्र ठरविले जात नसेल तेव्हा मतदार म्हणून नाव नोंदणी करू शकता.

**२. मतदार याद्याचे संगणकीकरण करणे:**

निवडणूक आयोगाने संपूर्ण भारतातील सर्व मतदार याद्यांचे संगणकीकरणाचे काम हाती घेतले आहे, ज्यामुळे प्रत्येक निवडणुकीसाठी मतदार यादी अद्ययावत करता येऊ शकते, तसेच मतदार याद्याच्या संगणकीकरणामुळे मतदारयादी मध्ये अचूकता आणि वेगाने सुधारणा केल्या जात आहेत.

**३. मतदारांची फोटो ओळखपत्रे तयार करणे :**

इलेक्टोरल फोटो आयडेंटिटी कार्ड (EPIC) हे निवडणूक नोंदणी अधिकाऱ्याने जारी केलेले ओळख दस्तऐवज आहे. EPIC मध्ये मतदाराचे नाव, वडिलांचे/आईचे/पतीचे नाव, पात्रता जन्मतारीख/वय, लिंग, पत्ता आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मतदाराचा फोटो यासारखे तपशील असतात. EPIC हा मतदारासाठी कायमस्वरूपी दस्तऐवज आहे. मतदानाच्या वेळी स्वतःची ओळख प्रस्थापित करण्यासाठी मतदाराने याचा वापर केला पाहिजे. मतदान सक्षम करण्यासाठी मतदानाच्या वेळी EPIC ने जारी केलेल्या मतदाराने आपले EPIC तयार करणे अनिवार्य आहे. मतदाराच्या फोटो ओळखपत्रामुळे निवडणुकीतील तोतयागिरी आणि बोगसगिरीला आळा बसला आहे.

**४. मतदारसंघ आणि जागांचे आरक्षण :**

देशाची ५४३ लोकसभा मतदारसंघांमध्ये विभागणी केली गेली आहे.विधानसभेचे ४१२० मतदारसंघ आहेत. लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघात

लोकसंख्येच्या प्रमाणात अनुसूचित जाती आणि जमाती यांना आरक्षण देण्यात आलेले आहे. लोकसभेच्या मतदारसंघाचा विचार करता ५४३ मतदार संघापैकी खुल्या प्रवर्गासाठी ४१२ जागा तर अनुसूचित जातीसाठी ८४ जागा आणि अनुसूचित जमातीसाठी ४७ जागा राखीव आहेत.

**५. मतदारसंघाच्या सीमा निर्धारित करणे :**

परिसीमन आयोगाद्वारे देशातील लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघाच्या सीमा निर्धारित केल्या जातात.परिसीमन म्हणजे संसदीय किंवा विधानसभा मतदारसंघांच्या सीमांचे पुनर मांडणी व रचना करणे होय.लोकसंख्येतील बदल लक्षात घेऊन जनगणनेच्या आधारावर मतदार संघाच्या सीमा निर्धारित करण्याचे काम परिसीमन आयोगाद्वारे केले जाते.परिसीमन आयोग संसद कायद्यानुसार मुख्य निवडणूक आयुक्त आणि सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालयातील दोन न्यायाधीश किंवा माजी न्यायाधीशांनी बनलेला असतो.

**६. निवडणूक कार्यक्रम घोषित करणे:**

लोकसभा आणि प्रत्येक राज्य विधानसभेच्या निवडणुका दर पाच वर्षांनी घ्याव्या लागतात. तसेच लोकसभेत व विधानसभेत सत्ताधाऱ्यांनी बहुमत गमावल्यास व नवीन सत्ता ताब्यात घेण्यासाठी पर्यायी सरकार उपलब्ध नसेल तर राष्ट्रपती लोकसभा, राज्यपाल विधानसभा विसर्जित करू शकतात. म्हणजेच पाच वर्षे पूर्ण होण्यापूर्वी ही देशात सार्वत्रिक, व राज्यात विधानसभेच्या निवडणूका होऊ शकतात. एकंदरीतच देशातील लोकसभा आणि राज्यातील विधानसभेच्या निवडणुकीचा कालावधी संपल्यानंतर निवडणुका घोषित करणे हे महत्त्वाचे काम निवडणूक आयोगाला करावे लागते. तसेच लोकसभा व विधानसभा मतदारसंघातील निवडून आलेल्या उमेदवाराचा मृत्यू झाल्यास किंवा त्याने राजीनामा दिल्यास त्या ठिकाणी सहा महिन्याच्या आत पुन्हा पोटनिवडणूक घ्यावी लागते. एकंदरीतच देशातील व राज्यातील सार्वत्रिक निवडणुका, पोटनिवडणुकाचा कार्यक्रम घोषित करण्याची जबाबदारी ही निवडणूक आयोगावर आहे.

**७. निवडणुकीचे वेळापत्रक तयार करणे:**

निवडणूक प्रक्रिया संसदीय मतदारसंघ आणि विधानसभा मतदारसंघांसाठी अधिसूचना जारी करण्यापासून सुरू होते. कायदेशीर तरतुदींनुसार, अधिसूचना जारी झाल्यानंतर उमेदवारी अर्ज भरण्यासाठी सात दिवसांचा कालावधी देण्यात येतो. नामांकन अर्जांची छाननी नामनिर्देशनांच्या अंतिम तारखेच्या दुसऱ्या दिवशी केली जाते. त्यानंतर अर्ज माघारीसाठी दोन दिवसांचा अवधी देण्यात येऊन माघारीनंतर उमेदवारांची अंतिम यादी तयार केली जाते. प्रचाराचा कालावधी साधारणपणे १४ दिवस किंवा त्याहून अधिक असतो आणि प्रचाराचा कालावधी संबंधित मतदारसंघातील मतदान संपण्याच्या ४८ तास आधी संपतो. या सर्व प्रक्रियेसाठी

निवडणुकीचे वेळापत्रक तयार करून ते घोषित करण्याची जबाबदारी ही निवडणूक आयोगाची आहे.

## ८. मतदान कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे व त्यांचा कार्यभार निश्चित करणे:

निवडणुका घोषित झाल्यानंतर महत्त्वाचा टप्पा म्हणजे मतदान कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे हा आहे. केवळ मतदान कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून मतदान प्रक्रिया पूर्ण होत नाही तर त्या मतदान कर्मचाऱ्यांना नेमका कोणता कार्यभार दिलेला आहे, त्यांच्या कार्यभागाची निश्चिती करून त्यांचे प्रशिक्षण आयोजित करून त्यांना निवडणुकीला सामोरे जाण्यास तयार करण्याची जबाबदारी ही निवडणूक आयोगाची आहे.

## ९. मतदान केंद्राची निश्चिती व मतदान केंद्रावर सोयी सुविधा पुरविणे:

लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या मतदानासाठी निवडणूक आयोगाला लोकसंख्येच्या प्रमाणात मतदान केंद्र तयार करावे लागतात. मतदान केंद्र तयार करत असताना दोन मतदान केंद्र मधील अंतर, त्या मतदान केंद्रावर उपलब्ध असलेल्या सोयी सुविधाचे स्वरूप पाहता मतदान केंद्रांवर किमान खात्रीशीर वातावरण असण्यासाठी निवडणूक अधिकाऱ्यांना सूचना जारी करण्यात येतात, ज्यामध्ये पिण्याचे पाणी, सावली/निवारा, प्रकाश, रॅम्प आणि यासारख्या काही मूलभूत किमान सुविधा त्यामध्ये समाविष्ट आहेत. ह्या प्राथमिक सोयी सुविधा पुरण्याची जबाबदारी ही निवडणूक आयोगाची आहे.

## १०. निवडणुकीतील उमेदवारांचे नामांकन स्वीकारणे व निवडणूक प्रक्रियेचे संचालन करणे:

निवडणूक आयोगाने एकदा निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर केल्यानंतर निवडणूक प्रक्रिया सुरू होते. त्यामध्ये प्रामुख्याने निवडणुकीतील उमेदवारांचे नामांकन स्वीकारणे, यासाठी उमेदवारांना त्यांचे अर्ज भरण्यासाठी एक आठवडा देण्यात येतो.रिटर्निंग ऑफिसर्सद्वारे उमेदवारी अर्जांची छाननी केली जाते. उमेदवारांना निवडणूक अर्ज भरताना त्याला प्रतिज्ञापत्र द्यावी लागतात.१३ सप्टेंबर २०१३ रोजी सर्वोच्च न्यायालयाने २००८ च्या रिट पिटीशन (सी) क्र. १२१ मध्ये दिलेल्या निकालाच्या अनुषंगाने, जे इतर गोष्टींबरोबरच रिटर्निंग ऑफिसरला "आवश्यक माहिती पूर्णतः प्रदान केली आहे की नाही हे तपासणे बंधनकारक करते. नामनिर्देशनपत्रासह त्यांचे गुन्हेगारी पार्श्वभूमी, मालमत्ता, दायित्वे, शैक्षणिक पात्रता इ. माहिती शपथपत्रात द्यावी लागते. निवडणूक आयोगाने उमेदवारांना असे निर्देश जारी केले आहेत की नामनिर्देशनपत्रासोबत दाखल करावयाच्या प्रतिज्ञापत्रामध्ये उमेदवारांनी सर्व स्तंभ भरणे आवश्यक आहे. प्रतिज्ञापत्रातील कोणताही स्तंभ रिकामा ठेवल्यास, निवडणूक अधिकारी उमेदवाराला सर्व रकान्यात भरलेले प्रतिज्ञापत्र दाखल करण्याची नोटीस देईल. अशा सूचनेनंतर, उमेदवाराने सर्व बाबतीत पूर्ण शपथपत्र दाखल न केल्यास, नामनिर्देशनपत्र छाननीच्या वेळी नाकारले जाईल. मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना व सर्व रिटर्निंग अधिकाऱ्यांना सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आणि आयोगाच्या सूचनांबाबत माहिती देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

एकंदरीतच उमेदवारांच्या नामांकनाविषयी जर ते नामांकन व्यवस्थित आढळले नाही तर त्यावर आलेल्या आरोपावर सुनावणी घेतली जाते, एखाद्या वेळी सुनावणीनंतर ते नाकारले ही जाऊ शकते. वैधपणे नामनिर्देशित केलेले उमेदवार नामांकन छाननी झाल्यानंतर दोन दिवसांत निवडणुकीतून माघार घेऊ शकतात.अधिकृत नामनिर्देशित उमेदवारांची यादी तयार केल्यानंतर उमेदवारांना निवडणूक चिन्ह वाटप करणे हा महत्त्वाचा कार्यक्रम निवडणूक आयोगाला हाती घ्यावा लागतो.निवडणुकीत उभ्या असलेल्या उमेदवारांच्या नावांसह आयोगाने निर्धारित केलेल्या भाषांमध्ये उमेदवारांची छायाचित्रे आणि प्रत्येक उमेदवाराला दिलेली चिन्हे मतपत्रिकेवर छापली जातात. मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या उमेदवारांना त्यांच्या पक्षाचे चिन्ह वाटप केले जाते.त्यानंतर निवडणुकीतील सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे प्रचाराचा हा असतो.प्रचार काळात राजकीय पक्ष आणि उमेदवार त्यांचे युक्तिवाद मांडतात ज्याद्वारे ते लोकांना त्यांना मत देण्यास प्रवृत्त करतात. प्रचाराचा हा कालावधी दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ चालतो आणि मतदान संपण्याच्या ४८ तास आधी अधिकृतपणे संपतो. त्यानंतर मतदानाच्या दिवशी मतदान प्रक्रिया पूर्ण होते त्यानंतर मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मतमोजणीच्या दिवशी मतमोजणी होऊन निकाल जाहीर केला जातो एकंदरीतच निवडणूक जाहीर झाल्यापासून उमेदवारांच्या नामांकनावर देखरेख ठेवून निवडणूक निकाल घोषित करण्यापर्यंतची प्रक्रिया ही निवडणूक आयोगाला पार पाडावी लागते.

### ११. आदर्श आचारसंहितेचे पालन करण्यास राजकीय पक्ष व उमेदवारास प्रवृत्त करणे:

निवडणुकात होणारे गैरप्रकार टाळण्यासाठी निवडणूक आयोग निवडणुकांची आचारसंहिता जाहीर करते.राजकीय पक्षांच्या सहकार्याने आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करण्यासाठी निवडणूक आयोग कटिबद्ध असतो.निवडणुकीच्या आचारसंहितेशी संबंधित बाबींवर आयोग राजकीय पक्षांशी वेळोवेळी सल्लामसलत करतो.निवडणूक प्रचारादरम्यान राजकीय पक्ष आणि उमेदवारांना निवडणूक आयोगाने विकसित केलेल्या आदर्श आचारसंहितेचे पालन करणे अपेक्षित आहे. निवडणूक प्रचारादरम्यान राजकीय पक्ष आणि उमेदवारांनी कसे वागावे यासाठी आदर्श आचारसंहितेत विस्तृत मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात आलेली आहेत. आदर्श आचारसंहितेचा महत्त्वाचा हेतू म्हणजे निवडणूक प्रचार पारदर्शक धर्तीवर चालवणे, राजकीय पक्ष किंवा त्यांचे समर्थक यांच्यातील संघर्ष टाळणे आणि प्रचार कालावधीत आणि त्यानंतर निकाल घोषित होईपर्यंत शांतता व सुव्यवस्था राखणे हा हेतू आहे.

### १२. मतदान खर्चावर लक्ष ठेवणे:

निवडणूक प्रचारादरम्यान उमेदवार किती पैसे खर्च करू शकतो यावर कडक कायदेशीर मर्यादा आहेत. बहुतेक लोकसभा मतदारसंघांमध्ये अलीकडेच सुधारित केलेली मर्यादा रु. ७०,००,०००विधानसभा निवडणुकीसाठी निवडणूक खर्चाची मर्यादा रु. २८,००,००० निश्चित करण्यात आलेली आहे. निवडणुकीतील उमेदवारांना निश्चित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त खर्च करता येत नाही. निवडणुकीतील

हा खर्च त्या उमेदवाराचे समर्थक प्रचार करण्यासाठी खर्च करू शकतात पण त्यांना उमेदवाराची लेखी परवानगी घ्यावी लागते. त्यासाठी प्रत्येक उमेदवाराला बँकेत एक खाते उघडावे लागते व रोजच्या खर्चाचा हिशोब हा निवडणूक आयोगाला सादर करावा लागतो.

**१३. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपॅट यंत्र उपलब्ध करून देणे:**

मतदान आणि मतमोजणी सुलभ करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे विकसित करण्यात आली आहेत. यंत्राचा वापर म्हणजे कागद आणि छपाई इत्यादींच्या खर्चात बचत करणे आणि तीन ते चार तासांत निकाल मिळणे हा आहे. त्यामुळे पारंपारिक मोजणीमध्ये लागणारा बराचसा वेळ सध्या वाचतो आहे.निवडणुकांसाठी वापरले जाणारे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (ECIL) आणि भारत इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (BEL) यांनी विकसित केली आहेत. ही यंत्रे मतपत्रिकेची गोपनीयता सुनिश्चित करण्यासाठी आणि मतदानाची गती आणि तात्काळ निकाल सुनिश्चित करण्याव्यतिरिक्त मशीनशी छेडछाड करण्यापासून पूर्ण संरक्षण प्रदान करतात. संसदेने मार्च, १९८९ मध्ये लोकप्रतिनिधीत्व कायदा, १९५१ मध्ये सुधारणा करून, या कायद्यात कलम ६१ (A) आणले आहे, ज्यामध्ये मतदान यंत्रांच्या मतांची नोंद विहित पद्धतीने करण्याची तरतूद केली आहे.वरील तरतुदींच्या अनुषंगाने, केंद्र सरकारने इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीनचा वापर सुलभ करण्यासाठी नवीन प्रकरण II [नियम४९ (a) ते४९ (x)] समाविष्ट करून निवडणूक आचार नियम, १९६१ मध्ये सुधारणा केली आहे.

सोबत एकंदरीतच ईव्हीएम मशीनद्वारे मतदान प्रक्रियेमध्ये सुलभता आली असली तरी ईव्हीएम मशीन वर अनेकदा संशय व्यक्त केला जातो. त्यातून ईव्हीएम मशीनची विश्वासनीयता जोपासण्यासाठी २०१३ पासून, ईव्हीएममध्ये व्होटर व्हेरिफायेबल पेपर ऑडिट ट्रेल नावाची (VVPAT) एक नवीन प्रणाली जोडली गेली आहे. ईव्हीएमसोबत एक प्रिंटर जोडला जातो आणि मतदानाच्या डब्यात ठेवला जातो ज्यावर मतदाराने मतदान केलेल्या उमेदवाराचे नाव आणि चिन्ह छापले जाते. ही मुद्रित स्लिप पारदर्शक खिडकीखाली ७ सेकंदांपर्यंत उघडी राहते आणि आपोआप कापली जाते आणि ड्रॉपबॉक्समध्ये पडते जी सीलबंद राहते.

तसेच २००४ च्या रिट याचिका (सी) क्रमांक १६१ मध्ये २७ सप्टेंबर २०१३ रोजी दिलेल्या निकालात, सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत की मतपत्रिका आणि ईव्हीएमवर "वरीलपैकी काहीही नाही" (NOTA) पर्याय असावा. यातून ईव्हीएमवर शेवटच्या उमेदवाराच्या नावाच्या खाली, आता NOTA पर्यायासाठी एक बटण असेल जेणेकरुन जे मतदार कोणत्याही उमेदवाराला मत देऊ इच्छित नाहीत त्यांना NOTA बटण दाबून त्यांचा पर्याय वापरता येतो.एकंदरीतच निवडणूका सुरळीत पार पडण्यासाठी पुरेशा प्रमाणात ईव्हीएमची व व्हीव्हीपॅटची उपलब्धता करून देण्याची जबाबदारी ही निवडणूक आयोगाची आहे.

**१४. निवडणूक अधिकाऱ्यांशी समन्वय आणि संप्रेषण साधने:**

निवडणूक सुरळीत पार पाडण्यासाठी आणि मतदानाच्या दिवशी वेगवेगळ्या घटकांचा हस्तक्षेप टाळण्यासाठी आणि निवडणुका नि:पक्षपाती करण्यासाठी जिल्हा/मतदारसंघ स्तरावर परिपूर्ण संवाद योजना तयार करणे आणि त्याची अंमलबजावणी करणे याला आयोग खूप महत्त्व देतो. या उद्देशासाठी, आयोगाने राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना राज्य मुख्यालयातील दूरसंचार विभागाचे अधिकारी, बीएसएनएल/एमटीएनएल अधिकारी, राज्यातील इतर आघाडीच्या सेवा प्रदात्यांचे प्रतिनिधी यांच्याशी समन्वय साधण्याचे निर्देश दिले आहेत. जेणेकरून राज्यांमध्ये नेटवर्कची स्थिती सुधारेल. निवडणुकांशी संबंधित अधिकाऱ्यांना राज्यात दळणवळण योजना सुनिश्चित करण्याचा सल्ला ही देण्यात येत असतो.

तसेच निवडणुकीच्या संदर्भात घडणाऱ्या प्रक्रियेचे व्हिडिओ-ग्राफी करण्याचे आदेश निवडणूक अधिकाऱ्यांना दिलेले असतात.जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडून यासाठी पुरेशा प्रमाणात व्हिडिओ आणि डिजिटल कॅमेरे आणि कॅमेरा टीमची व्यवस्था केली जाते.व्हिडीओग्राफीच्या कार्यक्रमांमध्ये उमेदवारी अर्ज भरणे, त्याची छाननी आणि चिन्हांचे वाटप, प्रथम स्तर तपासणी, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची तयारी आणि साठवणूक, प्रचारादरम्यान महत्त्वाच्या सार्वजनिक सभा, मिरवणुका,पोस्टल बॅलेट पेपर पाठविण्याची प्रक्रिया, मतदान प्रक्रिया यांचा समावेश असेल. तसेच असंवेदनशील म्हणून ओळखली जाणारी असुरक्षित मतदान केंद्रे, मतदान झालेल्या ईव्हीएमचा साठा, मतांची मोजणी इ. वेबकास्टिंग, व्हिडीओग्राफी आणि डिजिटल कॅमेरे मतदान केंद्रात आवश्यक तेथे तैनात करून दिले जातात. एकंदरीतच ज्यांना व्हिडीओ रेकॉर्डिंगच्या सीडी मिळवायच्या असतील त्यांना त्याची फीस भरल्यावर त्या उपलब्ध करून दिल्या जातात.

## १५. राजकीय पक्ष,निवडणुका आणि आयोग:

राजकीय पक्ष हे आधुनिक लोकशाहीचा एक भाग आहेत. कारण भारतातील निवडणुकांचे आयोजन मुख्यत्वे राजकीय पक्षांच्या भूमिकेवर अवलंबून असते. म्हणून प्रत्येक राजकीय पक्षाला आपली नोंदणी निवडणूक आयोगाकडे करावी लागते.देशातील राष्ट्रीय पक्ष व प्रादेशिक पक्ष हे कायद्यानुसार निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत आहेत.भारतीय राज्यघटनेनुसार लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि समाजवादाच्या तत्त्वांशी पक्षाची रचना आणि पक्षाची बांधिलकी आहे की नाही हे निवडणूक आयोग तपासतो.तसेच भारताचे सार्वभौमत्व, एकता आणि अखंडता राजकीय पक्षाकडून राखली जाते किंवा नाही हे आयोग ठरवतो. यासाठी प्रत्येक राजकीय पक्षाला आपली घटना निवडणूक आयोगाला द्यावी लागते.आयोग प्रत्येक राजकीय पक्षाला वेळोवेळी त्यांच्या संघटनात्मक निवडणुका घेण्याचा आदेश देते व त्यांच्या कामकाजात अंतर्गत पक्षीय लोकशाही सुनिश्चित करते. अशा प्रकारे नोंदणीकृत राजकीय पक्षांना निवडणूक आयोगाने विहित केलेल्या निकषांनुसार सार्वत्रिक निवडणुकीतील त्यांच्या मतदान कामगिरीच्या आधारावर राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर मान्यता दिली जाते.पक्ष चिन्हे निरक्षर मतदारांना त्यांना ज्या पक्षाला मतदान करू इच्छितात त्या पक्षाच्या उमेदवाराला ओळखण्यास सक्षम करतात. म्हणून नोंदणीकृत राष्ट्रीय पक्षांना व प्रादेशिक पक्षांना एक चिन्ह दिले जाते. राजकीय

पक्षांत निर्माण होणारे वाद आणि त्यातून पक्षाची होणारी विभागणी हे भारतात काही नवीन नाही. त्यामुळे अनेक राजकीय पक्षात वाद निर्माण होतात. अशावेळी पक्षात पडलेल्या दोन गटांमध्ये झालेला संघर्ष पाहता कोणत्या गटाकडे पक्षाचे चिन्ह ठेवायचे याचा निर्णय ही निवडणूक आयोगाच्या कक्षेत येतो.तसेच पक्षांचे राष्ट्रीय आणि राज्य पक्षांच्या संदर्भात वर्गीकरण कसे करायचे यावरून अनेक वाद निर्माण होतात हे वाद निवडणूक आयोगाला सोडवावे लागतात.आयोग हा राजकीय पक्षाच्या वादासंदर्भातील अर्ध-न्यायिक अधिकारक्षेत्राचा एक भाग म्हणून कार्य करत असते.तसेच मान्यताप्राप्त पक्षांच्या विभाजन, गटांमधील विवादांचे निराकरण देखील करत असते. तसेच निवडणूक आयोगाच्या राजकीय पक्ष, निवडणुका संदर्भातील निर्णयांना न्यायालयात आव्हान दिले जाऊ शकते.

## १६. निवडणूक आयोगाचे सल्लागार आणि अर्ध-न्यायिक कार्य:

कोणताही मतदार किंवा उमेदवार निवडणुकीदरम्यान गैरव्यवहार झाल्याचे वाटल्यास तो निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करू शकतो.संविधानानुसार, संसद आणि राज्य विधानमंडळांच्या विद्यमान सदस्यांना निवडणुकीनंतर अपात्र ठरविण्याच्या बाबतीतही आयोगाला अधिकार आहेत. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांसमोर येणा-या निवडणुकांमध्ये भ्रष्ट, दोषी आढळलेल्या उमेदवारांची प्रकरणे देखील आयोगाकडे पाठविली जातात. तसेच ज्या उमेदवाराने त्याच्या निवडणूक खर्चाचा हिशेब वेळेत आणि कायद्याने विहित केलेल्या पद्धतीने सादर करण्यास अयशस्वी ठरला असेल त्याला अपात्र ठरवण्याचा अधिकार आयोगाला आहे. कायद्यानुसार अशा अपात्रतेचा कालावधी काढून टाकण्याचा किंवा कमी करण्याचा अधिकार आयोगाला आहे.तसेच निवडणूक आयोगाने घेतलेल्या वेगवेगळ्या प्रकरणासंदर्भात आयोगाच्या निर्णयाच्या विरोधात उच्च न्यायालय आणि भारताच्या सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले जाऊ शकते. एकदा निवडणुकीची प्रत्यक्ष प्रक्रिया सुरू झाली की,न्यायपालिका निवडणुकीच्या प्रत्यक्ष व्यवहारात हस्तक्षेप करत नाही. मतदान पूर्ण झाल्यानंतर आणि निकाल जाहीर झाल्यानंतर, आयोग स्वत: कोणत्याही निकालाचे पुनरावलोकन करू शकत नाही. संसद आणि राज्य विधानमंडळांच्या निवडणुकांसंदर्भात उच्च न्यायालयासमोर दाखल केलेल्या निवडणूक याचिकेच्या प्रक्रियेद्वारेच याचा आढावा घेतला जाऊ शकतो.राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपतींच्या पदांच्या निवडणुकीच्या संदर्भात, अशा याचिका केवळ सर्वोच्च न्यायालयासमोर दाखल केल्या जाऊ शकतात.

## १७. प्रसार माध्यमांना माहिती उपलब्ध करून देणे:

निवडणूक आयोगाचे कार्यक्रम जाहीर करणे तसेच प्रत्येक निवडणुकांचे कवरेज करण्यासाठी प्रसार माध्यमांना संधी उपलब्ध करून देण्याचे काम निवडणूक आयोग करत असते.आयोगाचे माध्यमांसाठी सर्वसमावेशक धोरण आहे. हे मास मीडिया-प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिकसाठी नियमितपणे, निवडणुकीच्या काळात जवळच्या अंतराने आणि इतर प्रसंगी आवश्यकतेनुसार विशिष्ट प्रसंगी नियमित ब्रीफिंग्ज आयोजित करते. प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना प्रत्यक्ष मतदान आणि मतमोजणीचे वार्तांकन करण्याची

सुविधाही दिली जाते. आयोगाने जारी केलेल्या अधिकार पत्रांच्या आधारे त्यांना मतदान केंद्रे आणि मतमोजणी केंद्रांमध्ये प्रवेश दिला जातो.त्यात आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय माध्यमांचे प्रतिनिधी समाविष्ट आहेत.आयोग निवडणुकांचे सांख्यिकीय अहवाल आणि इतर कागदपत्रे देखील प्रकाशित करतो जे सार्वजनिक डोमेनमध्ये उपलब्ध असतात.

### १८. मतदार शिक्षण:

लोकशाही आणि निवडणूक प्रक्रियेतील मतदारांचा सहभाग हा कोणत्याही लोकशाहीच्या यशस्वी कारभाराचा अविभाज्य भाग असतो. त्याकरिता भारताच्या निवडणूक आयोग औपचारिकपणे मतदार शिक्षण आणि निवडणूक सहभाग वाढवण्यासाठी अनेक प्रयत्न करताना आपल्याला दिसून येतो. निवडणूक आयोग मतदानाच्या संदर्भात जागृती व्हावी व लोकसहभाग वाढावा यासाठी सरकारी मालकीच्या माध्यमांच्या सहकार्याने दूरदर्शन, ऑल इंडिया रेडिओच्या माध्यमातून मतदारांच्या जागृतीसाठी निवडणूक काळात मोहीम हाती घेत असतो.तसेच राजकीय पक्षांद्वारे प्रसारण/प्रक्षेपणासाठी सरकारी मालकीच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर, राजकारणाचे गुन्हेगारीकरण तपासणे, मतदार याद्यांचे संगणकीकरण, मतदारांना ओळखपत्र प्रदान करणे, इत्यादी कार्य निवडणूक आयोग करताना दिसून येतो.तसेच राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना निवडणुकीशी संबंधित माहितीचा व्यापक प्रसार सुनिश्चित करण्यासाठी तसेच मतदानात लोकांचा व्यापक सहभाग सुनिश्चित करण्यासाठी पुरेशा सोयीच्या उपाययोजना करण्याचे निर्देश दिले जातात. मॉडेल मतदान केंद्रे उभारली जातात. मतदारांच्या मदतीसाठी मतदार हेल्पलाइन, मतदार सुविधा केंद्र, वेब आणि एसएमएस आधारित शोध सुविधा कार्यरत आहेत,अपंग व्यक्तींसाठी विशेष सुविधा, निवडणुकांची माहिती तळागाळापर्यंत पोहोचेल याची खात्री करण्यासाठी निवडणूक काळात राबविल्या जाणाऱ्या SVEEP कार्यक्रमाचे निरीक्षण करण्यासाठी केंद्र सरकारकडून जागरूकता निरीक्षकांची नियुक्ती केली जात आहे. तसेच २५ जानेवारी १९५० हा दिवस राष्ट्रीय मतदार दिवस संपूर्ण भारतात साजरा केला जातो.

### १९. शांततापूर्ण आणि निष्पक्ष निवडणूका पार पाडणे:

शांततापूर्ण आणि निष्पक्ष निवडणुका पार पाडण्यासाठी सुरक्षा हा महत्त्वाचा घटक आहे. तो आज निवडणूक प्रक्रियेचा अविभाज्य भाग ठरत आहे. देशात सार्वत्रिक निवडणुकी दरम्यान, मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका सुनिश्चित करण्याची जबाबदारी केंद्रीय सशस्त्र पोलिस दलांवर (CAPF) देण्यात आली आहे.कारण ते स्थानिक राजकीय व इतर प्रभावापासून मुक्त मानले जातात. राज्य पोलीस आणि केंद्रीय पोलीस दलातील कर्मचारी सुरक्षेसाठी निवडणूक आयोगामध्ये मध्ये नियुक्त केले जातात.मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका पार पाडण्यासाठी सुरक्षा व्यवस्था आणि देखरेख करणे देखील खूप आव्हानात्मक बनले आहे. भारतासारख्या वेगवेगळ्या समस्यांनी व्यापलेल्या या देशात मोठ्या प्रमाणात मतदार अनेक प्रदेशात वास्तव्यास

आहेत.भारतातील प्रत्येक प्रदेशाच्या समस्या ह्या वेगवेगळ्या स्वरूपाच्या आहेत.देशात निवडणुकीदरम्यान देशाच्या काही भागात वेगवेगळ्या विचारसरणीचा अतिरेक,प्रचार कालावधी दरम्यान प्रमुख नेत्यांना दिल्या जाणाऱ्या धमक्या, नक्षलवाद ,माओवाद, जम्मू आणि काश्मीर आणि ईशान्येकडील काही भागांमधील परिस्थिती सांप्रदायिकदृष्ट्या संवेदनशील स्वरूपाची आहे. त्यामुळे देशातील निवडणूक काळात जातीय आणि सांप्रदायिक हिंसाचार हे प्रामुख्याने घडताना आपल्याला दिसून येतात. त्यामुळे निवडणूक आयोगाला अशा परिस्थितीत निवडणुकीचे व्यवस्थापन बदलावे लागते.निवडणूक आयोगाने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी अनेक उपाय योजले ज्यात प्रतिबंधात्मक कारवाया,अजामीनपात्र वॉरंटची अंमलबजावणी करणे, निवडणूक संबंधित प्रलंबित प्रकरणांवर लवकर निर्णय घेणे, बेकायदेशीर दारू शोधणे, बेकायदेशीर शस्त्रे आणि दारूगोळा जप्त करणे, प्रतिबंधात्मक आदेश, परवानाधारक शस्त्रे तपासणे आणि जमा करणे, नवीन शस्त्रे देण्यावर बंदी, अवैध शस्त्रे, असामाजिक घटक, रोख रक्कम आणि दारू यांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी चेक पोस्टची स्थापना आणि प्रतिबंधात्मक धोरणात्मक भूमिका घेतलेली आहे.एकंदरीतच सुरक्षा दलांची भूमिका मतदानाच्या खूप आधी सुरू होते आणि निकाल जाहीर झाल्यानंतर, मतमोजणीनंतरच संपते.कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि मुक्त व निष्पक्ष निवडणुका पार पाडण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी जिल्हा दंडाधिकारी आणि पोलीस अधिकाऱ्यांनी करावयाच्या आगाऊ प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत आयोग वेळोवेळी सूचना देत असते. आयोग सतत परिस्थितीचे बारकाईने निरीक्षण करतो आणि राज्यांमध्ये शांततापूर्ण, मुक्त आणि निष्पक्ष मतदान सुनिश्चित करण्यासाठी योग्य उपाययोजना करतो. त्यामुळे शांततापूर्ण आणि निष्पक्ष निवडणूक होण्यासाठी निवडणूक आयोग सतर्क असतो.

## २०. निवडणुकांचे निरीक्षण करण्यासाठी निरीक्षकाची निवड:

निवडणूक सुरळीत पार पाडण्यासाठी आयोगाकडून निरीक्षकांना नियुक्त केले जातात.जे इतर राज्य केडरमधील वरिष्ठ नागरी सेवक असतात. निरिक्षकांना निवडणूक प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर बारकाईने लक्ष ठेवण्यास सांगितले जाते. जेणेकरून निवडणुका मुक्त आणि निष्पक्ष व्हाव्यात.त्यांची नावे, जिल्हा/मतदारसंघातील पत्ते आणि त्यांचे दूरध्वनी क्रमांक स्थानिक वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध केले जातात. जेणेकरुन सामान्य लोक कोणत्याही तक्रार निवारणासाठी त्यांच्याशी त्वरित संपर्क साधू शकतील.

एकंदरीतच भारतासारख्या विस्तीर्ण देशात निवडणुकांचे आयोजन करणे ही कठीण बाब आहे. कारण मतदान केंद्रावरील उपलब्ध सोयीसुविधा, मतदान कर्मचाऱ्यांची सुरक्षा,मतदान केंद्रावरील सुरक्षा,मतदान साहित्याची सुरक्षा आणि निवडणूक प्रक्रियेची संपूर्ण सुरक्षा यांचा विचार करता अनेक ठिकाणी काही अनैसर्गिक घटना या निवडणूक काळात घडतात.निवडणुकीतील 'मनी पॉवर'चा गैरवापर, पेड न्यूज,

निवडणुकीच्या काळात निष्पक्ष स्पर्धेचा अभाव, विशिष्ट क्षेत्रांचा राजकीय बहिष्कार, अशा अनेक घटकाचा विचार निवडणूक आयोगाला निवडणुकीच्या काळात करावा लागतो.

## १.५ भारतीय संविधानातील निवडणूक विषय तरतुदी:

राज्यघटनेतील पंधराव्या भागात कलम ३२४ ते ३२९ मध्ये देशातील निवडणूक प्रक्रियेसंबंधी महत्त्वाच्या तरतुदी दिलेल्या आहेत.

**कलम ३२४** मध्ये स्वतंत्र निवडणूक आयोगाची तरतूद केली आहे.भारतातील संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ही निवडणूक आयोगाच्या हाती सोपविलेली आहे. संसदेच्या व प्रत्येक राज्याच्या विधानमंडळाच्या सर्व निवडणुकाकरिता सर्व प्रक्रिया पूर्ण करण्याची जबाबदारी ही निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे.

**कलम ३२५** मध्ये केवळ धर्म, वंश, जात, लिंग यांपकी कोणत्याही आधारे कोणत्याही व्यक्तीस तिचे नाव मतदारयादीमध्ये समाविष्ट करण्यापासून अपात्र ठरविता येणार नाही. तसेच याच कलमात असेही नमूद केले आहे की,संसद आणि राज्य विधिमंडळाच्या निवडणुकीसाठी प्रत्येक भौगोलिक मतदारसंघासाठी केवळ एकाच सर्वसाधारण मतदारयादीची व्यवस्था करण्यात आली आहे. निवडणुकीतील मतदानाबाबत नागरिकांना समान मानण्यात आले आहे.

**कलम ३२६** नुसार लोकसभा आणि राज्य विधानसभांच्या निवडणुका प्रौढ मतदानाच्या आधारावर घेतल्या जातील. भारतातील प्रत्येक नागरिकाला आणि १८ वर्षे वयापेक्षा अधिक असणाऱ्या व्यक्तीला मतदानाचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे, तथापि योग्य कायदेमंडळाद्वारे(संसद किंवा राज्य विधिमंडळ) अनिवास, अस्थिर मानसिकता, गुन्हा व भ्रष्ट गैरव्यवहार इ. आधारावर एखाद्या व्यक्तीला कोणत्याही कायद्याने किंवा राज्यघटनेतील तरतुदीमुळे अपात्र ठरविले जाऊ शकते.

**कलम ३२७** मध्ये संसदेस विधानमंडळाच्या निवडणुका बाबत तरतूद करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे.

**कलम ३२८** मध्ये राज्य विधान मंडळास विधान मंडळाच्या निवडणुकीबाबत तरतूद करण्याचा अधिकार. या कलमाच्या आधारे संसदेने विधानमंडळाच्या निवडणुकी संबंधित ज्या काही तरतुदी केलेल्या नसतील त्या तरतुदीच्या संदर्भात राज्य विधानमंडळास विधानमंडळाच्या निवडणुकीबाबत तरतुदी करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे.

**कलम ३२९** मध्ये निवडणूक विषयक बाबी मध्ये न्यायालयांना हस्तक्षेप करण्यास प्रतिबंध करण्यात आलेले आहे.यामध्ये प्रामुख्याने मतदारसंघाच्या क्षेत्रांचे परिसीमन किंवा मतदार

संघातील जागांचे वाटप यासंदर्भात कलम ३२७ ३२८ नुसार केलेल्या कोणत्याही कायद्याची विधी ग्राह्यता कोणत्याही न्यायालयातून तपासली जाणार नाही.

**दुर्बल घटकांसाठी राखीव मतदारसंघ-**

राज्यघटनेच्या सोळाव्या भागातील कलम ३३० ते कलम ३३४ अंतर्गत दुर्बल घटकांसाठीच्या संदर्भातील तरतुदी केलेल्या आहेत.

**कलम ३३०** नुसार लोकसभेत अनुसूचित जाती-जमाती यांच्याकरिता जागा राखून ठेवल्या जातील. या कलमान्वये अनुसूचित जातीसाठी किंवा अनुसूचित जमातीसाठी लोकसभेत ज्या जागा राखून ठेवल्या आहेत त्या जागांचे प्रमाण अनुसूचित जाती व जनजातीच्या त्या त्या राज्याच्या लोकसंख्येच्या एकूण प्रमाणातशी जितके प्रमाण असेल तितक्याच प्रमाणात त्या राज्यात त्या जागा राखीव ठेवण्यात येतात.या जागा २००१ च्या जनगणनेच्या आधारावर २०२६ पर्यंत तशाच ठेवण्यात आलेल्या आहेत.

**कलम ३३१** नुसार आंग्ल-भारतीय समाजाला लोकसभेत योग्य प्रतिनिधित्व मिळाले नाही असे राष्ट्रपतींना वाटत असेल तर राष्ट्रपती या समाजाचे जास्तीत जास्त २ सदस्य लोकसभेवर नामनिर्देशित करू शकतात.

**कलम ३३२** नुसार प्रत्येक घटक राज्याच्या विधानसभेत अनुसूचित जाती आणि जमाती यांच्याकरिता जागा राखून ठेवण्यात आलेल्या आहेत.

**कलम ३३३** नुसार एखाद्या राज्याच्या विधानसभेत आंग्ल-भारतीय समाजाला योग्य प्रतिनिधित्व मिळाले नसल्यास राज्यपाल या समाजाचा १ सदस्य नामनिर्देशित करू शकतात. (२३वी घटनादुरुस्ती, १९६९)

**सारांश:**

एकंदरीतच भारतीय लोकशाहीच्या निवडणुकांचा आधारस्तंभ हा भारतीय निवडणूक आयोग आहे. निवडणूक आयोगाची  मतदान प्रक्रियेची संपूर्ण प्रक्रिया पाहता ही प्रक्रिया अत्यंत व्यापक स्वरूपाचे असल्याचे दिसून येते.त्यामध्ये प्रामुख्याने मतदार यादी  तयार करण्यापासून ते मतदान घेऊन मतदानाचा निकाल लावण्यापर्यंत व निवडणुका शांततामय व नि: पक्षपातीपणे पार पाडण्याची जबाबदारी ही निवडणूक आयोगाची आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. राजकीय पक्ष आणि निवडणुका संदर्भातील निवडणूक आयोगाची भूमिका स्पष्ट करा.

२. भारतीय संविधानातील निवडणूक विषयक तरतुदी स्पष्ट करा.

## १.६ भारताचे सध्याचे मुख्य निवडणूक आयुक्त व माजी निवडणूक आयुक्त:

निवडणूक आयोग स्थापन झाल्यापासून ते आजपर्यंत जवळपास २५ मुख्य निवडणूक आयुक्तांनी निवडणूक आयोगात काम केलेले आहे. प्रत्येक मुख्य निवडणूक आयुक्तांच्या काळात निवडणुकांमध्ये सुधारणा करण्याचा व नि:पक्षपतीपणा आणण्याचा विचार करण्यात आलेला आहे.



**सध्याचे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून राजीव कुमार यांनी १५ मे २०२२ रोजी २५ वे पदभार स्वीकारला आहे.**

# भारताचे माजी मुख्य निवडणूक आयुक्त




## माहितीस्तव:

## २०१९ च्या  लोकसभा निवडणुकीमध्ये राजकीय पक्षांनी नोंदवलेला सहभाग

राष्ट्रीय पक्ष ०७

प्रादेशिक पक्ष ४३

नोंदणीकृत पक्ष ६२३

**अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ सूची**:


- Core-Committee on Electoral Reforms, Background Paper on Electoral Reforms, 2010, Legislative Department, Ministry of Law and Justice,Government of India, Co-sponsored by the Election Commission of India

- Goswami Report on the Committee on Electoral Reforms, 1990, Ministry of Law and Justice, Government of India

- Chambers "Twentieth Century Dictionary", Rev. Thomas Davidson, (1948) 298. Heamshaw: Democracy of the Crossways, from R.C. Agarwal, Principles of Political Science (1982)


❇❇❇❇❇❇❇

# २

# निवडणूक प्रक्रिया

**घटक रचना**

२.१ उद्दिष्टे

२.२ प्रास्ताविक

२.३ विषय विवेचन

२.३.१ निवडणूक प्रक्रिया

२.३.२ वेगवेगळ्या मतदान पद्धती

२.३.३ भारतातील निवडणूक प्रणाली आणि मतदान पध्दती

२.४ लोकप्रतिनिधी कायदा आणि निवडणूक सुधारणा: ६१ वी घटना दुरुस्ती

२.५ निवडणूक सुधारणा समित्या व सुधारणांचे प्रस्ताव

२.५.१ निवडणूक आयोगाने निवडणूक सुधारणा विषयक केलेल्या महत्त्वाच्या सुधारणा

२.५ २ निवडणूक आयोगासमोर प्रस्तावित असलेल्या महत्त्वाच्या निवडणूक सुधारणा

## २.१ उद्दिष्टे:

"निवडणूक" प्रक्रिया या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला पुढील बाबी समजून घेण्यास मदत होईल.

१. निवडणूक प्रक्रिया म्हणजे काय हे स्पष्ट करता येईल.

२. लोकशाही व्यवस्थेतील मतदानाचे स्थान व महत्त्व स्पष्ट करता येईल.

३. निवडणूक प्रक्रियेतील सुधारणा विषयक बाबी स्पष्ट करता येतील.

४. लोकशाही व्यवस्था कार्यक्षम करण्यासाठी निवडणूक प्रक्रियेतून विविध कार्य कशी पार पाडली जातात हे स्पष्ट करता येईल.

## २.२ प्रास्ताविक:

जगभरातील अनेक उदयोन्मुख लोकशाहीसाठी भारत एक मॉडेल म्हणून उभा आहे. मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका हे चांगल्या पद्धतीने चालणाऱ्या लोकशाहीचे वैशिष्ट्य आहे. भारतीय लोकशाहीचा आपल्याला न्याय्य अभिमान असला तरी, लोकशाहीची खरी क्षमता ओळखण्यासाठी लोकशाहीतील अनेक क्षेत्रे बळकट करणे आवश्यक आहे. त्यामध्ये प्रामुख्याने निवडणूक प्रणाली, उमेदवार निवडीपासून ते निवडणूक प्रचारात निधी उभारण्याच्या आणि खर्च करण्याच्या पद्धतीत बदलांची नितांत गरज आहे.आपल्या निवडणूक पद्धतीच्या अनेक पैलूंबद्दल भारतात गेल्या काही वर्षांपासून अनेक प्रश्न निर्माण होत

आहेत.त्या प्रश्नांवर उत्तर म्हणून निवडणूक आयोगाने काही समस्यांना उत्तर देण्यासाठी अनेक क्षेत्रांमध्ये बदल केले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने निवडणूक सुधारणा करण्यासाठी अनेक समित्या स्थापन झालेल्या आहेत. त्यांनी आपल्या निवडणूक व्यवस्थेशी संबंधित प्रमुख समस्यांचे परीक्षण केले आहे आणि अनेक शिफारसी केल्या आहेत. परंतु काही गंभीर समस्या निवडणूक प्रक्रियेत आजही आहेत ज्यात आवश्यक बदल घडवून आणण्यासाठी कायदेशीर कारवाईची आवश्यकता आहे.

## २.३ विषय विवेचन:

### २.३.१ निवडणूक प्रक्रिया:

लोकशाही शासन पद्धतीत मतदान प्रक्रियेला अनन्य साधारण महत्त्व आहे. देशाचा कारभार चालवण्यासाठी, नवीन सरकार निवडण्यासाठी योग्य काळात निवडणूक घेणे बंधनकारक आहे. निवडणुकीच्या माध्यमातून वेगवेगळे राजकीय पक्ष आपला जनाधार वाढवण्याचा व सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात. तसेच वेगवेगळ्या संघटना, वेगवेगळे दबाव गट निवडणुकीच्या माध्यमातून लोकांचा विश्वास साध्य करण्याचा प्रयत्न करतात. एकंदरीतच देशाच्या विकासासाठी लोकांनी स्वईच्छेने व निर्भयतेने मतदान करणे अपेक्षित आहे. त्यासाठी निवडणूक प्रक्रिया ही पारदर्शक व नि:पक्षपाती असली पाहिजे तरच खऱ्या अर्थाने लोकशाही सक्षम होईल त्या दृष्टिकोनातून विचार करता देशातील निवडणूक प्रक्रियेची संपूर्ण जबाबदारी ही निवडणूक आयोगावर टाकण्यात आलेली आहे. निवडणूक प्रक्रियेतील सगळ्यात महत्त्वाचा टप्पा म्हणजे मतदान पद्धती होय.एकंदरीतच लोकशाही प्रक्रियेमध्ये ज्या उमेदवाराला बहुसंख्य मते मिळतात तो लोकशाहीत जिंकतो.आज लोकशाहीमध्ये निवडणुकीचे महत्त्व वाढल्यामुळे जसा जसा निवडणुकीचा वापर वाढत गेला तस तसा त्या निवडणुकीचे स्वरूपही बदलत गेलेले आहेत. त्यातून विविध मतदान पद्धती ह्या अस्तित्वात आलेल्या आहेत.त्याचीही निवडणूक प्रक्रियेमध्ये आपल्याला चर्चा करणे गरजेचे ठरते.निवडणुकांमध्ये प्रामुख्याने प्रत्यक्ष निवडणूक पद्धत आणि अप्रत्यक्ष निवडणूक पद्धत ही मोठ्या प्रमाणात वापरली जाते.

**प्रत्यक्ष निवडणूक पद्धत:**

या प्रक्रियेमध्ये होऊ घातलेल्या निवडणुकीमध्ये अनेक उमेदवार निवडणुकीस उभे राहतात.या निवडणुकीसाठी प्रत्यक्ष मतदान होते. त्यामध्ये प्रत्येक देशामध्ये मतदानाच्या अधिकाराची काही वयोमर्यादा आहे ती वेगवेगळी आहे. भारतात १८ वर्षावरील सर्व नागरिकांना मतदानाचा अधिकार देण्यात आलेला आहे. एकंदरीतच निवडणुकीच्या माध्यमातून जी काही मतदानाची प्रक्रिया या ठिकाणी पार पडते त्या प्रक्रियेमध्ये भारतात १८ वर्षावरील सर्व मतदार मतदान प्रक्रियेमध्ये सहभागी होतात व ते प्रत्यक्ष आपल्या मतदानाचा हक्क बजावतात. मतदानाची प्रक्रिया पार पडल्यानंतर झालेल्या मतदानाची नोंदणी केली जाते. नंतर मतदान प्रक्रियेतील शेवटचा टप्पा म्हणजे मतमोजणी करणे आणि मतमोजणी झाल्यानंतर ज्या उमेदवाराला सर्वाधिक मते मिळतात तो निवडून आला असे जाहीर केल्या जाते. ही पद्धत प्रामुख्याने इंग्लंड, अमेरिका, भारत इत्यादी देशात वापरली जाते.

**अप्रत्यक्ष निवडणूक पद्धत:**

अप्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेमध्ये ज्या ठिकाणी मतदारसंघ खूप मोठा आहे व निवडून द्यावयाचे जे काही प्रतिनिधी आहेत त्या प्रतिनिधीच्या संदर्भात सापेक्ष आणि जागृत पद्धतीने मतदान व्हावे अशी अपेक्षा असते आणि ही अपेक्षा सामान्य मतदाराकडून होण्याची शक्यता कमी असते त्यावेळी त्या ठिकाणी अप्रत्यक्ष निवडणुकीचा वापर केला जातो.या निवडणुकीसाठी एक मतदार समूह (Electrol College) तयार केला जातो. या मतदार समूहमार्फत आपल्या प्रतिनिधीची निवड केली जाते.या प्रक्रियेमध्ये सर्वप्रथम देशातील मतदार आपले प्रतिनिधी निवडतात व निवडलेले प्रतिनिधी आपला प्रतिनिधी निवडून देतात.भारतात राष्ट्रपती, उपराष्ट्रपतीची निवडणूक या पद्धतीने केली जाते.

**२.३.२ वेगवेगळ्या मतदान पद्धती:**

मतदान प्रक्रियेच्याद्वारे लोक आपला प्रतिनिधी निवडतात. लोकांनी आपले प्रतिनिधी ज्यावेळेस निवडून दिलेले असतात त्यावेळेस मतदारांचा प्रतिनिधित्व करणाऱ्या प्रतिनिधीमध्ये निवडून देणाऱ्या मतदारांचे प्रतिबिंब पडलेले असावे अशी अपेक्षा असते. कारण त्यावेळी ते खऱ्या अर्थाने मतदारांचे प्रतिनिधित्व करताना आपल्याला दिसून येतात. मतदानामध्ये आपले प्रतिनिधित्व उमटावे यासाठी मतदानाच्या वेगवेगळ्या पद्धती उपलब्ध आहेत त्या पुढील प्रमाणे.

**१. सापेक्ष बहुमत निवड पद्धती:**

सापेक्ष बहुमत निवड पद्धतीत एका पदासाठी अनेक उमेदवार निवडणूक रिंगणात असतात.ज्या उमेदवाराला सर्वाधिक मते मिळतात तो उमेदवार निवडून आला असे जाहीर केल्या जाते. एकंदरीतच ही मतदान पद्धती एखाद्या शर्यतीसारखी आहे. म्हणजे जो शर्यतीत पहिला येतो तो शर्यत जिंकतो तसाच साधर्म्यपणा या मतदान पद्धतीमध्ये असल्याचे आपल्याला दिसून येते.

**२. पुनरमतदान पद्धती:**

सर्वसामान्यपणे आपल्या परिचयाची सापेक्ष बहुमत निवड पद्धती ही आहे. परंतु सापेक्ष बहुमत पद्धतीतील दोष कमी करण्यासाठी या पुनरमतदान पद्धतीचा वापर केला जातो. या मतदान पद्धतीमध्ये पहिल्या मतदारानंतरही कोणत्याही उमेदवारास स्पष्ट बहुमत मिळाले नसेल तर सर्वाधिक मते मिळालेल्या पहिल्या दोन उमेदवारात पुन्हा लढत होते. या प्रक्रियेमध्ये ज्याला अधिक मते पडतील तो निवडून येतो प्रामुख्याने ही पद्धत फ्रान्सच्या राष्ट्राध्यक्ष निवडीसाठी वापरली जाते. ही पद्धत बहुमत तपासण्यासाठी योग्य असली तरी या पद्धतीमध्ये दोन वेळा मतदान घेणे आवश्यक असते तसेच या मतदान पद्धतीत अधिक पैसा व वेळ लागतो.

**३. प्रमाणशीर मतदान पद्धती:**

या मतदानपद्धतीमध्ये,प्रत्येक मतदाराला केवळ एकच मत असेल परंतु मतदारास, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांपैकी तो इच्छिल तेवढ्या,उमेदवारांना आपल्या प्राथम्यक्रमानुसार किंवा पसंतीक्रमानुसार पसंतीक्रम दर्शविता येतात.भारताच्या राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकी साठी, राज्यसभा सदस्य, विधान परिषद सदस्यांसाठी ही मतदान पद्धती वापरल्या जाते. या पद्धतीला प्रमाणशीर प्रतिनिधित्व पध्दत किंवा एकल संक्रमणय मतदान पद्धती असे म्हणतात. या मतदान पद्धतीमध्ये निवडून येण्यासाठी एका सूत्रानुसार किमान मते मिळवणे आवश्यक असते यालाच कोटा असे म्हणतात.

**सुत्र**

**एकूण वैध मत संख्या +१**

—-------------------------------------------------

**निवडून द्यावयाच्या प्रतिनिधीची संख्या+१**

**४. यादी पद्धती:**

प्रमाणशीर मतदान पद्धतीची आणखी एक महत्त्वाची पद्धती म्हणजेच यादी पद्धती होय. यामध्ये प्रत्येक पक्ष आपल्या उमेदवारांची यादी तयार करतो. जितक्या जागा भरायच्या तितकी नावे प्रत्येक यादीत असतात. मतदार आपले मत एका विशिष्ट उमेदवारास न देता त्या पक्षास देतो आणि सर्व पक्षांना मिळालेल्या मताच्या प्रमाणात विधिमंडळात सदस्यत्व मिळते.

**५. संचयी मतदान पद्धती:**

या मतदान पद्धतीद्वारे जितके प्रतिनिधी निवडून द्यायचे तितकी मते प्रत्येक मतदाराला देता येतात. तसेच याच मतदान पद्धतीमध्ये मतदाराला आणखी एक सवलत दिल्या जाते ती म्हणजे तो आपली सर्व मते एकाच उमेदवारास देऊ शकतो.

### २.३.३ भारतातील निवडणूक प्रणाली आणि मतदान पध्दती :

भारतात मतदान गुप्त मतदानाद्वारे होते. मतदान केंद्रे सहसा सार्वजनिक संस्था, जसे की शाळा आणि ग्रामपंचायत नगरपालिकेच्या हॉलमध्ये स्थापित केली जातात. मतदाराला २ किलोमीटरपेक्षा जास्त प्रवास करू नये यासाठी निवडणूक आयोग सर्वतोपरी प्रयत्न करतो. मतदान केंद्रावर पोहोचण्यासाठी प्रत्येक मतदान केंद्रासाठी मतदारांची संख्या १२०० च्या आत ठेवण्याचाही प्रयत्न केला जातो. निवडणुकीच्या दिवशी प्रत्येक मतदान केंद्र किमान ८ तास खुले असते. मतदान केंद्रात प्रवेश केल्यावर, मतदाराची मतदार यादीत तपासणी केली जाते आणि ओळख दस्तऐवजाची पडताळणी केली जाते, डाव्या हाताच्या बोटावर शाई लावली जाते आणि मतदार स्लिप दिली जाते आणि मतदाराला मतपत्रिकेतील बॅलेट बटण सक्रिय करून मतदान करण्याची परवानगी दिली जाते.

लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकात मतदार त्यांच्या पसंतीच्या उमेदवाराला मत देतात. सर्वाधिक मते मिळवणाऱ्या उमेदवाराला निवडणुकीत विजयी उमेदवार घोषित केल्या जाते. या निवडणूक प्रणालीस फर्स्ट पास्ट द पोस्ट किंवा फ्युडॅलिटी ऑफ वोट सिस्टीम असे म्हणले जाते.उदाहरणार्थ एखाद्या मतदारसंघात १००००० मतदार संख्या आहे. समजा त्या मतदारसंघात ८० टक्के मतदान झाले तर ८०००० मतदान त्या ठिकाणी होते.निवडणुकीसाठी एकूण पाच उमेदवार उभे आहेत. एका उमेदवाराला ३५००० मते मिळाली, दुसऱ्या उमेदवारास ३०००० मते मिळाली, तिसऱ्या उमेदवारास १०००० मते मिळाली, चौथ्या उमेदवारास ३००० मते मिळाली, पाचव्या उमेदवारास २००० मते मिळाली तर त्या निवडणुकीत ३५ हजार मते मिळवणारा उमेदवार विजयी होतो. वास्तविक पाहता त्या उमेदवाराच्या विरोधात ५५ हजार मते जरी पडली असली तरी ती पंचावन्न हजार मते ही वेगवेगळ्या उमेदवारात विभागलेली गेलेली आहेत हे लक्षात घेणे गरजेचे आहे.तसेच राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, राज्यसभा सदस्य, विधान परिषद सदस्य यांच्या निवडणुकीत प्रमाणशीर मतदानाची पद्धतही वापरली जाते.

मतदान संपल्यानंतर, निवडणूक आयोगाने नियुक्त केलेल्या रिटर्निंग ऑफिसर आणि निरीक्षकांच्या देखरेखीखाली ईव्हीएममध्ये टाकलेल्या मतांची मोजणी केली जाते. मतमोजणी संपल्यानंतर, रिटर्निंग ऑफिसर ज्या उमेदवाराला सर्वात जास्त मते मिळाली आहेत त्या उमेदवाराचे नाव विजयी म्हणून घोषित करतात.

**सारांश:**

लोकशाही शासन पद्धतीत मतदान प्रक्रियेला अनन्य साधारण महत्त्व आहे. लोकशाहीत निवडणुकीची जी काही प्रक्रिया आहे ती प्रक्रिया प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष पद्धतीने पार पाडली जाते. लोकशाहीतील निवडणुकांची जी काही प्रक्रिया आहे त्या प्रक्रियेसाठी अनेक मतदानाच्या पद्धती विकसित करण्यात आलेल्या आहेत त्या पद्धतीचा वापर मोठ्या प्रमाणात निवडणुकांसाठी वेगवेगळ्या देशांमध्ये केला जातो.

**आपली प्रगती तपासा**

१. निवडणूक पद्धती स्पष्ट करा.

____________________

____________________

____________________

____________________

२. भारतातील निवडणूक प्रणाली स्पष्ट करा.

____________________

____________________

____________________

## २.४ लोकप्रतिनिधी कायदा आणि निवडणूक सुधारणा: ६१ वी घटना दुरुस्ती

लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० मध्ये पाच भाग असून ३२ कलमे दिलेली आहेत.जागांचे वाटप व मतदारसंघांचे परिसीमन लोकसभा,राज्य विधानसभा,संसदीय व विधानसभा मतदारसंघ परिसीमन आदेश, राज्य विधानपरिषदा,मतदारसंघांचे परिसीमन करणाऱ्या आदेशांबाबत उपबंध इ. सविस्तर विवेचन केलेले आहे.

**१.लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५०**

लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० मध्ये एकूण ५ भाग असून ३२ कलमे त्यात दिली आहेत ती पुढील प्रमाणे.

**भाग एक प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव.

२. व्याख्या.

**भाग दोन**

**जागांचे वाटप व मतदारसंघांचे परिसीमन लोकसभा**

३. लोकसभेतील जागांचे वाटप.

४. लोकसभेतील जागा भरणे व संसदीय मतदारसंघ.

५-६. [ निरसित ].

**राज्य विधानसभा**

७. विधानसभांमधील जागांची एकूण संख्या व विधानसभा मतदारसंघ.

७.क. सिक्किम विधानसभेतील जागांची एकूण संख्या व विधानसभा मतदारसंघ.

**संसदीय व विधानसभा मतदारसंघ परिसीमन आदेश**

८. परिसीमन आदेशांचे संकलन.

९. परिसीमन आदेश अद्ययावत ठेवण्याची निवडणूक आयोगाची शक्ती.

९क. निवडणूक आयोगाची विवक्षित राज्यांमध्ये अनुसूचित जनजातींसाठी राखीव मतदारसंघ निश्चित करण्याची शक्ती.

९ख. निवडणूक आयोगाची त्रिपुरा राज्यामध्ये अनुसूचित जनजातीसाठी राखीव मतदारसंघ निश्चित करण्याची शक्ती.

**राज्य विधानपरिषदा**

१०. विधानपरिषदांमधील जागांचे वाटप .

११. विधानपरिषद मतदारसंघाचे परिसीमन.

**मतदारसंघांचे परिसीमन करणाऱ्या आदेशांबाबत उपबंध**

१२. आदेशांत फेरबदल किंवा विशोधन करण्याची शक्ती .

१३. मतदारसंघाचे परिसीमन करणाऱ्या आदेशांबाबतची प्रक्रिया .

**भाग दोन - क अधिकारी**

१३ क. मुख्य निर्वाचन अधिकारी.

१३ कक. जिल्हा निवडणूक अधिकारी.

१३ ख. मतदार नोंदणी अधिकारी .

१३ ग. सहायक मतदार नोंदणी अधिकारी .

१३ गग. मुख्य मतदान अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी इ. निवडणूक आयोगाकडे प्रतिनियुक्तीवर असल्याचे मानण्यात येणे.

**भाग दोन - ख**

**संसदीय मतदारसंघासाठी मतदार याद्या**

१३ घ. संसदीय मतदारसंघांसाठी मतदार याद्या .

**भाग तीन**

**विधानसभा मतदारसंघांसाठी मतदार याद्या**

१४. व्याख्या.

१५. प्रत्येक मतदारसंघाची मतदार यादी.

१६. मतदार यादीत नोंदणी होण्याबाबत निरर्हता.

१७. कोणत्याही व्यक्तीची एकापेक्षा अधिक मतदारसंघांमध्ये नोंदणी करावयाची नाही.

१८. कोणत्याही व्यक्तीची कोणत्याही मतदारसंघामध्ये एकापेक्षा अधिक वेळा नोंदणी करावयाची नाही.

१९. नोंदणीच्या शर्ती.

२०. " सर्वसामान्यपणे रहिवासी " याचा अर्थ.

२१. मतदार याद्या तयार करणे व सुधारणे.

२२. मतदार यादीतील नोंदीची दुरुस्ती.

२३. मतदार यादीत नावांचा समावेश करणे.

२४. अपिले.

२५. अर्ज व अपिले यांसाठी फी

२५ क. सिक्कीममधील संघ मतदारसंघात मतदार म्हणून नोंदणी करण्याबाबतच्या शर्ती.

**भाग चार**

**विधानपरिषद मतदारसंघांसाठी मतदार याद्या**

२६. [निरसित]

२७. विधानपरिषद मतदारसंघासाठी मतदार याद्या तयार करणे.

**भाग चार क**

**राज्यसभेतील ज्या जागा संघ राज्यक्षेत्रांच्या प्रतिनिधींनी भरावयाच्या त्या जागा भरण्याची रीत**

२७ क. राज्यसभेत संघ राज्यक्षेत्रांना वाटून दिलेल्या जागा भरण्यासाठी निर्वाचकगण बनवणे.

२७ ख. [निरसित].

२७ ग. [निरसित].

२७ घ. [ निरसित] .

२७ ङ. [निरसित].

२७ च. [निरसित].

२७ छ. विवक्षित निरर्हतांमुळे निर्वाचकगणाच्या सदस्यत्वाची समाप्ती .

२७ ज. राज्यसभेत संघ राज्यक्षेत्राला वाटून दिलेल्या जागा भरण्याची रीत .

२७ झ. [निरसित].

२७ ञः. निर्वाचकराणांमधील जागा रिकाम्या असल्या तरी निवडून देण्याची त्यांची शक्ती.

२७ ट. [निरसित].

**भाग पाच**

**सर्वसाधारण**

२८. नियम करण्याची शक्ती.

२९. स्थानिक प्राधिकरणांचा कर्मचारीवर्ग उपलब्ध करून देणे.

३०. दिवाणी न्यायालयांच्या अधिकारितेला आडकाठी असणे.

३१. खोटी अधिकथने करणे.

३२. मतदार याद्या तयार करणे, इत्यादींच्या संबंधातील पदीय कर्तव्याचा भंग.

पहिली अनुसूची - लोकसभेतील जागांचे वाटप.

दुसरी अनुसूची - विधानसभांमधील जागांची एकूण संख्या

तिसरी अनुसूची - विधानपरिषदांतील जागांचे वाटप.

चौथी अनुसूची - विधानपरिषदांच्या निवडणूकीच्या प्रयोजनासाठी स्थानिक प्राधिकरणे.

पाचवी अनुसूची- [निरसित]

सहावी अनुसूची- [निरसित]

सातवी अनुसूची- [निरसित]

**२.लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१**

लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ मध्ये ११ भाग असून १७१ कलमे दिलेली आहेत.

**भाग एक प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव.

२. व्याख्या.

**भाग दोन**

**अहर्ता आणि निरहर्ता**

**प्रकरण एक**

**संसदेच्या  सदस्यत्वासाठी अहर्ता**

३.	लोकसभेच्या सदस्यात्वासाठी अहर्ता

४.	राज्यसभेच्या सदसत्वासाठी अहर्ता

**प्रकरण दोन**

**राज्य विधान मंडळाच्या सदस्यासाठी अहर्ता**

५.	विधानसभेच्या सदस्यात्वासाठी अहर्ता

५क. सिक्कीम विधानसभेच्या सदस्यात्वासाठी अहर्ता

६.	विधान परिषदेच्या सदस्यात्वासाठी अहर्ता

**प्रकरण तीन**

**संसदेच्या आणि राज्य विधान मंडळाच्या सदस्यत्वाबाबतच्या निरहर्ता**

७.	व्याख्या

८.	विवक्षित अपराधा बद्दल दोषसिद्धी झाल्यामुळे निरहर्ता

८क. भ्रष्टाचाराच्या कारणावरून निरहर्ता

९.	भ्रष्टाचार किंवा राजदृढ यामुळे बर्डतर्फ झाल्यावर निरहर्ता

९क. शासकीय कंत्राटे इत्यादी बद्दल निरहर्ता

१०. सरकारी कंपनीतील पदामुळे निरहर्ता

१०क. निवडणूक खर्चाचा हिशोब देण्यात कसूर केल्याबाबत निरहर्ता

११.	निरहर्ता दूर करणे किंवा त्याचा कालावधी कमी करणे

**प्रकरण चार**

**मतदानाबाबतच्या निरर्हता**

११ क.	दोषसिद्धी आणि भ्रष्टाचार यातून उद्भवणारी निरर्हता

११ ख.	निरर्हता दूर करणे

**भाग तीन**

**सार्वत्रिक निवडणुकांबाबत अधिसूचना**

१२. राज्यसभेच्या द्वैवार्षिक निवडणुकांबाबत अधिसूचना

१२क.राज्यसभेमध्ये सिक्कीम राज्याला वाटून दिलेल्या जागा भरण्यासाठी घ्यावयाच्या निवडणुकीच्या अधिसूचना

१३. [ निरसित ]

१४. लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीबाबत अधिसूचना .

१४क.विद्यमान लोकसभेवर सिक्कीम राज्याचा प्रतिनिधी निवडण्याकरिता अधिसूचना

१५. राज्य विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीबाबत अधिसूचना

१५.क विधानपरिषदेच्या विशिष्ट निवडणुकीबाबत अधिसूचना

१६. राज्य विधानपरिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीबाबत अधिसूचना

**भाग चार**

**निवडणूक संचलनासाठी प्रशासकीय यंत्रणा**

१९. व्याख्या

१९क. निवडणूक आयोगाच्या कार्याधिकारांचे प्रत्यायोजन

२०. मुख्य निर्वाचन अधिकाऱ्यांची सर्वसाधारण कर्तव्ये

२० क.जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांची सर्वसाधारण कर्तव्ये

२०ख.अभीक्षण

२१. निवडणूक निर्णय अधिकारी

२२. सहायक निवडणूक निर्णय अधिकारी

२३. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची कार्य करणाऱ्या सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा निवडणूक निर्णय अधिकारी या संज्ञेत समावेश असावयाचा

२४.निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचे सर्वसाधारण कर्तव्य

२५. मतदारसंघासाठी मतदान केंद्रांची व्यवस्था करणे

२६. मतदान केंद्रांसाठी मतदान केंद्राध्यक्षांची नियुक्ती

२७. मतदान केंद्राध्यक्षाचे सर्वसाधारण कर्तव्ये

२८. मतदान अधिकाऱ्यांची कर्तव्य

२८क. निवडणूक निर्णय अधिकारी,पीठासीन अधिकारी इ. यांना निवडणूक आयोगावर प्रतिनियुक्त केलेले अधिकारी म्हणून समजणे

२९. विवक्षित निवडणुकांच्या बाबतीत विशेष उपबंध

**भाग चार क**

**राजकीय पक्षांची नोंदणी**

२९क. संघटना व निगम याची राजकीय पक्ष म्हणून नोंदणी निवडणूक आयोगाकडे करणे बाबत

**भाग पाच**

**निवडणुकीचे चलन**

**प्रकरण एक**

**उमेदवारांचे नामनिर्देशन**

३०. नामनिर्देशन, इत्यादीसाठी दिनांक नियत करणे

३१. निवडणुकीची जाहीर नोटीस

३२. निवडणुकीसाठी उमेदवारांचे नामनिर्देशन

३३.नामनिर्देशनपत्र दाखल करणे आणि विधिग्राह्य

३४.नामनिर्देशनासाठी आवश्यक गोष्टी

३५.नामनिर्देशनांची नोटीस व त्यांच्या छाननीची वेळ व जागा

३६. नामनिर्देशनांची छाननी

३७. उमेदवारी मागे घेणे

३८. निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे

३९. इतर निवडणुकांमधील उमेदवारांचे नामनिर्देशन

**प्रकरण दोन**

**उमेदवार आणि त्याचे प्रतिनिधी**

४०. निवडणूक प्रतिनिधी

४१. निवडणूक प्रतिनिधी होण्याबाबत निरर्हता

४२. निवडणूक प्रतिनिधीची नियुक्ती प्रत्याहृत करणे किंवा त्याचा मृत्यू होणे

४३. [निरसित]

४४. [निरसित]

४५. निवडणूक प्रतिनिधीची कार्ये

४६. मतदान प्रतिनिधींची नियुक्ती

४७. मतमोजणी प्रतिनिधींची नियुक्ती

४८. मतदान प्रतिनिधी किंवा मतमोजणी प्रतिनिधी यांची नियुक्ती प्रत्याहृत करणे किंवा त्याचा मृत्यू होणे.

४९. मतदान प्रतिनिधी आणि मतमोजणी प्रतिनिधी यांची कार्ये

५०. निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने मतदान केंद्रावर उपस्थित राहणे आणि त्याने मतदान प्रतिनिधीची किंवा मतमोजणी प्रतिनिधीची कामे पार पाडणे

५१. मतदान प्रतिनिधीची किंवा मतमोजणी प्रतिनिधीची अनुपस्थिती

**प्रकरण तीन**

**निवडणुकांमधील सर्वसाधारण कार्यपद्धती**

५२. मतदानापूर्वी उमेदवाराचा मृत्यू होणे .

५३. लढवलेल्या आणि न लढवलेल्या निवडणुकांबाबतची कार्यपद्धती .

५४. ज्या मतदारसंघातील जागा अनुसूचित जातीसाठी किंवा अनुसूचित जनजातींसाठी राखून ठेवलेल्या असतात त्या मतदारसंघातील निवडणुकांबाबत विशेष कार्यपद्धती .

५५. अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जनजाती यांच्याकरता राखून न ठेवलेल्या जागा भरण्यास त्या जातीचे किंवा जनजातीचे सदस्य पात्र असणे .

५६. [निरसित]

**प्रकरण चार**

**मतदान**

५६. मतदानासाठी वेळ निश्चित करणे

५७. आणीबाणीच्या प्रसंगी मतदान तहकूब करणे

५८. मतपेटया नष्ट करणे, इत्यादीबाबतीत नव्याने मतदान

५८ क. बूथ ताब्यात घेण्याच्या कारणावरून मतदान तहकूब करणे किंवा निवडणूक प्रत्यार्देशित करणे

५९ . निवडणुकीत मतादन करण्याची पद्धती

६०. विपक्षित व्यक्तिवर्गांनी करावयाच्या मतदानासाठी विशेष प्रक्रिया

६१. मतदार म्हणून तोतयेगिरी करण्यास आळा घालण्यासाठी विशेष प्रक्रिया

६१ क . निवडणुकीत मतदान यंत्रे

६२. मतदानाचा अधिकार

६३. [ निरसित ]

**प्रकरण पाच**

**मतमोजणी**

६४. मतमोजणी

६४ क. मतमोजणीच्या वेळी मतपत्रिका नष्ट होणे , गहाळ होणे इत्यादी

६५. समसमान मते

६६. निकाल जाहीर करणे

६७. निकाल कळवणे

६७ क. उमेदवाराच्या निवडणुकीचा दिनांक

**प्रकरण सहा**

**बहुविध निवडणुका**

६८. संसदेच्या दोन्ही सभागृहांवर निवड झालेली असताना जागा रिकाम्या करणे

६९. अगोदरपासून एका सभागृहाचे सदस्य असणाऱ्या व्यक्ती संसदेच्या दुसऱ्या सभागृहासाठी निवडून आल्यावर पहिल्या सभागृहातील जागा रिकाम्या करणे

७०. लोकसभेच्या दोहोंपैकी एका सभागृहातील किंवा राज्याच्या विधानमंडळाच्या सभागृहातील किंवा त्याच्या दोहोंपैकी एका सभागृहातील एकापेक्षा अधिक जागांवर निवडून येणे

**प्रकरण सात**

**निवडणुकीचे निकाल आणि नामनिर्देशन प्रकाशित करणे**

७१. राज्यसभेच्या निवडणुकांचे निकाल आणि अध्यक्षाने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तींची नावे प्रकाशित करणे

७२. [निरसित]

७३. लोकसभेच्या आणि राज्य विधानसभांच्या सार्वत्रिक निवडणुकांचे निकाल प्रकाशित करणे

७३ क. विवक्षित निवडणुकांसाठी विशेष उपबंध

७३ कक विवक्षित निवडणुकांसाठी विशेष उपबंध

७४. राज्य विधानपरिषदांच्या निवडणुकांचे निकाल व अशा परिषदांवर नामनिर्देशित केलेल्या व्यक्तींची नावे प्रकाशित करणे .

**प्रकरण आठ**

**निवडणूक खर्च**

७६. प्रकरणाची प्रयुक्ती .

७७. निवडणूक खर्चाचा हिशेब आणि त्याची कमाल मर्यादा ७८.जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडे हिशेब दाखल करणे

**भाग सहा**

**निवडणुकीविषयीचे तंटे**

**प्रकरण एक**

**निर्वाचन**

७९. व्याख्या

**प्रकरण दोन**

**उच्च न्यायालयाला निवडणूक तक्रार अर्ज सादर करणे**

८०. निवडणूक तक्रार अर्ज

८०क. उच्च न्यायालयाने निवडणूक तक्रार अर्जाची संपरीक्षा करणे

८१. तक्रार अर्ज सादर करणे

८२. तक्रार अर्जातील पक्षकार

८३. तक्रार अर्जातील मजकूर

८४. तक्रारअर्जदाराला मागता येईल असा अनुतोष

८५. [निरसित]

**प्रकरण तीन**

**निवडणूक तक्रार अर्जांची संपरीक्षा**

८६. निवडणूक तक्रारअर्जांची संपरीक्षा

८७. उच्च न्यायालयापुढील कामकाजाची पद्धती

९३. कागदोपत्री पुरावा

९४. मतदानाच्या गुप्ततेचा भंग करावयाचा नाही

९५. गुन्ह्यात गोवणाऱ्या प्रश्नांना उत्तरे देणे आणि दायित्वनिराकरण प्रमाणपत्र

९६. साक्षीदारांचा खर्च

९७. जागेबाबत दावा सांगितला असता प्रत्यारोप करणे

९८. उच्च न्यायालयाचा निर्णय

९९. उच्च न्यायालयाने द्यावयाचे आदेश

१००. निवडणूक रद्दबातल असल्याचे घोषित करण्यासाठी लागणारी कारणे

१०१. निर्वाचित उमेदवारापेक्षा वेगळा उमेदवार निवडून आल्याचे ज्या कारणास्तव घोषित करता येईल ती कारणे

१०२. मते समसमान झाल्यास त्याबाबतीत अनुसरावयाची कार्यपद्धती

१०३. उच्च न्यायालयाचे आदेश कळविणे

१०४. [ निरसित ]

१०५. [ निरसित ]

१०६. समुचित प्राधिकरणाकडे आदेश पाठवणे आणि त्याचे प्रकाशन करणे .

१०७. उच्च न्यायालयाच्या आदेशांची परिणामकता

**प्रकरण चार**

**निवडणूक तक्रारअर्ज मागे घेणे व त्यांचे अवसान**

१०८. [ निरसित . ]

१०९. निवडणूक तक्रारअर्ज मागे घेणे .

११०.निवडणूक तक्रारअर्ज मागे घेण्याची कार्यपद्धती

११२.तक्रारअर्ज मागे घेतल्याचे वृत्त न्यायालयाने निवडणूक आयोगाला कळविणे .

११२. निवडणूक तक्रारअर्जाचे अवसान .

११६. उत्तरवादीच्या मृत्यूनंतर तक्रारअर्जाचे अवसान होणे किंवा बदली उत्तरवादी येणे

**प्रकरण चार क**

**अपिले**

११६क. सर्वोच्च न्यायालयाकडे अपिले .

११६ख. उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या प्रवर्तनास स्थगिती

११६ग. अपिलाबाबतची प्रक्रिया.

**प्रकरण पाच**

**खर्च आणि खर्चासाठी तारण**

११७. खर्चासाठी तारण

११८. उत्तरवादीकडून खर्चासाठी तारण

११९. खर्च

१२१. तारण अनामतीतून खर्च देणे आणि अशा अनामती परत करणे

१२२. खर्च वगैरेसंबंधीच्या आदेशांची अंमलबजावणी

**भाग सात**

**भ्रष्टाचारी प्रथा आणि निवडणूकविषयक अपराध -**

**प्रकरण एक**

**भ्रष्टाचारी प्रथा**

**१२३.भ्रष्टाचारी प्रथा**

**प्रकरण तीन**

**निवडणूकविषयक अपराध**

१२५. निवडणुकीसंबंधात विविध वर्गामध्ये वैरभाव वाढीला लावणे

१२६. निवडणुकीच्या आदल्या दिवशी आणि निवडणुकीच्या दिवशी जाहीर सभा भरवण्यास मनाई

१२७. निवडणूक सभांमध्ये अडथळा आणणे

१२७ क. पत्रके, भित्तिपतके, इत्यादींच्या मुद्रणावरील निर्बंध

१२८.मतदान गुप्त राखणे

१२९. अधिकारी इत्यादींनी निवडणुकीच्यावेळी उमेदवारासाठी काम करावयाचे नाही किंवा मतदाना संबंधात दडपण आणावयाचे नाही

१३०. मतदान केंद्रांमध्ये किंवा त्यांच्या जवळपास प्रचार करण्यास मनाई

१३१. मतदान केंद्रामध्ये किंवा त्यांच्या जवळपास गैरवर्तन केल्याबद्दल शिक्षा .

१३२. मतदान केंद्रांवरील गैरवर्तणुकीबद्दल शिक्षा.

१३२क.मतदानासाठी विहित केलेली प्रक्रिया अनुसरण्यास चुकल्याबद्दल शिक्षा

१३३. निवडणुकीच्यावेळी वाहने अवैधपणे आणण्याबद्दल शिक्षा

१३४. निवडणुकीसंबंधीच्या अधिकृत कर्तव्याचा भंग

१३४क.शासकीय कर्मचाऱ्याने निवडणूक प्रतिनिधी, मतदान प्रतिनिधी किंवा मतमोजणी प्रतिनिधी म्हणून काम करण्याबद्दल शिक्षा

१३४ख. शस्त्रे घेऊन मतदान केंद्रावर किंवा मतदान केंद्राजवळ जाण्यास मनाई

१३५. मतदान केंद्रावरून मतपत्रिका पळवणे हा गुन्हा होय

१३५क. बुथताब्यात घेण्याचा अपराध

१३५ख. मतदानाच्या दिवशी कर्मचाऱ्यांना भरपगारी सुटी मंजूर करणे

१३५ग. मतदानाच्या दिवशी मद्य विकणे , देणे किया वितरीत करणे यावर बंदी

१३६. इतर अपराध आणि त्याबद्दलच्या शिक्षा

१३७. [ निरसित ]

१३८. [ निरसित ]

**भाग आठ**

**निरर्हता**

१३८. ते १४५.[ निरसित ]

**प्रकरण चार**

**सदस्यांच्या निरर्हताविषयी करावयाच्या चौकशींच्या संबंधी**

१४६. निवडणूक आयोगाच्या निवडणूक आयोगाच्या शक्ती

१४६क. व्यक्तींनी निवडणूक आयोगापुढे दिलेल्या जबान्या

१४६ख. निवडणूक आयोगाने अनुसरावयाची कार्यपद्धती .

१४६ग. सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण

**भाग नऊ**

**पोट निवडणुका**

१४७. राज्यसभेतील निमित्तक्शात रिक्त होणाऱ्या जागा

१४८. [ निरसित ]

१४९. लोकसभेत निमित्तक्शातरिक्त होणारी जागा

१५०. राज्य विधानसभांतील निमित्तक्शातरिक्त होणाऱ्या जागा

१५१. राज्य विधानपरिषदांतील निमित्तक्शात रिक्त होणाऱ्या जागा

१५१क. कलमे १४७ , १४९ १५० व १५१ मध्ये निर्दिष्ट केलेल्या रिक्त जागा भरण्यासाठी वेळेची मर्यादा

**भाग दहा**

**संकीर्ण**

१५२. राज्य विधानसभांच्या आणि निर्वाचक गणांच्या सदस्यांची यादी संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी ठेवावयाची .

१५३. निवडणूक पूर्ण होण्यासाठी नेमलेली मुदत वाढवणे

१५४. राज्यसभेच्या सदस्यांचा पदावधी

१५५. राज्यसभेच्या सदस्यांचा पदावधीचा प्रारंभ

१५६. राज्य विधानपरिषद सदस्यांचा पदावधी

१५७. विधानपरिषदेच्या सदस्यांच्या पदावधीचा प्रारंभ

१५८. उमेदवाराची अनामत रकम परत करणे किंवा ती जप्त करणे .

१५९. प्रत्येक स्थानिक प्राधिकरणाचा कर्मचारी वर्ग निवडणूक कार्यासाठी उपलब्ध करून द्यावयाचा

१६०. निवडणूकीच्या प्रयोजनासाठी जागा , वाहने , इत्यादींचे अधिग्रहण करणे

१६१. नुकसानभरपाई देणे

१६२. माहिती मिळवण्याची शक्ती

१६३. वास्तू प्रत्यादीमध्ये प्रवेश करण्याची व पाहणी करण्याची शक्ती .

१६४. अधिग्रहण केलेल्या वास्तूमधून काढून लावणे

१६५. वास्तू अधिग्रहण मुक्त करणे

१६६. अधिग्रहणाच्या बाबतीत राज्य शासनाच्या कार्याधिकारांचे प्रत्यायोजन

१६७. अधिग्रहणाबाबतच्या कोणत्याही आदेशाने व्यतिक्रमण केल्याबद्दल शिक्षा

१६८ [ निरसित ]

**भाग अकरा**

**सर्वसाधारण**

१६९.नियम करण्याची शक्ती

१७०.दिवाणी न्यायालयाच्या अधिकारितेला अडकाठी

१७१. [ निरसित ]

संसदेच्या व राज्य विधिमंडळाच्या निवडणुकांचे संचालन करण्याची संपूर्ण जबाबदारी आणि नियमावली ही लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१मध्ये दिलेली आहे. सोबतच संसद आणि विधिमंडळ यांच्या पात्रता आणि निरर्हता या संदर्भातही महत्त्वपूर्ण कलमे या कायद्यात आहेत. एकंदरीतच १९५१ चा लोकप्रतिनिधी अधिनियम हा कायदा भारतीय निवडणूकांच्या संदर्भातील आत्मा ठरतो.

**निवडणूक सुधारणा: ६१ वी घटना दुरुस्ती**

घटनेच्या कलम ३२६ मध्ये अशी तरतूद आहे की लोकसभेच्या आणि प्रत्येक राज्याच्या विधानसभेच्या निवडणुका प्रौढ मताधिकाराच्या आधारावर होतील, असे नमूद करण्यात आलेले आहे. आपल्या देशात २१पूर्ण करणाऱ्यांना मतदानाचा अधिकार देण्यात आला होता. परंतु अनेक देशांनी मतदानाचे वय म्हणून १८ वर्षे केली आहेत. आपल्या देशात ही काही राज्य सरकारांनी स्थानिक प्राधिकरणांच्या निवडणुकांसाठी मतदानासाठी वयाची १८ वर्षे स्वीकारली आहेत .सध्याचे तरुण हे साक्षर आणि ज्ञानी आहेत आणि मतदानाचे वय कमी केल्याने देशातील प्रतिनिधित्व नसलेल्या तरुणांना त्यांच्या भावना व्यक्त करण्याची संधी मिळेल आणि त्यांना या उपक्रमाचा एक भाग बनण्यास मदत होईल.सध्याची तरुणाई राजकीयदृष्ट्या खूप जागरूक आहे. त्यामुळे मतदानाचे वय २१ वर्षावरून १८ वर्षे करण्याचा काम या घटनादुरुस्तीने केले आहे.६१ वी घटना दुरुस्ती १९८९ मध्ये करण्यात आलेली आहे.

**सारांश:**

लोकप्रतिनिधी अधिनियम१९५०,१९५१ मध्ये लोकप्रतिनिधीत्वच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाची कलमे आहेत. लोकप्रतिनिधी अधिनियम हे दोन्हीही कायदे भारतीय निवडणूक प्रक्रियेचे स्वरूप स्पष्ट करून दाखवतात.६१व्या घटनादुरुस्तीने भारतातील मतदानाचे वय २१ वरून १८वर्षावर आणण्यात आलेलं आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१मधील महत्त्वाच्या तरतुदी सांगा.

२. ६१व्या संविधान दुरुस्ती संदर्भात टीप लिहा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## २.५ निवडणूक सुधारणा समित्या व सुधारणांचे प्रस्ताव:

आपल्या राजकीय व्यवस्थेत राजकीय गुन्हेगारीकरण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाचे अनेक प्रकार आहेत, परंतु त्यापैकी कदाचित सर्वात चिंताजनक म्हणजे निवडून आलेल्या प्रतिनिधींची लक्षणीय संख्या आहे ज्यांच्यावर अनेक गुन्हेगारी आरोप प्रलंबित आहेत.परंतु त्या व्यक्ती राजकारणात आल्यानंतर उथळ माथ्याने फिरताना आपल्याला दिसून येतात. तसेच गेल्या काही काळात निवडणुकीसाठी लागणारा वित्तपुरवठा हा प्रमुख मुद्दा मोठा वादग्रस्त बनला आहे. निवडणुकांचा खर्च हा निवडणूक लढवण्याचा कायदेशीर खर्चाच्या मर्यादेपेक्षा खूप वर गेला आहे. याचा परिणाम पारदर्शकतेचा अभाव, व्यापक भ्रष्टाचार आणि तथाकथित 'काळ्या पैशा'च्या व्याप्तीत झाला आहे. प्रचार खर्चावरील मर्यादा, उमेदवार आणि पक्षांच्या मालमत्तेचे आणि दायित्वांचे प्रकटीकरण आणि लेखापरीक्षण, राजकीय मोहिमांचा खर्च कमी करण्याच्या पद्धती, तसेच निवडणुकीसाठी राज्य निधी निवडणुकीच्या आचारसंहितेमध्येही अनेक मुद्दे आहेत ज्यांची दखल घेणे आवश्यक आहे. मतदारसंख्येच्या मोठ्या आकारामुळे निवडणुका घेणे कठीण होत असले तरी, बूथ कॅप्चरिंग, मतदारांना धमकावणे, छेडछाड केलेल्या मतदार याद्या, निवडणुकीत मोठ्या प्रमाणात हेराफेरी आणि मतदानातील इतर अनियमितता यासारख्या मुद्द्यांच्या वाढलेला प्रभाव पाहता लोकशाही पारदर्शक करण्यासाठी व निवडणुका निष्पक्ष पद्धतीने होण्यासाठी वरील सर्व मुद्द्यांचा निवडणूक सुधारणा विषयक संबंधात विचार करणे आवश्यक आहे.अलीकडच्या काळात अनेक समित्यांद्वारे निवडणूक सुधारणांचा विषय हाती घेण्यात आला आहे, त्या प्रमुख समित्या पुढील प्रमाणे सांगता येतील.

**तारकुंडे / जेपी समिती (१९७४)**

सिटिझन्स फॉर डेमोक्रसीच्या वतीने जयप्रकाश नारायण यांनी १९७४ मध्ये निवडणूक सुधारणांच्या योजनेचा अभ्यास करून अहवाल देण्यासाठी एक समिती नेमली होती. समितीचे सदस्य व्ही.एम. तारकुंडे, एमआर मसाई इत्यादी होते आणि ती जेपी समिती किंवा तारकुंडे समिती म्हणून ओळखली जाते. तारकुंडे समितीच्या महत्त्वाच्या शिफारशी पुढीलप्रमाणे आहेत.

१. निवडणूक आयोग हा तीन सदस्यीय संस्था असावी.

२. मतदानाचे किमान वय १८ वर्षे असावे.

३. टीव्ही आणि रेडिओ स्वायत्त वैधानिक महामंडळाच्या नियंत्रणाखाली ठेवावेत.

४. शक्य तितक्या मतदारसंघात मतदार परिषद स्थापन केली पाहिजे जी मुक्त आणि निष्पक्ष निवडणुकीसाठी मदत करू शकेल.

**गोस्वामी निवडणूक सुधारणा समिती (१९९०)**

१. निवडणूक आयोग तीन सदस्यांसह बहु-सदस्यीय असावा.

२. मुख्य निवडणूक आयुक्तांची नियुक्ती राष्ट्रपतींनी भारताचे मुख्य न्यायमूर्ती आणि विरोधी पक्षाच्या नेत्याशी सल्लामसलत केली पाहिजे.

३. कमिशनच्या स्वातंत्र्याची सुरक्षितता.

४. मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्त यांच्याशी संबंधित पगारदारांचे संरक्षण आणि संबंधित बाबींचे संरक्षण.

५. मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्तांचा कार्यकाळ ५ वर्षांपेक्षा जास्त असावा.

६. मुख्य निवडणूक आयुक्तांनी केवळ निवडणुकीच्या कामावर विश्वास ठेवला पाहिजे.

७. मतदान प्रक्रियेतील बोगसगिरी टाळण्यासाठी मतदान ओळखपत्र देण्याचा कार्यक्रम संपूर्ण देशात कालबद्ध कार्यक्रम हाती घेणे आवश्यक आहे.

**व्होरा समितीचा अहवाल (१९९३)**

निवडणूक सुधारणांवरील सर्वच समितीच्या अहवालांनी राष्ट्रीय आणि राज्य या दोन्ही स्तरांवर राजकीय व्यवस्थेचे गुन्हेगारीकरण मान्य केलेले आहे.राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाचे अनेक प्रकार आहेत, परंतु त्यापैकी सर्वात चिंताजनक म्हणजे निवडून आलेल्या प्रतिनिधींची व ज्यांच्यावर गुन्हेगारी आरोप प्रलंबित आहेत आश्यांची लक्षणीय संख्या आहे.एकंदरीतच राजकारणाच्या गुन्हेगारीकरणावरील व्होरा समितीचा अहवाल हा राजकारणी-गुन्हेगारी संबंधाची व्याप्ती ओळखण्यासाठी आणि या धोक्याचा मुकाबला करण्याच्या मार्गांची शिफारस करण्यासाठी स्थापन करण्यात आला होता. व्होरा अहवालमध्ये “देशाच्या विविध भागात गुन्हेगारी टोळ्या, पोलीस, नोकरशाही आणि राजकारणी यांच्यातील संबंध स्पष्टपणे समोर आले आहेत” तसेच की "काही राजकीय नेते या टोळ्या/सशस्त्र सेनेचे नेते बनतात आणि वर्षानुवर्षे स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य विधानसभा आणि राष्ट्रीय संसदेत निवडून येतात."अशा धक्कादायक नोंदी या अहवालात असल्यामुळे अजूनही हा अहवाल प्रकाशित होऊ शकलेला नाही ही वस्तुस्थिती आहे.

**इंद्रजित गुप्ता समिती (१९९८)**

राजकारणाचे गुन्हेगारीकरण निवडणूक प्रक्रियेला बाधा आणतात सोबतच गुन्हेगारी करण्यासोबतच पैशाची शक्ती एकत्र येते आणि त्यांचा एकत्रित परिणाम म्हणजे निवडणूकांची पवित्रता आणि मुक्त आणि निष्पक्ष निवडणुकांवर परिणाम होतो हे लक्षात घेता इंद्रजीत गुप्ता समितीने पुढील शिफारशी सुचवलेल्या आहेत.

१. निवडणुकीसाठी राज्याचा निधी संवैधानिक, कायदेशीर आणि व्यापक सार्वजनिक हितासाठी वापरणे पूर्णपणे न्याय्य आहे.

२. सुरूवातीस, मान्यताप्राप्त राष्ट्रीय आणि राज्य पक्ष आणि त्यांच्या उमेदवारांना खालील सुविधा मंजूर केल्या जाऊ शकतात.प्रत्येक मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्षाला राष्ट्रीय राजधानी दिल्ली येथे भाड्याने-मुक्त निवासस्थान वाटप केले जाऊ शकते. भाड्याने - मोफत टेलिफोनसह,भाड्याने - मोफत निवास आणि भाडे - मोफत टेलिफोनची अशीच सुविधा प्रत्येक मान्यताप्राप्त राज्य पक्षाला ज्या राज्यात त्याचे मुख्यालय आहे त्या राज्यात दिले जाऊ शकतात.

३. लोकसभेच्या प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी राज्य निधी हा फक्त भारतीय निवडणूक आयोगाने राष्ट्रीय किंवा राज्य पक्ष म्हणून मान्यता दिलेल्या पक्षांपुरता मर्यादित असावा आणि अशा उमेदवारांनी स्थापन केलेल्या उमेदवारांना द्यावा.

४. पक्षांच्या आर्थिक भाराचा काही भाग सुरुवातीला राज्यांनी उचलावा.

५. राजकीय पक्षांनी त्यांचे वार्षिक हिशेब आयकर विभागाकडे जमा करणे बंधनकारक आहे.

६. निवडणूक खर्चाचा संपूर्ण हिशेब पक्षांनी निवडणूक आयोगाकडे सादर केला पाहिजे.

**निवडणूक कायद्यांच्या सुधारणेवर कायदा आयोगाचा अहवाल (१९९९)**

निवडणूक कायद्याच्या सुधारणांवरील कायदा आयोगाच्या १७० व्या (मे१९९९) च्या अहवालात या मुद्द्यावर पुढे चर्चा झाली.

१. प्रमाणबद्ध प्रतिनिधीच्या प्रणालीचा विचार करणे.

२. १७० व्या अहवालाने शिफारस केली आहे की लोकसभेच्या विद्यमान ५४३ जागा थेट निवडणुकांद्वारे भरल्या जात असताना, लोकसभेतील जागांची संख्या अतिरिक्त २५% ने वाढवली जावी.

**संविधानाच्या कार्याचे पुनरावलोकन करण्यासाठी राष्ट्रीय आयोग (२००१)**

१. सर्व मतदारसंघात इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशिन्स (ईव्हीएम) चा शक्य तितक्या लवकर सर्व निवडणुकांसाठी देशात वापर करावा.

२. लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ च्या कलम ५८अ अन्वये, निवडणूक आयोग रिटर्निंगच्या अहवालावर बूथ कॅप्चरिंगबाबत निर्णय घेण्यास अधिकृत केले पाहिजे.

३. संपूर्ण मतदारसंघात निवडणूक आयोगाने व्हिडिओ रेकॉर्डिंग चा वापर केला पाहिजे.

४. संवेदनशील मतदान केंद्रे/मतदारसंघावर इलेक्ट्रॉनिक पाळत ठेवणे.

५. जात किंवा धर्माच्या आधारावर होणारा कोणताही निवडणूक प्रचाराचा प्रयत्न आणि निवडणुकीदरम्यान जातीय द्वेष केल्यास सक्तीच्या कारावासाची शिक्षा झाली पाहिजे.

६. लोकप्रतिनिधी कायद्यात सुधारणा करने.

७. राजकारण्यांवरील फौजदारी खटले न्यायालयांसमोर प्रलंबित असले तर विशेष न्यायालये नियुक्त करून, आवश्यक असल्यास, वेगाने निकाली काढली पाहिजे

८. निवडणुकीच्या वेळी प्रत्येक उमेदवाराने आपली मालमत्ता आणि दायित्वे जाहीर करणे आवश्यक आहे.

**दुसरा प्रशासकीय सुधारणा आयोग**

राष्ट्रपतीकडून २००५ मध्ये प्रशासकीय सुधारणा करण्याच्या संदर्भात व प्रशासकीय प्रणालीच्या पुनर्रचनेच्या संदर्भात हा आयोग स्थापन केला गेला होता त्याला दुसरा प्रशासकीय सुधारणा आयोग या नावाने ओळखले जाते.या आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांची नावे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

श्री वीरप्पा मोईली अध्यक्ष

श्री व्ही. रामचंद्रन सदस्य

डॉ. ए. पी. मुखर्जी सदस्य

डॉ. ए. एच. कालरो सदस्य

डॉ. जयप्रकाश नारायण सदस्य

श्रीमती विनिता राय सदस्य- सचिव

आयोग सरकारच्या सर्व स्तरांवरील प्रशासनिकदृष्ट्या विकासाकरिता अभ्यास करून महत्वपूर्ण शिफारशी सुचवणार होता. त्यामध्ये प्रामुख्याने भारत सरकारची संघटनात्मक संरचना, प्रशासनातील नैतिकतेची पुनर्रचना, प्रशासनाचे बळकटीकरण, आर्थिक व्यवस्थापन प्रणाली, राज्य स्तरावर प्रभावी प्रशासन सुनिश्चित करण्यासाठी, प्रभावी जिल्हा प्रशासन सुनिश्चित करण्यासाठी उपाययोजना,स्थानिक सरकार/पंचायती राज संस्था, सामाजिक भांडवल, ट्रस्ट आणि सहभागी सरकारी सेवा वितरण, नागरिक-केंद्रित प्रशासन, ई-गव्हर्नन्स, इ. बाबीचा प्रामुख्याने विचार करण्या जाणार होता.

**२.५.१ निवडणूक आयोगाने निवडणूक सुधारणा विषयक केलेल्या महत्त्वाच्या सुधारणा:**

१. इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीनचा वापर.

२. इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीनची विश्वासनीयता वाढवण्यासाठी मतदारांना आपण कोणास मत दिले आहे हे समजण्यासाठी व्हीव्हीपॅटचा वापरही आता केला जाऊ लागला आहे.

३. निवडणुकीतील मतदानाची बोगसगिरी थांबवण्यासाठी मतदान ओळखपत्रशी आधार कार्ड जोडण्याची मोहीम निवडणूक आयोगाने हाती घेतलेली आहे.

### ४. नकारात्मक किंवा तटस्थ मतदानाचा अधिकार (नोटा)

नकारात्मक/तटस्थ मतदान म्हणजे मतदारांना मतपत्रिकेवरील उमेदवाराच्या नावाऐवजी “वरीलपैकी काहीही नाही” पर्याय निवडून सर्व उमेदवारांना नाकारण्याची परवानगी देणे. राजकारणाचे गुन्हेगारीकरण, व्यवस्थेतील व्यापक भ्रष्टाचार आणि हिंसेचा वापर, मतदारांना धमकावणे इत्यादिंमुळे एखाद्या विशिष्ट मतदारसंघात निवडणूक लढवणाऱ्यांमध्ये योग्य उमेदवार नसतो. अशा वेळी मतदारांना सर्व उमेदवारांबद्दल नापसंती व्यक्त करण्याचा कोणताही मार्ग नव्हता. त्यामुळे भ्रष्टाचारी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांना मतदानासाठी समर्थन दिल्याशिवाय लोकांकडे पर्याय नव्हता. त्यासाठी निवडणूक आयोग आणि कायदा आयोग या दोघांनीही नकारात्मक किंवा तटस्थ मतदानाचा पर्याय तयार करण्याची शिफारस केली होती. ती शिफारस सध्याच्या काळात मतदारांना उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

### ५. एक्झिट पोलवर बंदी

निवडणूक कायद्यावरील पूर्वीच्या समित्यांनी निवडणुकीच्या पूर्वसंध्येला मतदारांची फेरफार करण्यासाठी ओपिनियन पोलचा गैरवापर होऊ शकतो यावर एकमत व्यक्त केले आहे. त्यादृष्टीने निवडणूक प्रक्रियेदरम्यान ठराविक कालावधीसाठी ओपिनियन पोल आणि एक्झिट पोलचे निकाल प्रकाशित करण्यावर निर्बंध घालण्याची तरतूद कायद्यात असावी, अशी शिफारस निवडणूक आयोगाने केली होती. त्या आधारे लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ मध्ये दुरुस्तीद्वारे मतदान संपण्याच्या ४८ तास आधीपासून सुरू होणा-या कालावधीत, एक्झिट पोल आयोजित करण्यास आणि कोणत्याही प्रकारे निकाल प्रकाशित करण्यास मनाई करणारे नवीन कलम १२६A समाविष्ट केले गेले आहे.निवडणूक काळात वेगवेगळ्या टप्प्यात होणाऱ्या निवडणुकांचा विचार करता शेवटच्या टप्प्यातील मतदान संपेपर्यंत ही बंदी कायम असते.

एकंदरीतच भारतीय निवडणूक प्रक्रियेचा स्वरूप पाहता भारतीय निवडणूक प्रक्रिया ही अत्यंत आव्हानात्मक आहे. निवडणुकीत येणाऱ्या आव्हानांचा सामना करण्यासाठी निवडणूक आयोगाने वेळोवेळी महत्त्वाच्या सुधारणा करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे निवडणुका ह्या नि:पक्षपाती आणि पारदर्शक होण्यास हातभार लागला आहे.

## २.५.२ निवडणूक आयोगासमोर प्रस्तावित असलेल्या महत्त्वाच्या निवडणूक सुधारणा:

गेल्या सात दशकांतील उल्लेखनीय यशामुळे भारताची लोकशाही व्यवस्था जगातील अनेक देशांसाठी एक आदर्श नमुना आहे. भारताच्या लोकशाही व्यवस्थेचे हृदय जगातील सर्वात मोठ्या मतदारांच्या सहभागासह नियमित निवडणुकांचे साक्षीदार आहे. देशात निष्पक्ष आणि मुक्त निवडणुकांच्या मूलभूत मूल्यांचे रक्षण करण्यासाठी, अधिकाधिक नागरिकांच्या सहभागासह एक न्याय्य आणि निःपक्षपाती निवडणूक प्रक्रिया असणे महत्त्वाचे आहे.तसेच भारतीय राज्यघटनेने सोपविलेल्या जबाबदारीनुसार, निवडणूक प्रक्रियेची शुद्धता आणि अखंडता जपण्यासाठी भारतीय निवडणूक आयोग नेहमीच सक्रियपणे काम करत आहे. तरीही निवडणूक व्यवस्थेत काही आव्हाने आणि समस्या आहेत ज्यांचा वर्षानुवर्षे सामना करावा लागला आहे. ही आव्हाने दुर्लक्षित राहिल्यास निवडणूक व्यवस्थेवरील नागरिकांचा

विश्वास आणि संवेदना प्रभावित होऊ शकतात. अशाप्रकारे, या अडचणी लक्षात घेऊन भारतीय निवडणूक आयोग काही बदलांची शिफारस करतो त्यामध्ये प्रामुख्याने कायद्यातील काही तरतुदींमध्ये सुधारणा करण्यासाठी त्वरीत निर्णय घेणे आवश्यक आहे असे निवडणूक आयोगाला वाटते त्या दृष्टिकोनातून निवडणूक आयोगाने काही प्रस्तावित सुधारणा निश्चित करण्याचे ठरवले आहे त्या पुढील प्रमाणे.

**१. दोन जागांवर निवडणूक लढवून विजयी होणाऱ्या उमेदवाराविषयी:**

जेव्हा एखादा उमेदवार दोन जागांवरून निवडणूक लढवतो तेव्हा त्याने दोन्ही जागा जिंकल्यास दोनपैकी एक जागा सोडणे आवश्यक असते. परिणामी रिक्त जागांविरुद्ध पोटनिवडणूक घेण्यासाठी सार्वजनिक तिजोरीवर आणि मनुष्यबळ व इतर साधनांवर पडणारा अपरिहार्य आर्थिक भार याशिवाय, ज्या मतदारसंघातून उमेदवार सोडत आहे, त्या मतदारसंघातील मतदारांवर हा अन्याय ठरेल. हा विचार करून प्रस्तावित दुरुस्ती आयोगाने शिफारस केली आहे की,निवडणूक आचार आणि चांगल्या व्यवस्थापनासाठी एखाद्या व्यक्तीला एका वेळी एकापेक्षा जास्त मतदारसंघातून निवडणूक लढवता येणार नाही अशी तरतूद करण्यासाठी कायद्यात सुधारणा करणे आवश्यक आहे. जर तरतूद कायम ठेवायची असेल, तर कायद्यात स्पष्ट तरतुदीची गरज आहे, ज्याने दोन जागांवर निवडणूक लढवली आणि जिंकली, त्यावेळी त्यांनी राजीनामा दिल्यानंतर परिणामी दोन मतदारसंघांपैकी एका मतदारसंघातून पोटनिवडणूक होईल, त्या पोटनिवडणुकीसाठी निवडणुकीसाठी सरकारी खात्यात पैसे जमा करावे लागतील.

**२. सार्वजनिक कार्यालयातील थकबाकीदार उमेदवाराविषयी:**

दिल्ली उच्च न्यायालयाने दि. ०७/०८/२०१५ रोजी दिलेल्या निकालात निवडणूक आयोगाला निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांनी सार्वजनिक थकबाकी जर भरली नसेल तर अशा उमेदवारांच्या बाबतीत अपात्र ठरविण्याचा निर्णय घेण्यात यावा असे निर्देश दिले होते. या निकालाच्या अनुषंगाने, आयोगाने लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ च्या प्रकरण III मध्ये नमूद केलेल्या अपात्रतेच्या तरतुदींमध्ये सुधारणा करण्याची शिफारस केली आहे. जेणेकरुन सार्वजनिक थकबाकी भरण्यात चूक झाल्यास अपात्रतेची तरतूद करता येईल.

**३. उमेदवारांच्या गुन्हेगारीकरणा संदर्भातील सुधारणा:**

गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्ती, गंभीर गुन्ह्यांचे आरोप असलेले, निवडणूक लढवताना काही गुन्हे लपवताना आपल्याला दिसून येतात.अशा गंभीर स्वरूपाच्या आरोपांचा सामना करत असलेल्या अनेक व्यक्ती निवडणुका जिंकून आपल्या लोकशाहीच्या मंदिरात म्हणजे संसद आणि राज्य विधानमंडळाच्या सभागृहात प्रवेश करतात जे अत्यंत खेदजनक आहे आणि या समस्येकडे लक्ष देणे आवश्यक आहे. गुन्हेगारी न्यायशास्त्राच्या सामान्य तत्त्वांची पूर्ण जाणीव घेऊन आयोगाने एखादी व्यक्ती दोषी सिद्ध होईपर्यंत ती निर्दोष मानली जाते या तत्त्वाचा स्वीकार केला असला तरी सुद्धा प्रस्तावित दुरुस्तीत दखलपात्र गुन्ह्यांचा आरोप असलेल्या व्यक्तींना, सक्षम न्यायालयाने आरोप निश्चित केलेल्या टप्प्यावर, त्या गुन्ह्यासाठी किमान ५ वर्षांच्या

तुरुंगवासाची शिक्षा होत असेल आणि खटला चालवला जाईल अशा टप्प्यावर त्यांना निवडणूक लढवण्यापासून प्रतिबंधित केले जाईल याचा विचार निवडणूक आयोग करत आहे.

**४. पेड न्यूज बाबत सुधारणा:**

प्रसारमाध्यमातून प्रसारित होणाऱ्या बातम्यांचा विचार करता या बातम्यांचा सर्वसामान्य लोकांवर मोठा प्रभाव पडतो. त्यामुळे प्रसार माध्यमातून हे निवडणुकीच्या काळात प्रसार आणि प्रचार करण्यासाठी उमेदवारांना उपयुक्त पडतात. परंतु काही प्रसार माध्यमे हे पैसे घेऊन बातम्या आणि जाहिराती छापण्याचे काम ही या निवडणुकीच्या काळात करत असतात हे पेड न्यूजचे स्वरूप आहे. एकंदरीतच पेड न्यूजच्या बातम्या छापून काही प्रसारमाध्यमे मतदारांची संपूर्ण दिशाभूल करतात. त्यामुळे पेड न्यूजच्या संदर्भात निवडणूक सुधारणा करण्यासंदर्भात आयोगाचे असे मत आहे की मुक्त आणि निष्पक्ष निवडणुकांच्या संदर्भात 'पेड न्यूज' ही एक वाईट भूमिका बजावते आणि लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ मध्ये सुधारणा करून त्यामध्ये प्रकाशन आणि प्रचाराला प्रोत्साहन देण्यासाठी प्रस्तावित केले आहे. लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ च्या प्रकरण III भाग VII अंतर्गत निवडणूक गुन्हा म्हणून कोणत्याही उमेदवाराच्या निवडणुकीच्या संभाव्यतेला पुढे नेण्यासाठी किंवा पूर्वग्रहदूषितपणे कोणत्याही उमेदवाराच्या निवडणुकीच्या संभाव्यतेवर परिणाम करण्यासाठी 'पेड न्यूज' बद्दल किमान अनुकरणीय शिक्षेसह दोन वर्षे तुरुंगवास संबंधित उमेदवाराला व्हावा.

**५. खोटी प्रतिज्ञापत्र सादर करणे बाबत:**

१९५१ च्या लोकप्रतिनिधी कायद्यात कलम १२५A लागू असूनही, उमेदवारांच्या खोट्या प्रतिज्ञापत्रांबद्दल अनेक तक्रारी निवडणूक आयोगाकडे येत आहेत. म्हणून स्वतंत्र आणि निष्पक्ष निवडणुकांच्या हितासाठी माहिती लपवणे आणि खोटी माहिती देणे याला आळा घालणे आवश्यक आहे. म्हणून या समस्येला प्रभावीपणे हाताळण्याच्या उद्देशाने आणि माहिती लपविण्याच्या किंवा खोटी माहिती पुरविण्याच्या धोक्याचा सामना करण्यासाठी आणि मतदारांच्या माहितीच्या अधिकाराचे संरक्षण करण्यासाठी, आयोगाने कलम १२५A अंतर्गत शिक्षा आणखी वाढवण्याची शिफारस केली आहे. या अनुषंगाने मुक्त आणि निष्पक्ष निवडणुकांच्या हितासाठी कलम १२५A अंतर्गत शिक्षा कमीत कमी दोन वर्षांच्या तुरुंगवासाची तरतूद करून कठोर कारवाई करण्याचा विचार निवडणूक आयोगाचा आहे.

**६. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघातील निवडणुकीदरम्यान खर्चाची मर्यादे बाबत:**

लोकप्रतिनिधी कायदा १९५१ चे कलम ७७ आणि निवडणूक नियम, १९६१ च्या नियम ९० सह उमेदवाराने केलेल्या किंवा अधिकृत केलेल्या निवडणुकीच्या संदर्भात खर्चाची मर्यादा विहित करते. मात्र ही मर्यादा संसदीय आणि विधानसभा

मतदारसंघातील निवडणुकांपुरती मर्यादित आहे.म्हणून लोकप्रतिनिधी कायद्यात अशी उणीव आहे ज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघातील निवडणुकीदरम्यान खर्चाची मर्यादा नाही. त्यासाठी निवडणूक नियम, १९६१ च्या प्रस्तावित सुधारणा नियम ९० मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी, पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघातून निवडणूक लढवताना उमेदवाराने निवडणूक खर्चावर कमाल मर्यादा घालण्यासाठी सुधारणा करावी. यासाठी पावले उचलून या निवडणुकांसाठीची खर्च मर्यादा संबंधित राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या मर्यादेच्या निम्मी असावी अशी सुधारणा करण्याचा प्रस्ताव दिलेला आहे.

**७. निवडणुकीच्या काळात उमेदवाराकडून केली जाणारी लाचखोरी बाबत:**

लाचखोरी बाबत प्रस्तावित सुधारणा आयोगाचा प्रस्ताव असा आहे की फौजदारी प्रक्रिया संहिता (Cr.P.C), १९७३ चे कलम १७१ B आणि १७१ E मध्ये तात्काळ सुधारणा करून किमान २ वर्षांच्या तुरुंगवासासह दखलपात्र गुन्हा म्हणून लाचखोरीचा समावेश करण्यात येईल.

**८. कर सवलतीचा फायदा घेणाऱ्या राजकीय पक्षांबाबत:**

अनेक राजकीय पक्ष नोंदणीकृत आहेत, परंतु कधीही ते निवडणूक लढवत नाहीत. असे पक्ष केवळ कागदावरच असतात. ते पक्ष आयकर सवलतीचा लाभ घेण्यावर डोळा ठेवून राजकीय पक्ष स्थापन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. राजकीय पक्षांची नोंदणी करण्याचा अधिकार असलेल्या आयोगाला योग्य प्रकरणांमध्ये नोंदणी रद्द करण्याचाही अधिकार आहेत परंतु प्रस्तावित दुरुस्ती भारतीय निवडणूक आयोगाला राजकीय पक्षाची नोंदणी रद्द करण्याचे अधिकार देण्यात यावेत.

**९. लोकांना आपला प्रतिनिधी निवडताना उमेदवारांविषयी माहिती असणे बाबत:**

राजकीय पक्ष हे लोकशाहीतील प्रमुख भागधारक आहेत आणि ते जनतेला उत्तरदायी असले पाहिजेत.यासाठी लोकांना त्यांचे प्रतिनिधी निवडण्याबाबत माहितीपूर्ण निर्णय घेण्यास सक्षम करण्यासाठी कायदा आयोगाने अहवाल २५५ मध्ये शिफारस केल्यानुसार प्रस्तावित सुधारणा कलम २९ C, २९ D, २९ E, लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ मध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे.

**१०. राजकीय पक्षांच्या लेखापरीक्षा अहवाला बाबत:**

लेखा आणि लेखापरीक्षण मानकांमुळे राजकीय पक्षांना आर्थिक विवरणपत्रे सादर करण्यात एकसमानता, योग्य खुलासा आणि त्यांच्या खात्यांची पारदर्शकता राखण्यात मदत होईल.यासाठी प्रस्तावित दुरुस्तीमध्ये निवडणूक आयोगाच्या विनंतीवरून, भारतीय चार्टर्ड अकाउंटंट्स संस्थेने फेब्रुवारी २०१० मध्ये राजकीय पक्षांच्या लेखा प्रणालीमध्ये सुधारणा करण्यासाठी निवडणूक आयोगाला "राजकीय पक्षांच्या लेखा

आणि लेखापरीक्षणावरील मार्गदर्शन सूचना" अंतर्गत काही शिफारसी केल्या. त्या शिफारशीचाही निवडणूक आयोग विचार करत आहे.

**११. निवडणूक खटल्यांच्या संदर्भात न्यायाधीशांची संख्या वाढवणे बाबत:**

भारतातील न्यायालयीन प्रक्रिया पाहता लोकसंख्येच्या आणि न्यायालयात दाखल होणाऱ्या खटल्यांच्या प्रमाणात न्यायाधीशांची संख्या ही कमी आहे. त्यामुळे एकंदरीतच सर्वसामान्य खटले, निवडणूक खटले याविषयी लवकरात लवकर न्याय मिळत नाही.म्हणून देशात खटल्यांचा अनुशेष दूर करण्यासाठी अतिरिक्त न्यायाधीशांची नियुक्ती करण्याची गरज आहे हा मुद्दा लक्षात घेऊन निवडणूक याचिकांवर सुनावणीसाठी उच्च न्यायालयांमध्ये अतिरिक्त न्यायाधीशांची नियुक्ती करून त्यांचा जलद निपटारा केला जावा अशी सुधारणा करण्याची शिफारस निवडणूक आयोगाने केली आहे.

**१२. उमेदवाराच्या उत्पन्नाच्या स्त्रोतां बाबत:**

उमेदवार आणि त्याच्या जोडीदाराच्या व त्याच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तीच्या उत्पन्नाचे स्रोत घोषित केल्याने निवडणुकीत पारदर्शकता येऊ शकते हा विचार करून मतदारांना त्यांच्या उमेदवारांच्या उत्पन्नाच्या स्त्रोतां बाबत माहिती मिळवण्याचा अधिकार असावा यादृष्टीने प्रस्तावित दुरुस्ती आयोगाने प्रस्तावित केली आहे की उमेदवार आणि त्याच्या जोडीदाराच्या उत्पन्नाचा स्रोत घोषित करण्यासाठी एक नवीन स्तंभ जोडून फॉर्म २६ मध्ये सुधारणा करावी.

**१३. निवडणूक सुधारणाचे कायदे करण्याचा अधिकार हा निवडणूक आयोगाला असण्याबाबत :**

केंद्र सरकार आयोगाचे मत आणि शिफारशी स्वीकारण्यास बांधील नसल्यामुळे आयोगाच्या विशिष्ट शिफारसींना विरोध करणारे नियम तयार केले गेल्याची उदाहरणे आहेत. त्यातून त्यामुळे देशात तयार होणारे काही काही कायदे हे निवडणूक आयोगाच्या शिफारशींशी सुसंगत नाहीत. म्हणून प्रस्तावित दुरुस्ती आयोगाने अशी शिफारस केली आहे की वरील-संदर्भित कलमांखाली नियम बनवण्याचे अधिकार केंद्र सरकार ऐवजी निवडणूक आयोगाला दिले जावेत.

**१४.राजकीय पक्षांना मिळणाऱ्या देणग्याबाबत कायद्यामध्ये सुधारणा करणे.**

**१५.धार्मिक भावना दुखावणे विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याच्या सुधारणा.**

**१६.लोकप्रतिनिधी अधिनियमांमध्ये सुधारणा करणे.**

**१७.मतदान ओळखपत्राशी आधार कार्ड जोडणे.**

**सारांश:**

भारत सरकारच्या कायदा आणि न्याय मंत्रालयाने निवडणूक सुधारणांवर एक समिती स्थापन केली आहे. या समितीचा मुख्य उद्देश सरकारला शिफारस करणे हा आहे की आपली निवडणूक प्रणाली कशा पद्धतीने मजबूत करता येईल.ही समिती राजकीय नेते, सरकारी

कर्मचारी, कायदेतज्ज्ञ, स्वयंसेवी संस्था, अभ्यासक, अभ्यासक, पत्रकार आणि इतर संबंधितांची मते घेत असते.तसेच विविध नागरी समाज गटांनी हाती घेतलेल्या निवडणूक सुधारणांच्या विषयावरही आज मोठ्या प्रमाणावर ठोस कार्य केले हाती घेतलेले आहे. सध्याच्या निवडणूक प्रणाली व्यवस्थेच्या चौकटीमध्ये निवडणूक सुधारणेसाठी पर्याय शोधणे चालू आहेत.अनेक समित्यांनी निवडणूक प्रणालीतील प्रमुख संरचनात्मक सुधारणांवर चर्चा केली आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. भारतातील निवडणूक सुधारणा समित्या विषयी माहिती लिहा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

२. भारतातील निवडणूक सुधारणा संदर्भातील प्रस्तावित सुधारणा विषयी माहिती लिहा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

**अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ**

**लोकप्रतिनिधी अधिनियम 1950**

**लोकप्रतिनिधी अधिनियम 1951**

**ELECTORAL REFORMS IN INDIA,MEMBERS REFERENCE SERVICE LARRDIS,LOK SABHA SECRETARIAT NEW DELHI.**

**PROPOSED ELECTORAL REFORMS,Election Commission of India**

❈❈❈❈❈❈❈

# ३

# निवडणुकांचा इतिहास

**घटक रचना**

३.१ उद्दिष्टे

३.२ प्रस्तावना

३.३ विषय विवेचन

३.४ भारतातील निवडणुकीय राजकारण

३.५ भारतात आतापर्यंत झालेल्या प्रमुख निवडणुकांचा आढावा

## ३.१ उद्दिष्टे

"निवडणुकांचा इतिहास" या घटकाच्या अभ्यासानंतर पुढील बाबी समजून घेण्यास मदत होईल.

१.राजकीय व्यवस्थेवर दीर्घकाळ परिणाम करणाऱ्या निवडणुकांची माहिती होईल

२.निवडणुकीच्या माध्यमातून देशात चालणाऱ्या पक्षीय राजकारणाचा परिचय होईल.

## ३.२ प्रस्तावना

प्रातिनिधीक लोकशाहीमध्ये निवडणुका हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे.भारतीय संसदीय लोकशाहीची जडणघडण होण्यात निवडणुकांचा महत्वाचा वाटा आहे.म्हणूनच निवडणुका संदर्भातील पोलॉक या राज्यशास्त्रज्ञाच्या मत अत्यंत महत्त्वाचे ठरते.पोलॉक याच्या मते"सार्वजनिक निवडणुका काटोकोरपणे आणि कार्यक्षमतेने पार पडल्या नाहीत तर नुसत्या सार्वजनिक यंत्रणाच कुचकामी ठरत नाही तर संपूर्ण लोकशाही व्यवस्थाच संकटात सापडते." यावरून लोकशाहीसाठी निवडणुकांचे महत्व स्पष्ट होते. नागरिकांमध्ये सार्वजनिक जीवनात सहभागी होण्याची इच्छा, भावना आणि राज्यवस्थेबद्दल मनात आत्मीयता निर्माण करण्याचे महत्वाचे माध्यम म्हणजे निवडणुका होय. निवडणुकांच्या माध्यमांतून सरकारला अधिमान्यता मिळते तर विहित शांततेच्या मार्गाने सत्तांतर घडवून आणण्याचे साधन म्हणजे निवडणुका होय. लोकशाहीत जनता सार्वभौम असते हे निवडणुकीच्या माध्यमातून सिद्ध होते. निवडणुका लढविण्यासाठी राजकीय पक्षांची गरज असते.

प्रस्तुत पाठात आपण काही महत्वाच्या निवडणुकांच्या व त्या निवडणुकीत राजकीय पक्षांनी सत्ताप्राप्तीसाठी केलेल्या राजकारणाची चर्चा केली आहे.

## ३.३ विषय विवेचन

## ३.४ भारतातील निवडणुकीय राजकारण

संविधान अमंलात आणल्याापासून देशात लोकसभेच्या व वेगवेगळ्या घटक राज्याच्या विधानसभा निवडणुका यशस्वीरीत्या पार पाडल्या आहेत. निवडणुकांचे बरेवाईट निकाल पाहता त्यातून उभ्या राहिलेल्या सरकारांचे अस्थिर स्वरूप या गोष्टी बाजूला ठेवल्या तर आपल्या दरिद्री खंडप्राय निरक्षर देशात निवडणुकांची प्रक्रिया मुक्त व न्याय्य स्वरूपात सुरू राहिली. निवडणुकांचे राजकारण भारतीयांच्या मानसिकतेत व देशातील सामाजिक शक्तीच्या गतीशीलतेत पक्के रुजले आहे. पारंपारिक जातजमातीय निष्ठांना निवडणूक राजकारणातून काही अंशी छेद दिला जात असला तरीही जातीय भूमिका बदललेल्या दिसत नाहीत. निवडणूक आरक्षणाद्वारे वंचित समाजघटकांचे नवे नेतृत्व पुढे आले असून, त्या समुदायाच्या राजकीय जाणीवा प्रगल्भ झाल्या आहेत त्यांना आपल्या मताची ताकद व मूल्य पटू लागले आहे. प्रत्येक निवडणुकीत मतदारांचा प्रतिसाद वाढलेला दिसतो.

राज्यशास्त्राचे प्राध्यापक व निवडणूक विश्लेषक योगेंद्र यादव यांनी भारतीय निवडणुकांचे तीन टप्पे पाडले आहे.

१) १९५२ ते १९६७ चा काळ

२) १९७१ ते १९८९

३) १९८९ ते पुढे – आघाड्याच्या राजकारणाचा काळ

**१) १९५२ ते १९६७ चा काळ –** एक पक्षपद्धतीचा काळ या टप्प्यात १९५२ ते १९६७ पर्यंतच्या चार निवडणुकाचा समावेश होतो. या काळात देशात एकपक्ष प्रबळ पद्धती होती. देशात काँग्रेसचे राज्य अस्तित्वात होते. त्यामुळे निवडणुकांचे स्वरूप स्पर्धात्मक नव्हते मतदारांचा प्रतिसाद कमी होता. काँग्रेस विरुद्ध प्रदेशवार फुटलेले विरोधी पक्ष यातून मतदारांना निवड करता येत होती. काँग्रेसमधून विरोधी पक्षाचा उदय झाला होता. पक्षाच्या खालोखाल जातीचा प्रभाव मतदारांच्या वर्तनावर मोठ्या प्रमाणात पडलेला होता. विकास व राजकीय जागृती झालेल्या जाती राजकारणात वरचढ होत्या. १९६७ मध्ये त्यात बदल होऊन काँग्रेसची मक्तेदारी संपुष्टात आली.

**२) १९७१ ते १९८९**

श्रीमती इंदिरा गांधीनी डिसेंबर १९७० मध्ये लोकसभेचा कार्यकाल पुर्ण होण्याआगोदर लोकसभा विसर्जित करून मार्च १९७१ मध्ये फक्त लोकसभेची निवडणुक घेतली. या ऐतिहासिक निर्णयामुळे लोकसभा व विधानसभा निवडणुका एकाचवेळी घेण्याची प्रथा परंपरा प्रथमच तुटली. लोकसभेच्या निवडणुकीवर प्रधानमंत्रीय आयाम नव्याने विकसित झाला. त्यातून लोकसभेची निवडणूक प्रधानमंत्रिपदाच्या उमेदवाराविरोधात किंवा बाजूने लढली जाऊ लागली. दूसरे म्हणजे निवडणुकांच्या संदर्भात राष्ट्रीय भावना आणि स्थानिक मुळ यांना एकमेकांपासून वेगळे केले गेले. तिसरा परिणाम म्हणजे प्रादेशकि पक्षांना संस्थात्मक वाव मिळाला.

१९७१ च्या निवडणुकीत ज्या काँग्रेसचे नेतृत्व श्रीमती गांधींनी केले तो पक्ष १८८५ च्या मूळ पक्षापेक्षा वेगळा होता. जातीच्या निवडणूक प्रवेशामुळे या काळात निवडणुकांचे स्वरूप खऱ्या अर्थाने स्पर्धात्मक झाले. या काळात काँग्रेस एक प्रबळ पक्ष उरला नाही तरी त्याच्या बाजूने किंवा त्याच्या विरोधात राष्ट्रव्यापी किंवा राज्यवार असे निवडणुकांचे स्वरूप होते. त्यामुळे अनेक राज्यात नवीन राजकीय पक्ष निर्माण झाले. त्यामुळे या काळात एकपक्षीय राजवटीकडून बहुपक्षीय राजवटीकडे वाटचाल होत असली तरीही या काळात काँग्रेस पक्ष प्रबळ राहिला. हा भारतीय राजकारणातला लोकानुरंजनवादी काळ होता. १९८९ पर्यंत भारतीय राजकारणात फारसा बदल झाला नव्हता.

३) १९८९ पासून आघाडीच्या राजकारणाच्या काळात जनता दलाच्या नेतृत्वाखाली प्रादेशिक पक्षांनी आपला प्रभाव दाखवण्यास सुरूवात केली. राजकारणाचा सामाजिक पाया बदलला. जातीय राजकारणापेक्षा जमातीय राजकारणाला चालना मिळाली. मंडल, मंदिर, मार्केट या तीन घटकांचा प्रभाव वाढू लागला. मंडल आंदोलन, राममंदिरासाठी रथयात्रा, उदारीकरणाचे आर्थिक धोरण यातून नव्या राजकीय गठबंधताना वाव मिळाला. त्याचा परिणाम निवडणूक निकालांवर झाला या काळातील राजकारणाची प्रमुख वैशिष्टये खालीलप्रमाणे -

१) मतदारासमोर नव्या पर्यायाची उपलब्धता

२) काँग्रेसच्या मतसंख्येत घट होऊन नव्या पक्षपद्धतीचा उदय – काँग्रेसेत्तोर राज्यव्यस्था

३) भाजपाचा झालेला विस्तार सामाजिकदृष्टया शहरी ब्राम्हण – बनियांचा पक्ष न राहता हिदुत्ववाद्यांचा पक्ष बनला

४) प्रादेशिक पक्षांचा राष्ट्रीय राजकारणातील वाढता प्रभाव

५) मागास, दलित, शोषित स्त्रिया या सामाजिक घटकाचे तीव्र राजकीयीकरण – राजकरणातील सहभाग वाढला.

६) निवडणुकांतील स्पर्धात्मकतेत वाढ – आघाड्यांच्या राजकारणाचा उदय झाल्याने एकपक्षीय सरकारांचा ऱ्हास.

## ३.५ भारतात आत्तापर्यंत झालेल्या प्रमुख निवडणुकांचा आढावा

### १. १९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुका

घटना समितीच्या निर्णयानुसार १७ कोटी ६० लाख भारतीय नागरिकांना मतदानाचा अधिकार मिळाला. स्वातंत्र्यानंतर होणाऱ्या या पहिल्याच निवडणुका होत्या. पहिले भारतीय निवडणूक आयुक्त सुकूमार सेन यांच्या मार्गदर्शनाखाली या निवडणुका पार पडल्या. १९२ राजकीय पक्ष निवडणुकीच्या रिंगणात होते. अपक्ष उमेदवारांनीही निवडणूकीच्या धामधुमीत उडी घेतली होती. राजकीय जीवनातील दुरवस्था, आणि विस्कळीतपणा पाहता या निवडणुका सुरळीतपणे पार पाडतील की, नाही याबद्दल साशंकता होती. परंतु या निवडणुका अत्यंत व्यवस्थित पार पडल्या.

लोकसभेसाठी ४४.६३% तर विधानसभांसाठी ४५.३०% मतदान झाले. काँग्रेस पक्षाला लोकसभेत ३६४ जागा मिळाल्या आणि पंडित जवाहरलाल नेहरू हे भारताच्या पंतप्रधानपदी विराजमान झाले. काँग्रेसला ४५% मतदारांचा पाठिंबा मिळाला. म्हणजेच ५५% मतदार काँग्रेस पक्षाला प्रतिकूल होते. राजकीय तज्ज्ञांच्या मते, हे मतदारांच्या प्रगल्भतेचे लक्षण होते. कारण काँग्रेस पक्षाच्या पाठीमागे देशाच्या स्वातंत्र्य चळवळीचा प्रदीर्घ इतिहास, राष्ट्रव्यापक संघटित असलेला देशपातळीवरील प्रमुख आणि एकमेव पक्ष असतानाही मतदारांनी आंधळेपणाने पक्षाला मते दिले नाही. समाजवादी, साम्यवादी व भारतीय जनंघ हे विरोधी पक्ष राष्ट्रीय पातळीवरील पक्ष लोकसभा निवडणुकीत प्रभावी ठरू शकले नाहीत. या पहिल्या निवडणुकांचे आव्हान देशाने उत्साहाने स्वीकारले आणि ते यशस्वीपणे पार पाडले. लोकशाही देशात रूजत असताना भारतीयांचा आत्मविश्वास वाढण्यास या निवडणुकांमुळे मदत झाली.

## २.१९७७ च्या निवडणुका

१९७७ च्या सहाव्या लोकसभा निवडणुका भारताच्या इतिहासात खूपच महत्वाच्या ठरल्या १२ जून, १९७५ रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाने भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली इंदिरा गांधी यांची १९७१ मध्ये लोकसभेवर झालेली निवड रद्द ठरवली आणि सहा वर्षासाठी कोणतीही निवडणूक लढवण्यास त्यांना अपात्र ठरविले. याचा फायदा घेऊन विरोधकांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली पण राष्ट्रहित आणि लोकाग्रहास्तव त्यांनी ती फेटाळून लावली. उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरूद्ध त्यांनी सर्वोच्च न्यायालयात अपिल केल. २४ जून १९७५ ला न्यायालयाने गांधींना स्थगिती दिली. त्यानुसार त्या पंतप्रधानपदावर राहू शकणार होत्या; पण त्यांचे लोकसभेच्या सदस्य म्हणून मिळणारे हक्क तहकूब होणार होते. विरोधकांनी शांततापूर्ण मार्गाने इंदिरा गांधींनी राजीनामा द्यावा अशी मागणी केली.

पुढील काळात लोकशाहीच्या नावाखाली इंदिरा गांधींची एकाधिकारशाही सुरू झाली. २५ जून १९७५ च्या मध्यरात्री त्यांनी देशात आणिबाणी जाहीर केली. विरोधी पक्षांच्या नेत्यांना अटक केली. वृत्तपत्रांवर निर्बंध लादले. संघटनांवर बंदी घातली. संसदेचा अधिवेशनात ३८ वी, ३९ आणि ४० वी अशा घटनादुरुस्त्या करून घेतल्या. त्यानुसार आणिबाणी पुकारण्याचा निर्णय न्यायीक पुनर्विलोकनातून काढून टाकला. राष्ट्रपती-उपराष्ट्रपती, पंतप्रधान आणि लोकसभा सभापती यांच्या निवडणुका संदर्भातील खटले चालविण्याचा न्यायालयांचा अधिकार रद्द ठरवला. जनप्रतिनिधित्व कायद्यातही काही बदल केले. न्यायालयाने सुधारित कायद्यातील तरतुदींनुसार इंदिरा गांधीना सर्व आरोपांमधून निर्दोष ठरवले.

या काळात लोकशाहीचे सर्व संकेत पायदळी तुडवले गेले. मिसा कायदा कडक करून प्रतिबंधक स्थानबद्धतेच्या नियमांखाली अटक केलेल्या व्यक्तींना न्यायालयात दाद मागता येणार नव्हती. राजकीय विरोधक-टीकाकारांचे हक्क हिरावून घेण्यात आले. लोकसभेची मुदत एक वर्षाने वाढवून सहा वर्षे करण्यात आली.

अशातच इंदिरा गांधींनी १८ जानेवारी, १९७७ ला लोकसभेच्या निवडणुका घेण्याचा निर्णय घेतला. लोकसभा विसर्जित करून आणीबाणी शिथिल केली. वृत्तपत्रांवरील सेन्सॉरशिप

काढून घेतली तरी सकारविरूद्ध आक्षेपार्ह मजकुर छापण्यास बंदी घालणारा कायदा करण्यात आला. अनेक संघटनांवरील बंदी कायम ठेवली.

या पार्श्वभूमीवर १९७७ च्या लोकसभा निवडणुका पार पडल्या. इंदिरा गांधींनी 'गरिबी हटाओ' चा नारा दिला. त्याला प्रत्युत्तर म्हणून विरोधकांनी 'इंदिरा हटाओ' चे आवाहन लोकांना केले. समाजवादी पक्ष, संघटना, काँग्रेस जनसंघ, काँग्रेस मधून बाहेर पडलेले काही तरूण नेते यांनी एकत्र येऊन जनता पक्षाची स्थापना केली. जनता पक्षाने निवडणुक प्रचारात आक्रमक पवित्रा घेतला. लोकशाही की हुकूमशाही यापैकी योग्य निवड करण्याचे आवाहन विरोधी पक्षांनी मतदारांना केले. प्रचार सभांमधून 'आणीबाणी', 'आणीबाणीत झालेले पोलिसी अत्याचार' मतदारांसमोर मांडले. १९७७ च्या सुरूवातीला लोकशाही काँग्रेस काँग्रेसमधून बाहेर पडली. त्यामुळे गांधींना अनपेक्षित धक्का बसला.

जनता पक्ष हे जनसंघाचे वेगळे रूप असून हा पक्ष सत्तेवर आल्यास देशात अस्थैर्य व अराजकता माजेल असे काँग्रेसने मतदारांना पटवून देण्याचा प्रयत्न केला. परंतु मतदारांना काँग्रेसचे हे मुद्दे पटले नाही. कुटुंबनियोजनातील अतिरेक आणि अत्यांचारामुळे मुस्लिम मतदार काँग्रेसपासून दुरावले होते. दलित-श्रमिकही काँग्रेस विरोधात उभे राहिले.

याचा परिणाम म्हणजे निवडणुकांचे निकाल अभुतपूर्व लागले. ५४२ जागांसाठी १५०० उमेदवार उभे होते. अपक्ष उमेदवारांची संख्या कमी झालेली होती. काँग्रेसला ३४.५ टक्के मते मिळाली तर जनता पक्षाला ६५.५ टक्के मते मिळाली. काँग्रेसला (१५३), जनता व लोकशाही काँग्रेस – २९९, सीपीआय २२, उजवा साम्यवादी पक्ष – ७, अपक्ष व अन्य पक्ष – ६० अशी मतविभागणी झाली. जनता पक्षाने इंदिरा गांधीसह अनेक दिग्गज काँग्रेस नेत्यांचा निवडणुकीत परावभ केला आणि जनता पक्ष सत्तेवर आला. राज्यांच्या राजकारणातही 'जनता लाटेचा' प्रभाव दिसून आला.

या निवडणुकीमुळे काँग्रेसची एकपक्षीय सत्ता संपुष्टात आली. विरोधी पक्षांचे पहिले सरकार सत्तेवर आले. दोन तुल्यबळ पक्षांच्या निर्मितीमुळे भारतीय लोकशाहीचे भवितव्य हे मजबूत झाले. जनतेचे राजकीय प्रबोधन १९७७ च्या निवडणुकीने केले

## ३. १९८९ नंतरच्या निवडणुका

राष्ट्रीय – प्रादेशिक पक्षांच्या १९८९ नंतरच्या निवडणुकातील कामगिरीचे विश्लेषण

### १) १९८९ ची लोकसभा निवडणुक :-

भारताच्या राजकीय इतिहासातील सर्वात महत्वाची व राजकीय व्यवस्थेत आगळेवेगळी समीकरण घडवूण आणणारी निवडणूक म्हणून या निवडणुकीकडे पाहिले जाते. यावेळी भारतीय राजकीय प्रक्रियेत महत्वाचे स्थित्यंतर घडून आले. या निवडणुकीपासून भारतात आघाडीच्या राजकारणाचा प्रयोग सुरू झाला. काँग्रेसेतर पक्षांनी काँग्रेसला बाजूला ठेवण्याचा प्रयत्न केला.

## निवडणुकाची पार्श्वभूमी :-

इंदिरा गांधींच्या हत्येनंतर १९८४ मध्ये राजीव गांधी पंतप्रधान झाले. १९८४ मध्ये घेण्यात आलेल्या निवडणुकीत काँग्रेस विजयी झाला. यानंतरच्या काळात बोर्फोस प्रकरण उद्भवले. परंतु राजीव गांधींनी स्वत:ची प्रतिमा मिस्टर क्लीन अशी केली. विरोधकांनी मात्र राजीव यांच्या विरोधात गदारोळ उठवला.

समाजवादी राजाचा चेहरा घेऊन विश्वनाथ प्रतापसिंग/ व्ही.पी.सिंग यांनी राजीव सरकारच्या भ्रष्टाचाराच्या विरोधात काँग्रेस पक्षाचा त्याग करून जनमोर्चा हा नवा पक्ष स्थापन केला. पुढे जनमोर्चा व देशातील अन्य विरोधी पक्षांनी एकत्र येऊन जनता दलाची स्थापना केली. काँग्रेस विरोध हे त्याचे ध्येय होते.

या पार्श्वभूमीवर नोव्हेंबर १९८९ मध्ये देशात ९ व्या लोकसभा निवडणुका घेण्यात आल्या. कोणताच महत्वाचा प्रश्न, घोषणा निवडणूक प्रचारात नव्हत्या. नेत्यांचे वैयक्तिक संघर्ष व गटबाजी सर्व पक्षात होती. इतर मुद्दयांना बाजूला ठेवून सत्तास्पर्धा हा मध्यवर्ती मुद्दा होता. निवडणुकांमध्ये ५२३ पैकी १९७ जागा मिळून काँग्रेस सर्वाधिक जागा मिळवणारा पक्ष ठरला. जनता दलाला १४१, भाजपला ८५ तर सीपीएमला ३३ जागा मिळाल्या. काँग्रेसला स्पष्ट बहुमत न मिळाल्याने सरकार स्थापन न करण्याचा निर्णय राजीव गांधींनी घेतला.

त्यानंतर व्हि. पी. सिंग यांनी तिसऱ्या आघाडीचे अल्पमतातील सरकार स्थापन केले (जनता दल – राष्ट्रीय मोर्चाचे सरकार) भाजपा व डाव्या आघाडीने सरकारमध्ये सामील न होता बाहेरून पाठींबा दिला.

व्हि. पी. सरकार ने मंडल आयोगाच्या शिफारशी अमलात आणण्याची ऐतिहासिक निर्णय घेतला. परिणामी देशात जातीय दंगली उसळल्या भाजपाने पाठींबा काढून घेतल्याने सिंग सरकार अल्पमतात गेले आणि पडले. त्यांचे सरकार पाडण्यात चंद्रशेखर यांचा हात होता. काँग्रेसच्या पाठीब्यावर चंद्रशेखर पंतप्रधान झाले. कालांतराने काँग्रेसने त्यांचाही पाठीबा काढून घेतला. त्यानंतर २१ जून १९९१ रोजी चंद्रशेखर सरकार ही कोसळले. चंद्रशेखर यांच्या सल्ल्याने राष्ट्रपतींनी लोकसभा बरखास्त केली.

## २) १९९१ च्या दहाव्या लोकसभा निवडणुका

१९९१ मध्ये दहाव्या लोकसभेसाठी निवडणुका झाल्या. अस्थैर्य, कायदा, सुव्यवस्थेसमोर हिंसाचार, जमातवाद, दहशतवाद ही संकटे गंभीर झाली. निवडणुकादरम्यान २१ मे १९९१ रोजी राजीव गांधीची हत्या झाली. त्यानंतर निवडणुकांचे निकाल जाहीर झाले. निवडणुकीत कोणत्याच पक्षाला निर्विवाद बहुमत मिळाले नाही. काँग्रेसला सर्वाधिक २२६ जागा मिळाल्या पी. व्ही. नरसिंहराव यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचे अल्पमतातील सरकार सत्तारूढ झाले. ११८ जागा मिळवून भाजपा विरोधी पक्ष बनला. सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची कार्यशैली, नेमस्त स्वभाव, सस्थात्मक मूल्याबाबत आस्था, सहकार्याभावनेच्या बळावर त्यांनी आपला कार्यकाळ पूर्ण केला.

## ३) १९९६ च्या ११व्या लोकसभा निवडणुका

मे १९९६ मध्ये अकराव्या लोकसभेच्या निवडणुका घेण्यात आल्या. उदार आर्थिक धोरणे यशस्विरित्या राबवणारे पी. व्ही. नरसिंहराव भारतीय अर्थव्यवस्थेला नव संजीवनी देण्यास यशस्वी झाले. परंतु त्यांच्या कारकिर्दीच्या उत्तरकाळात त्यांच्याविरुद्ध आर्थिक गैरव्यवहाराचे भ्रष्टाचाराचे आरोप झाले. याच काळात भाजपाने रामजन्मभूमीचा विषय घेऊन हिंदू व्होट बँक तयार केली. ६ डिसेंबर १९९२ रोजी आयोध्येतील बाबरी मशीद कारसेवकांनी पाडली त्यामुळे मुस्लीम समाज काँग्रेसवर नाराज होता.

या पार्श्वभूमीवर १९९६च्या निवडणुका झाल्या जमातवादाचा निवडणूक प्रचारातील वापर, नव्या आर्थिक धोरणातून उद्भवलेल्या आर्थिक समस्या, वाढता भ्रष्टाचार, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, मंडल आयोगाबद्दलच्या आंदोलनातून जागृत सामाजिक न्यायाचे भान इ. प्रश्नामुळे जनमत आंदोलित झाले. कोणत्याच पक्षावर लोकांचा विश्वास राहिला नाही. निवडणुकीत भाजपाला १६१, काँग्रेसला १३२ ,जागा मिळाल्या. अयोध्येतील रामजन्मभूमीच वादाचा फायदा भाजपाला मिळाला. प्रादेशिक पक्षांना प्रचंड मते मिळवून केंद्रीय राजकारणात त्यांची भूमिका निर्णयाक ठरली CPI (३२), जनता दल (४६), तेलगू देसम (१०), समाजवादी पक्ष (१७), DMK (१७), शिवसेना (१५) अशा जागा मिळाल्या परिणामी या निवडणुकीत त्रिशंकू लोकसभा अस्तित्वात आली.

कोणताही पक्ष स्पष्ट बहुमतापर्यंत पोहोचू शकत नसल्याने राष्ट्रपती डॉ. शंकरदयाल शर्मा यांनी सभागृहातील मोठा पक्ष म्हणून भाजपाला सरकार बनवण्याची संधी दिली. १५ मे १९९६ रोजी अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली भाजप सरकार सत्तारूढ झाले. कालांतराने बहुमत सिद्ध न करता आल्याने २८ मे १९९६ रोजी सरकार पडले. तेरा दिवस टिकलेले सरकार हे स्वतंत्र भारताच्या इतिहासातील सर्वात अल्पकालीन सरकार ठरले. त्यानंतर राष्ट्रीय व प्रादेशिक दोन्ही पातळींवरील लहान मोठया १३ पक्षांच्या आघाडीचे सरकार एच.डी. देवेगौडा यांच्या नेतृत्वाखाली सत्तारूढ झाले. ते जनता दलाचे होते. काँग्रेस व डाव्या आघाडीने सरकारला बाहेरून पाठींबा दिला.

दरम्यान, काँग्रेस नेतृत्व पी. व्ही. नरसिंहराव यांच्याकडून सीताराम केसरी यांच्याकडे गेले. त्यांना पंतप्रधानपदी बसण्याची इच्छा असल्याने त्यांनी दहा महिन्याच्या काळात देवेगौडा सरकारचा पाठींबा काढून घेतला. ११ एप्रिल १९९७ ला देवेगौडा सरकार पडले.

नंतरच्या काळात सत्तास्थापन्यात काँग्रेसला यश मिळाले नाही. त्यामुळे काँग्रेसने नेतृत्व बदल करण्याच्या अटीवर आघाडी सरकारला पुन्हा पाठींबा दिला. २१ एप्रिल १९९७ रोजी इंद्र कुमार गुजराल पंतप्रधान झाले. हे सरकारही अल्पजीवी ठरले. त्याला जैन आयोगाचा अहवाल कारण झाला. DMK पक्षाच्या मंत्र्यांना बडतर्फ करण्याची मागणी काँग्रेसने केली. संयुक्त आघाडीने ते फेटाळून लावली. परिणामी काँग्रेसने पाठींबा काढून घेतला आणि गुजराल सरकार पडले.

यावेळी भाजपा, काँग्रेस, संयुक्त आघाडी यांना कोणत्याच पक्षाचा पाठींबा मिळाला नाही शेवटी ४ डिसेंबर १९९७ रोजी राष्ट्रपती के.आर. नारायण यांनी अकरावी लोकसभा विसर्जित केली.

### ४) बाराव्या लोकसभा निवडणुका १९९८

मार्च १९९८ मध्ये १२ व्या लोकसभेच्या निवडणुका झाल्या. यावेळी पक्षांच्या निवडणूकपूर्व आघाड्या निवडणूक स्पर्धेत होत्या. भाजपाने आपल्या हिंदुत्वादी मागण्यांना मुरड घालून राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे नेतृत्व केले. भाजपाला १८० आणि भाजपा नेतृत्वाखालील आघाडीला २५२ जागा मिळाल्या. काँग्रेस १०० तर त्याच्या मित्रपक्षांना १६६ जागा मिळाल्या. तिसरा राष्ट्रीय मोर्चा व डावी आघाडी ९६ जागा जिंकू शकली.

भाजपा व त्याचे मित्रपक्षांना २५२ जागा मिळवूनही ते बहुमतपासून दूर होते. शेवटी तिसऱ्या आघाडीतील तेलगू देसमचा पाठींबा मिळवून अटबिहारी वाजपेयी सरकार सत्तारूढ झाले त्यात १२ पक्षांचा समावेश होता. भिन्न विचार व परस्परविरोधी हितसंबंधाच्या तेरा पक्षांना बरोबर घेऊन सरकार चालवणे कठीन होते. रालोआतील घटक पक्ष AIDMK ने आघाडीतून बाहेर पडून पाठींबा काढून घेतला. त्यामुळे वाजपेयी सरकार अल्पमतात आले. सरकारने लोकसभेत बहुमत गमावले हे स्पष्ट झाल्यावर राष्ट्रपतींनी पंतप्रधान वाजपेयींना लोकसभेत विश्वासदर्शक ठराव संमत करून घेण्याचा आदेश दिला. परंतु एक मत कमी पडल्यामुळे तेरा महिन्यातच वाजपेयी सरकार गडगडले.

तिसरी आघाडी किंवा काँग्रेस सरकार स्थापन करण्याइतपत बहुमत मिळवू न शकल्याने राष्ट्रपतींनी २६ एप्रिल १९९९ ला १२ वी लोकसभा विसर्जित केली

### ५. तेराव्या लोकसभा निवडणुका १९९९

१९९९ मध्ये तेराव्या लोकसभा निवडणुका झाल्या. कोणत्याही विशिष्ट प्रश्नापेक्षा सोनिया गांधी व वाजपेयी यांच्या व्यक्तिमत्वाना निवडणूक प्रचारात मध्यवर्ती केले. या निवडणुकती भाजपाला सर्वाधिक १८२ जागा तर काँग्रेसला ११२ जागा मिळाल्या. CPM ला (३३), तेलगू देसम (२९), समाजवादी पक्ष (२५), संयुकत जनता दल (१५), BSP (१४), तर राजदला ७ जागा मिळाल्या.

शेवटी भाजपाच्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीने २९६ जागा जिंकून बहुमत मिळवले. अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली २३ राजकीय पक्षांच्या आघाडीचे सरकार सत्तेवर आले.

काँग्रेस पक्षाचा या निवडणुकीत पराभव झाला. परकीय व्यक्तीने पंतप्रधानपद भूषवू की नये या मुद्दयावरून काँग्रेसमध्ये फूट पडली. १९९९ मध्ये शरद पवार यांनी काँग्रेसमधून बाहेर पडून राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली.

कोणतेही सबळ कारण नसताना केवळ वातावरण आपणास अनुकूल आहे ही बाब विचारात घेऊन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी राष्ट्रपतींना मुदतपूर्व लोकसभा बरखास्तीचा सल्ला दिला. त्यानुसार राष्ट्रपती कलम यांनी ६ फेब्रुवारी २००४ रोजी १३ वी लोकसभा मुदतपूर्व विसर्जित केली.

## ६) १४ व्या लोकसभा निवडणुका २००४

एप्रिल-मे २००४ मध्ये १४ व्या लोकसभेच्या निवडणुका पार पडल्या. या निवडणुकांमध्ये प्रथमच EVM – Electronic Voteing Machine चा वापर करण्यात आला. मतदारांनी कोणत्या पक्षाच्या बाजूने कौल दिला असावा? याचा राजकीय पक्ष, वृत्तपत्रे, निवडणूक विश्लेषकांना अंदाज बांधता आला नाही.

या निवडणुकांमध्ये काँग्रेसला १४६ जागा तर काँग्रेसप्रणीत आघाडीला २१८ जागा मिळाल्या. भाजपाला १३६ जागा तर भाजप्रणीत आघाडीला १८६ जागा मिळाल्या काँग्रेस लोकसभेतील सर्वाधिक जागा मिळवणारा पक्ष ठरला. भारतीय कम्युनिस्ट पक्ष (१०), मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष (४३) व अन्य डाव्या पक्षाच्या आघाडीस ५९ जागा मिळाल्या इतर पक्षांना ७६ जागा मिळाल्या.

या पार्श्वभूमीवर काँग्रेसने संसदीय पक्षाच्या नेत्या म्हणून सोनिया गांधी यांची निवड केली. समाजवादी पक्ष व बहुजन समाजपक्षाने ही या आघाडीस पाठींबा जाहीर केला. सर्वोच्च न्यायालयानेही सोनिया गांधींच्या भारतीय नागरिकत्वावर शिक्कामोर्तब केले. जनतेनेही सोनियांच्या नेतृत्वाला पाठींबा दिला. परंतु शरद पवार, त्यांच्या अन्य सहकाऱ्यांनी त्यांच्या विदेशीपणाचा मुद्दा पुन्हा उचलून धरला. या व अन्य कारणांनी अंतरात्म्याच्या आवाजाला प्रतिसाद देत सोनिया गांधींनी पंतप्रधानपद नाकारले. सोनिया गांधींची अनुकूलता लक्षात घेऊन काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या व काँग्रेस प्रणीत आघाडीच्या नेतेपदी डॉ. मनमोहन सिंग यांची निवड केली व प्रथमच एक अर्थतज्ञ भारताच्या पंतप्रधानपदी विराजमान झाला.

## ७) १५ व्या लोकसभेच्या निवडणुका २००९

१४ व्या लोकसभेने आपली पाच वर्षाची मुदत पूर्ण केली. मे २००९ मध्ये १५ वी लोकसभा अस्तित्वात आली. काँग्रेसला २०६ जागा तर भाजपाला ११६ जागा मिळाल्या. काँग्रेस पक्षाला लोकसभेतील सर्वाधिक जागा मिळाल्या. भाजपा हा लोकसभेतील दुसऱ्या क्रमांकाचा मोठा पक्ष व सर्वात मोठा विरोधी पक्ष ठरला. काँग्रेसच्या नेतृत्वाखाली संयुक्त पुरोगामी लोकशाही आघाडीचे सरकार पुन्हा सत्तेवर आले. पंतप्रधानपदी डॉ. मनमोहनसिंग यांची दुसऱ्यांदा निवड झाली. या काळातील महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे परराष्ट्र सेवेतील माजी सनदी अधिकारी मीरा कुमार यांनी लोकसभेचे सभातीपद भूषविले. त्या लोकसभेच्या पहिल्या महिला सभापती ठरल्या

## ८) १६ व्या लोकसभेच्या निवडणुका २०१४

१५ व्या लोकसभेने आपला ५ वर्षाचा कार्यकाल कसाबसा पूर्ण केला. परंतु UPA सरकारच्या दुसऱ्या कालखंडात पक्षाची ध्येयधोरणे, पक्षातील कार्यकर्ते-नेत्यांचा

भ्रष्टाचार यामुळे जनता काँग्रेसविरोधी बनली. या पार्श्वभूमीवर ७ एप्रिल २०१४ ते १२ मे २०१४ या दरम्यान ९ टप्प्यात १६ व्या लोकसभा निवडणुका पार पाडल्या. निवडणूक प्रचारादरम्यान काँग्रेस पक्षाविरूद्ध भाजपाने रणनीती आखली. या निवडणुकांचे वैशिष्टय म्हणजे भाजपाप्रणीत रालोआ आघाडीने आपला पंतप्रधान पदाचा उमेदवार निवडणुकीपूर्वीच घोषित केलेला होता. ते म्हणजे गुजरातचे माजी मुख्यमंत्री नरेंद्र मोदी हे होय. या काळात माध्यमांनीही काँग्रेसची भ्रष्टाचारी प्रतिमा व मोदी यांची विकासपुरुष ही प्रतिमा जनमानसापुढे उभी केली. या निवडणुकांमध्ये युवकवर्गाने भाजपाच्या पदरात आपली मते टाकली. रालोआने ३३६ जागा मिळवून नवा विक्रम प्रस्थापित केला. रालोआत सामील २९ पक्षांमध्ये भाजपाला २८२, शिवसेनेला १८ जागा मिळाल्या, तेलगू देसमला १६ जागा मिळाल्या.

आजपर्यंतच्या निवडणुकांमध्ये प्रथम भारतीय राष्ट्रीय काँग्रेस या पक्षाशिवाय भाजपाला बहुमताचा २७२ हा आवश्यक आकडा पार करता आला. निवडणुकांत संपुआला फारच कमी म्हणजे ६४ जागा मिळाल्या. काँग्रेसला ४४ जागा मिळाल्या. निवडणुकीत ६१ महिला खासदार निवडून आल्या. २६ मे २०१४ रोजी भारताचे सोळावे पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदींनी शपथ घेतली व भाजपाप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार केंद्रात सत्तेवर आले.

सुमित्राताई महाजन यांना यांना लोकसभेच्या दुसऱ्या महिला सभापती ठरण्याचा मान मिळाला.

### ९) २०१९ च्या लोकसभा निवडणुका

२०१९ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींचा करिश्मा कायम राहिला. या निवडणुकीत भारतात प्रथमच EVM – Electronic Voting Machine बरोबर VVPAT – Voter Verified Paper Audit Trail या मशीनचा वापर करण्यात आला. या निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे पंतप्रधानपदाचे उमेदवारी श्री नरेंद्र मोदी यांनाच घोषित करण्यात आले होते. मोदी लाटेचा प्रभाव, दुर्बल विरोधी पक्ष अशी काँग्रेसची झालेली प्रतिमा यांची परिणीती म्हणून भाजपाप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीला निर्विवाद बहुमत मिळाले.

## ३.६ सारांश

भारतीय निवडणुकांचा इतिहास पाहता भारतीय मतदारांमध्ये मोठ्या प्रमाणात राजकीय जागृती झालेली आहे. त्यामुळेच लोकांना गृहीत धरण्याची राजकीय पक्षांची धारणा होती ती भारतीय मतदारांनी संपुष्टात आणली आहे.

### आपली प्रगती तपासा

१) लोकभेच्या महत्वाच्या निवडणुकांचा आढावा घ्या.

२) १९७७ च्या लोकसभा निवडणुकांची चर्चा करा

३) १९७७ ची लोकसभा निवडणुकीवर भाष्य करा.

४) १९८९ पासून आजतागायत झालेल्या निवडणुकांमधील राष्ट्रीय प्रादेशिक पक्षांच्या कामगिरीचे विश्लेषण करा.

## ३.७ संदर्भग्रंथ

१) भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण – भास्कर लक्ष्मण भोळे, पिपळपुरे प्रकाशन, नागपुर.

❄❄❄❄❄❄❄

# समूह आणि निवडणूक सहभाग

**घटक रचना**

४.१ उद्दिष्टे

४.२ प्रास्ताविक

४.३ विषय विवेचन

४.३.१ समूह आणि निवडणूक सहभाग

४.३.२ भारतातील निवडणूक सहभाग एक दृष्टिक्षेप

४.३.३ महिलांचा निवडणूक प्रक्रियेतील सहभाग

४.३.४ दलितांचा निवडणूक प्रक्रियेतील सहभाग

४.३.५ आदिवासींचा निवडणूक प्रक्रियेतील सहभाग

४.३.६ अल्पसंख्याकांचा निवडणूक प्रक्रियेतील सहभाग

## ४.१ उद्दिष्टे:

“समूह आणि निवडणूक सहभाग” या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला पुढील बाबी समजून घेण्यास मदत होईल.

१. समूह आणि निवडणूक सहभाग म्हणजे काय हे स्पष्ट करता येईल.

२. महिला, दलित, आदिवासी आणि अल्पसंख्याक यांचा निवडणुकीतील सहभाग स्पष्ट करता येईल.

३. महिला, दलित, आदिवासी आणि अल्पसंख्याकांचे निवडणूक प्रक्रियेतील महत्त्व स्पष्ट करता येईल.

४. निवडणूकतील सहभागामुळे लोकांच्या सहभागाचे महत्त्व सांगता येईल.

## ४.२ प्रास्ताविक:

आधुनिक राजकीय व्यवस्थेमध्ये लोकांचा सहभाग असल्याशिवाय खऱ्या अर्थाने राजकीय व्यवस्था यशस्वी होऊ शकत नाही. आज राज्यांनी लोककल्याणकारी राज्याची भूमिका घेतल्यामुळे राज्याच्या कार्याची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे.आज सुरक्षा, कायदा, व्यवस्था ही कामे राज्याकडून केली जातात आणि या सर्व कामांसाठी लोकांचा सहभाग असणे गरजेचे आहे.भारताने लोकशाही पद्धतीचा स्वीकार केला असल्यामुळे आज आपल्या देशात लोकशाहीमध्ये जनतेचे प्रतिनिधी हे आपण निवडून देतो.आपला राज्यकारभार हा जनतेच्या प्रतिनिधी मार्फत चालतो.एकंदरीतच आपण कोणत्या प्रकारे व कशाप्रकारे आपले लोकप्रतिनिधी निवडून देतो यावरच राजकीय व्यवस्थेचे भवितव्य अवलंबून आहे.यासाठी

मोठ्या प्रमाणात लोकसहभाग वाढवणे गरजेचे आहे.लोकशाहीतील निवडणूक प्रक्रियेतील स्वरूप पाहता आज लोकांचा सहभाग हा वाढत आहे.लोकशाही व्यवस्थेत लोकांच्या सहभागामुळे निवडणुकाद्वारे राजकीय सत्ता प्राप्त केली जाते. राजकीय सत्ता प्राप्त करण्यासाठी आज समूहामध्ये वेगवेगळे गट आपली भूमिका वेळोवेळी निश्चित करतात.तसेच गटाच्या भूमिकेनुसार आपल्याला सत्तेतील वाटा मिळाला पाहिजे याचा विचार करताना आपल्याला दिसून येतात.एकंदरीतच मानवी जीवनात सत्तेचे आकर्षण आणि ती मिळवणे ह्या गोष्टीचा जर आपण विचार केला तर मानवी जीवन हे कोणत्या ना कोणत्या सत्तेशी निगडित असल्याचे आपल्याला दिसून येते. सत्ता म्हटले की राजकारण आले म्हणून राजकारणाला सत्तेपासून अलग करता येत नाही. एकंदरीतच आधुनिक राजकीय व्यवस्थेमध्ये तुम्हाला सत्तेमध्ये जर सहभागी व्हायचे असेल तर तुमचा निवडणुकीतील सहभाग हा वाढवने आज काळाची गरज झालेली आहे.परंतु भारतीय राजकीय व्यवस्थेचा विचार करता भारतामधील अनेक समूहांना मतदानाचा आणि राजकीय व्यवस्थेत निवडणुकीला उभा राहण्याचा हक्क जरी मिळाला असला तरी सुद्धा ते समूह हे राजकीय प्रक्रियेपासून दूर असल्याचा आपल्याला दिसून येतात. त्यामुळे त्या समूहाला वंचित समूह म्हणून ओळखल्या जाते.

## ४.३ विषय विवेचन:

### ४.३.१ समूह आणि निवडणूक सहभाग:

भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेस पक्षाची एक हाती राजवट आणि सत्ता देशात निर्माण झाली. काँग्रेस पक्षाच्या राजवटीत काँग्रेस पक्षाने भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या आंदोलनामध्ये सहभागी असणाऱ्या व काँग्रेसशी जवळीक साधणाऱ्या समूहांतील लोकांना उमेदवारी देऊन सत्तेत आणले. एकंदरीतच भारतात लोकशाही आल्यानंतर सत्तेची सूत्रे ही सामाजिक न्याय तत्वाला धरून इथल्या सर्व घटकांना समान वाटल्या गेली पाहिजे होती.पण ते काँग्रेसच्या राजवटीमध्ये होऊ शकले नाही.कारण राजकीय सत्तेचा सारीपाट हा जातीवर आणि प्रभावी राजकीय जातीमध्ये वाटल्या गेला. त्यामुळे देशात जाट, मराठा, पाटीदार, लिंगायत, असे समाज आपला राजकीय प्रभाव निर्माण करू शकले.वास्तविक पाहता समाजातील महिला, दलित, आदिवासी, अल्पसंख्यांक, भटके विमुक्त हे सत्तेच्या सारीपाठात वंचित राहिल्याचे दिसून येते. वास्तविक पाहता समाजातील या घटकाच्या लोकांना केवळ बोटावर मोजण्या एवढा राजकीय वाटा सत्तेमध्ये उपलब्ध झाला. पर्यायाने या समूहाकडे केवळ आणि केवळ एक गठ्ठा मतदानाच्या दृष्टिकोनातून पाहिल्या गेले. म्हणजेच या समूहाचा केवळ राजकीय स्वार्थासाठी वापर करण्यात आल्याचे आपल्या निदर्शनास येते. ह्या मागचे महत्त्वाचे कारण म्हणजे भारत स्वातंत्र्य झाल्यानंतरही भारतातील जातीव्यवस्था ही कमी होण्याच्या ऐवजी ती मोठ्या प्रमाणात बळकट केल्या गेली. त्यामुळे भारतातल्या लोकशाहीत वंचितांनी केवळ मतदान करायचे आणि सत्तेचा सारीपाठ हा प्रभावी समूहांनी भोगायचा हे भारतीय राजकीय व्यवस्थेचा चित्र या ठिकाणी राहिल्याचे आपल्याला दिसून येते. त्यामुळे राजकीय व्यवस्थेत सत्ता सामर्थ्यवान लोकांपुढे राजकीय सत्तेचा काही भाग मागितल्याशिवाय या समूहांना पर्याय नव्हता. परिणामी सत्ता सामर्थ्यवान लोकांनी वंचित समूहाचा वापर करून इथल्या वंचित समूहांना सत्तेपासून वंचित ठेवलेले आहे ही वस्तुस्थिती आहे.

भारतातील महिला, दलित, आदिवासी, अल्पसंख्याक विमुक्त, भटके विमुक्त आणि अर्ध भटके समुदाय हा सर्वात वंचित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल समाज आहे. त्यामुळे विकासाची आणि सत्तेची किरणे ही ह्या समुदायाच्या शेवटच्या माणसापर्यंत पोहोचत नाहीत तोपर्यंत खऱ्या अर्थाने विकास झाला असे आपल्याला म्हणता येत नाही. त्यामुळे प्रत्येक देशाची लोककल्याणकारी व्यवस्था ही शेवटच्या माणसाच्या उन्नतीसाठी कटिबद्ध असली पाहिजे,व त्याला सर्वसमावेशक विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणारी जी यंत्रणा आहे त्या यंत्रणेला लोककल्याणकारी यंत्रणा असे म्हणतात.

निवडणूक प्रक्रियेतील सहभागामध्ये फक्त मतदान करण्यापेक्षा अनेक बाबी समाविष्ट आहेत.त्या म्हणजे बोलण्याच्या, एकत्र येण्याच्या आणि सहवासाच्या स्वातंत्र्यापासून निवडणुकीतील सहभाग सुरू होतो. सार्वजनिक व्यवहारात भाग घेण्याची क्षमता आणि उमेदवार म्हणून नोंदणी करण्याची, प्रचार करण्याची, निवडून येण्याची आणि सरकारच्या सर्व स्तरांवर पद धारण करण्याची संधी म्हणजेच निवडणुकीतील सहभाग होय. आंतरराष्ट्रीय मानकांनुसार, राजकीय प्रक्रियेच्या सर्व पैलूंमध्ये पूर्णतः सहभागी होण्याचा पुरुष आणि महिलांना समान अधिकार आहे. परंतु एकंदरीतच वेगवेगळ्या देशांची आणि भारताची राजकीय व्यवस्था पाहता भारतीय राजकीय व्यवस्थेमध्ये आज मोठ्या प्रमाणात महिला, दलित, आदिवासी, अल्पसंख्यांक हे समूह मोठ्या प्रमाणात वंचित राहतांना आपल्याला दिसून येतात.महिलांना राजकीय प्रक्रियेत येणे हा भारतीय राजकीय व्यवस्थेचा विचार करता पुरुषी मानसिकता पाहता भारतातील महिलांना त्यांना मिळालेले अधिकार वापरणे अनेकदा कठीण होऊन जाते. त्याच्यासोबत देशांमध्ये आदिवासी, दलित, अल्पसंख्याकांच्या सहभागासाठी वारंवार अनेक अडथळे येतात, वास्तविक पाहता हे सर्व समूह देशाचे नागरिक आहेत तरीपण त्यांच्या अधिकारावर अनेक वेळा गदा आणली जाते त्या दृष्टिकोनातून त्यांच्या हक्कांचा आदर केला जाईल याची खात्री करण्यासाठी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.

महिलां, दलित, आदिवासी, अल्पसंख्यांकाच्या राजकीय सहभागावर परिणाम करणाऱ्या सर्वात महत्त्वाच्या घटकांमध्ये राजकीय पक्ष येतात. बहुतेक देशांमध्ये राजकीय पक्ष ठरवतात की कोणते उमेदवार नामनिर्देशित करावयाचे, सोबतच निवडणुकीला नामनिर्देशित उमेदवार करताना त्या उमेदवाराची निवडून येण्याची क्षमता, भारतात त्या उमेदवाराच्या जातीचे मतदान किती आहे, त्याचा मतदारसंघावर प्रभाव किती आहे, सोबतच त्या मतदारसंघातील स्थानिक मुद्दे कोणते आहेत, त्या स्थानिक मुद्द्यांचा आधारावर आपला उमेदवार निवडून येण्यावर किती परिणाम होऊ शकेल, तसेच राष्ट्रीय राजकारणातील महत्त्वाचे मुद्दे यांचा विचार करून राजकीय पक्ष निवडणुकातील उमेदवार ठरवताना आपल्याला दिसून येतात. म्हणून राजकीय प्रक्रियेमध्ये वेगवेगळ्या समूहांना विशेष असे महत्त्व प्राप्त होते.आधुनिक राजकीय व्यवस्थेमध्ये वेगवेगळे समूह आणि त्यांचे हितसंबंध पाहता ते लोकशाहीला पूरक असल्याचे दिसून येतात. आधुनिक राजकीय व्यवस्थेमध्ये विकासाला अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेला आहे. त्या दृष्टिकोनातून प्रत्येक समुह आपल्या विकासासाठी प्रयत्नशील असतो. प्रत्येक समूह हा आपल्या विकासासाठी शासनाला प्रभावित करण्याचे काम करताना दिसून येतो. त्यामुळे आज संसदीय लोकशाही आणि निवडणुका ह्याचा विचार करता समूह हे आज निवडणुकांचे आणि लोकशाहीचे महत्त्वाचे अंग बनतात.

### ४.३.२ भारतातील निवडणूक सहभाग एक दृष्टिक्षेप:

भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर भारतीय संसदेच्या निवडणुकांचा जर आपण विचार केला तर सध्याची अस्तित्वात असलेली ही १७वी लोकसभा आहे.लोकसभेत प्रौढ मताधिकाराच्या आधारे प्रत्यक्ष निवडणुकांद्वारे निवडलेल्या लोकप्रतिनिधींचा समावेश हा लोकसभेत होतो. राज्यघटनेने सभागृहाचे कमाल संख्याबळ ५५२ निश्चित केलेले आहे. त्यामध्ये राज्यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी ५३० सदस्यांपर्यंत, केंद्रशासित प्रदेशांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी २० सदस्यांपर्यंत आणि अँग्लो-इंडियन समुदायाच्या दोनपेक्षा जास्त सदस्यांच्या निवडीद्वारे बनवली जाते. एकंदरीतच भारतीय निवडणुकीच्या संदर्भात संसदेच्या निवडणुकांचा विचार करता आतापर्यंत निवडणुकी मधला जो काही लोकांचा सहभाग आहे त्या सहभागाची चर्चा आपल्याला पुढील प्रमाणे करता येईल.

**मतदान नोंदणी व मतदानाची टक्केवारी:**

| निवडणुकीचे वर्ष | नोंदणीकृत मतदार दशलक्षामध्ये | मतदान टक्केवारी |
|---|---|---|
| 1951 | 173.2 | 45.67 |
| 1957 | 193.7 | 47.74 |
| 1962 | 216.4 | 55.42 |
| 1967 | 249 | 61.33 |
| 1971 | 274.2 | 55.29 |
| 1977 | 321.2 | 60.49 |
| 1980 | 356.2 | 56.92 |
| 1984-85 | 400.3 | 64.01 |
| 1989 | 498.9 | 61.95 |
| 1991-92 | 511.5 | 55.88 |
| 1996 | 592.6 | 57.94 |
| 1998 | 605.9 | 61.97 |
| 1999 | 619.5 | 59.99 |
| 2004 | 671.5 | 57.98 |
| 2009 | 717 | 58.19 |
| 2014 | 834 | 66.44 |

एकंदरीतच देशाच्या १६ लोकसभा निवडणुकीचा जर आपण विचार केला तर प्रत्येक लोकसभा निवडणुकीत मतदार नोंदणी वाढत जाताना आपल्याला दिसून येते. तसेच १६

लोकसभा निवडणुकीच्या झालेल्या मतदानाची टक्केवारीची आपण सरासरी पाहिली तर ती ५७.९५ टक्के इतकी आहे. मतदार नोंदणी आणि प्रत्यक्ष झालेले मतदानाची जर आपण तुलना केली तर प्रत्यक्ष झालेल्या मतदान नोंदणी पेक्षा जवळपास ४२ टक्के मतदान कमी होताना दिसून येते. एकंदरीतच जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या व्यवस्थेत लोकांना मतदान करण्यासाठी जागृत व मतदान शिक्षण देणे आज गरजेचे ठरत आहे.तसेच मतदान प्रक्रियेचे महत्त्व ही समजावून सांगावे लागत आहे. एकंदरीतच मतदान प्रक्रियेचा जर आपल्याकडील इतिहास पाहिला तर होणाऱ्या मतदानाची टक्केवारी पाहता मतदान करण्यामध्ये लोकांची उदासीनता मोठ्या प्रमाणात दिसून येते.

**निवडणुकीला उभे राहिलेले उमेदवार संख्या:**

| निवडणूक वर्ष | उमेदवारांची संख्या |
|---|---|
| 1951 | 1874 |
| 1957 | 1519 |
| 1962 | 1985 |
| 1967 | 2369 |
| 1971 | 2784 |
| 1977 | 2439 |
| 1980 | 4629 |
| 1984-85 | 5492 |
| 1989 | 6160 |
| 1991-92 | 8749 |
| 1996 | 13952 |
| 1998 | 4750 |
| 1999 | 4648 |
| 2004 | 5435 |
| 2009 | 8070 |
| 2014 | 8251 |

Reference: ECI Publications & website: www.eci.nic.in

भारतातील लोकसभा निवडणुकीला उभ्या राहणाऱ्या उमेदवारांची संख्या पाहता सर्वाधिक कमी उमेदवार संख्या ही १९५१ च्या पहिल्या निवडणुकीत होती तर सर्वाधिक उमेदवारांची संख्या ही १९९६ च्या निवडणुकीमध्ये आपल्याला पाहायला मिळते.

**राजकीय पक्षांनी निवडणूक लढवलेल्या जागा आणि जिंकल्यालेल्या जागा - पक्षाच्या प्रकारानुसार:**

| निवडणूक वर्षे | एकूण राजकीय पक्षाचा सहभाग | राजकीय पक्षांच्या दर्जाप्रमाणे जिंकलेल्या जागांची संख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्ष | मान्यताप्राप्त प्रादेशिक पक्ष | नोंदणीकृत पक्ष पण दर्जा नसलेले पक्ष | स्वतंत्र उमेदवार | एकूण |
| 1951 | 53 | 418 | 34 | - | 37 | 489 |
| 1957 | 15 | 421 | 31 | 0 | 42 | 494 |
| 1962 | 27 | 440 | 28 | 6 | 20 | 494 |
| 1967 | 25 | 440 | 43 | 2 | 35 | 520 |
| 1971 | 53 | 451 | 40 | 13 | 14 | 518 |
| 1977 | 34 | 481 | 49 | 3 | 9 | 542 |
| 1980 | 36 | 485 | 34 | 1 | 9 | 529 |
| 1984-85 | 35 | 462 | 66 | 0 | 13 | 541 |
| 1989 | 113 | 471 | 27 | 19 | 12 | 529 |
| 1991-92 | 145 | 478 | 51 | 4 | 1 | 534 |
| 1996 | 209 | 403 | 129 | 2 | 9 | 543 |
| 1998 | 176 | 387 | 101 | 49 | 6 | 543 |
| 1999 | 169 | 369 | 158 | 10 | 6 | 543 |
| 2004 | 230 | 364 | 159 | 15 | 5 | 543 |
| 2009 | 363 | 376 | 146 | 12 | 9 | 543 |
| 2014 | 464 | 342 | 182 | 16 | 3 | 543 |

एकंदरीतच देशाच्या लोकसभा निवडणुकीत राजकीय पक्षांचा सहभाग जर बघितला तर तो सहभाग हा दिवसेंदिवस वाढत असल्याचे आपल्याला दिसून येतो. तसेच लोकसभा

निवडणूक जिंकण्याच्या संदर्भात लोकसभेमध्ये राष्ट्रीय पक्षांचा प्रभाव हा मोठ्या प्रमाणात राहिलेला आहे.तसेच लोकसभा निवडणूक जिंकण्याच्या संदर्भात लोकसभेमध्ये प्रादेशिक पक्ष हे दुसऱ्या स्थानावर राहताना दिसून येतात. नोंदणीकृत व दर्जा नसलेल्या पक्षांचा व स्वतंत्र उमेदवाराचा प्रभाव हा लोकसभा निवडणुकीत कमी प्रमाणात असल्याचे दिसून येते.

**१७ वी लोकसभा २०१९ महत्त्वाच्या नोंदी:**

- सतराव्या लोकसभेसाठी एकूण ५४३ जागांवर निवडणूक झाली त्यापैकी ४१२ जागा ह्या खुल्या प्रवर्गासाठी तर अनुसूचित जातीसाठी ८७ जागा व अनुसूचित जमातीसाठी ४७ जागा ह्या राखीव ठेवण्यात आल्या होत्या.

- निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची संख्या: ८०५४

- **मतदार नोंदणी व झालेले मतदान**

| | | पुरुष | महिला | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | एकूण मतदार नोंदणी | 473373748 | 438537911 | 39075 | 911950734 |
| २ | मतदान केंद्रावर मतदान करणाऱ्या मतदारांची संख्या | 317246927 | 294624323 | 5721 | 611876971 |
| ३ | मतदानाची टक्केवारी (पोस्टल मतपत्रिका वगळुन) | 67.02 | 67.18 | 14.64 | 67.1 |

- **विजय उमेदवार पुरुष ४६५ महिला ७८ एकूण ५४३**

**४.३.३ महिलांचा निवडणूक प्रक्रियेतील सहभाग:**

भारतातील निवडणुकीतील महिलांचा सहभाग हा मुद्दा चर्चेचा ठरत आला आहे.भारतातील निवडणूक प्रक्रियेतील महिलांचा सहभाग पाहता सरोजिनी नायडूंनी देशभरातील महिलांचे प्रतिमंडळ तयार करून तत्कालीन सचिव मॉटेग्यू यांच्याकडे प्रतिनिधित्वाची मागणी केली पण ती फेटाळण्यात आली. मॉटेग्यू कायद्यानंतर १९१९चा कायदा झाला. त्यात मतदानाच्या

हक्कात महिलांचा समावेश नव्हता. महिलांच्या मताधिकाराविरुद्ध असलेल्या या निर्णयाचा मोतिलाल नेहरूंनी निषेध केला आणि 'मताधिकाराचा दिवस लवकर उगवेल', यासाठी भारतीय प्रयत्न करतील अशी आशा व्यक्त केली. १९२७ मध्ये मद्रास राज्याच्या प्रांतीय विधिमंडळाने त्यांचे सदस्यत्व महिलांसाठी खुले केले. १९२८ ते १९३७ च्या दरम्यान, भारतीय महिलांनी विधिमंडळात महिलांना अधिक प्रमाणात प्रतिनिधित्व देत मताधिकाराची संकल्पना विस्तारण्याचे मार्ग शोधले. १९३२मध्ये लोधी समितीने अल्पसंख्याक व वंचित वर्गांप्रमाणे महिलांनाही हक्क देण्याचा निर्णय घेऊन दहा वर्षांसाठी प्रांतीय विधिमंडळात २.५टक्के जागा आरक्षित केल्या. राष्ट्रीय नियोजन आराखड्यात स्थानिक स्वराज्य संस्थापातळीवर ३०टक्के जागा आरक्षित करण्याचे सुचविण्यात आले होते.राजकारणात महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळावे ही मागणी प्रदीर्घ कालापासून होत आहे. निवडणुका आल्या की महिलांच्या हक्काची चर्चा होते. मात्र, महिला उमेदवारांना तिकीट देण्याचा मुद्दा आला की सगळे पक्ष मात्र पद्धतशीरपणे डोळेझाक करतात. भारतात राजकीय प्रक्रियेत महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी आरक्षण देण्याचा मुद्दा पुढे आला तेव्हा संसदेत याबाबत चर्चा सुरु झाली, त्यातून १९९३ मध्ये राज्यघटनेतील ७३ आणि ७४व्या दुरुस्तीअंतर्गत महिलांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३३ टक्के जागावर आरक्षण देण्यात आले. कालांतराने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना काही राज्यात कायद्याने ५० टक्के आरक्षण देण्यात आलेले असले तरी लोकसभा आणि विधानसभेमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण असावे यासंदर्भातील महिला आरक्षण विधेयक आणि त्याच्याशी संबंधित १०८वी घटनादुरुस्ती विधेयक राज्यसभेत मंजूर झाले असले तरीही २०१० पासून लोकसभेत प्रलंबित आहे.

१९९६ मध्ये देवेगौडा यांच्या नेतृत्वाखालील लोकसभेत हे विधेयक पहिल्यांदा मांडण्यात आले होते, तेव्हा शरद यादव यांनी या विधेयकाला विरोध केला होता.१९९८ मध्ये जेव्हा तत्कालीन कायदामंत्री थंबी दुराई हे विधेयक मांडण्यासाठी उभे राहिले तेव्हा संसदेत प्रचंड गदारोळ आणि गोंधळ झाला, त्यानंतर लोकसभेतच त्यांच्या हातातून विधेयकाची प्रत हिसकावून घेऊन फाडण्यात आली होती.महिला आरक्षण विधेयकावर आजपर्यंत राजकीय पक्षांमध्ये एकमत होऊ शकले नाही. या आरक्षण मंजुरीतील सर्वात मोठा अडथळा म्हणजे राजकारण्यांची पुरुषी मानसिकता होय.त्यामुळे महिला आरक्षण विधेयक हा भारतीय राजकारणाचा सर्वात मोठा सापळा ठरत आहे. भारतातील सक्रीय राजकारणात महिलांची टक्केवारी केवळ ११.८ टक्के आहे. देशातील अर्ध्या जनतेचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या महिला समूहांना ३३ टक्के आरक्षण देणे आवश्यक असतानाही राजकीय पक्षांमध्ये एकमत होऊ शकत नाही हे भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी काळातील शोकांतिकाच म्हणावी लागेल.त्यामुळे भारताच्या राष्ट्रीय राजकारणात आणि राज्य पातळीवरील राजकारणात महिलांना कायद्याने आरक्षण मिळालेले नाही. महिलांच्या राजकारणातील आरक्षणाबाबत

केवळ राजकीय दृष्टिकोनातून बोलल्या जाते. परंतु महिला आरक्षण विधेयकाच्या संदर्भात ज्यावेळेस ते लोकसभेत पास करायचे त्यावेळेस अनेक राजकीय पक्ष त्याला विरोध करताना आपल्याला दिसून येतात. त्यामुळे राज्य आणि राष्ट्रीय राजकारणाच्या प्रवाहात महिलांची संख्या कमी आहे.भारताच्या तुलनेत बांगलादेशमध्ये महिलांच्या राजकीय आरक्षणाला मान्यता मिळाली आहे, जर्मनी, ऑस्ट्रेलिया आदी विकसित देशांमध्ये ४० टक्के महिला राजकारणात आहेत. बेल्जियम, मेक्सिको आदी देशांमध्ये हे प्रमाण ५० टक्के आहे. फ्रान्समध्ये(France) तर महिला स्थानिक राजकारणापासून ते देशाच्या राजकारणापर्यंत सर्वत्र मोठ्या प्रमाणात सक्रीय आहेत.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या अहवालानुसार, कायदेमंडळात महिलांच्या प्रतिनिधित्वात भारताचा सध्या १४९ वा क्रमांक लागतो.राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर महिलांच्या अधिकारांबाबत होणारे विचारमंथन लक्षात घेऊन काही राजकीय पक्ष स्वेच्छेने काही प्रमाणात महिलांना उमेदवारी देत आहेत. अलीकडच्या काळात भारतात राजकारणासह अनेक क्षेत्रांत महिलांचा सहभाग वाढत असला, तरी महिलांनाही लिंगभाव समानतेच्या प्रश्नाला सामोरे जावे लागत आहे. लैंगिक शोषण, राजकीय पक्षात चांगली वागणूक न मिळणे, कौटुंबिक हिंसाचार, असे प्रश्न तेथेही आहेतच. त्यातच स्त्रियांची पारंपरिक कौटुंबिक जबाबदारी, त्यामुळे राजकारणासाठी वेळ देणे त्यांना शक्य होत नाही. आजही स्वाभाविकच तरुण मुली व स्त्रिया राजकारणात येण्यास फारशा उत्सुक नाहीत असे चित्र आढळत असले तरी भारतात राष्ट्रपतीपदा सारख्या सर्वोच्च अशा पदावर दोन वेळा काम करण्याची महिलांना संधी मिळाली आहे. भारतीय राजकारणाच्या दृष्टिकोनातून ही एक चांगली सुधारणा म्हणावी लागेल.पाश्चात्त्य देशांच्या तुलनेत आपल्याकडे महिला जात, धर्म, भाषा, प्रांत, पेहराव, शिक्षण, दारिद्‌य्र यांमुळे नेहमीच राजकीय सामाजिक क्षेत्रात पाठीमागे राहिल्या आहेत.त्यामुळे, महिलांमध्ये वैयक्तिक हक्कांची जाणीव निर्माण करण्यासाठी विशेष प्रयत्न आपल्याकडे करावे लागत असल्याने त्यांची अपेक्षित प्रगती होऊ शकलेली नाही ही वस्तुस्थिती आहे. आपण अजूनही खंबीर,पक्षपाताच्या, असमानतेच्या विरोधात आवाज उठवेल आणि महिलांचे मनोबल उंचावून त्यांना राजकारणाच्या मुख्य प्रवाहात ओळख निर्माण करील, अशा महिला नेतृत्वाच्या प्रतीक्षेत आहोत. जोपर्यंत आपला समाज खऱ्या अर्थाने आपल्या अधिकारांच्या व हक्काच्या बाबतीत जागृत होणार नाही तोपर्यंत देशात लिंगभावविषयक असमानता सुरूच राहील यात शंका नाही.

**भारतीय राजकारणातील महिलांचा सहभाग एक दृष्टिक्षेप:**

| निवडणूक वर्ष | निवडणुकीला उभ्या राहणाऱ्या महिलांची संख्या | | विजयी महिला उमेदवारांची संख्या | | एकूण नोंदणीकृत मतदारांपेक्षा महिला नोंदणीकृत मतदारांची संख्या (%) | एकूण मतदानापेक्षा महिला मतदारांनी केलेल्या मतदानाची संख्या | नोंदणीकृत महिला मतदारांपेक्षा महिलांनी दिलेली मते |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | | | |
| **1951** | - | - | 24 | | 45.0 | - | - |
| **1957** | 45 | 3.0 | 22 | 4.5 | 47.2 | 38.30 | 38.80 |
| **1962** | 66 | 3.3 | 31 | 6.3 | 47.3 | 39.80 | 46.60 |
| **1967** | 68 | 2.9 | 29 | 5.6 | 48.0 | 43.40 | 55.50 |
| **1971** | 61 | 2.2 | 29 | 5.6 | 47.7 | 42.30 | 49.10 |
| **1977** | 70 | 2.9 | 19 | 3.5 | 48.0 | 43.60 | 54.90 |
| **1980** | 143 | 3.1 | 28 | 5.3 | 47.9 | 43.10 | 51.20 |
| **1984** | 171 | 3.1 | 42 | 8.2 | 48.2 | 44.40 | 58.60 |
| **1985*** | 9 | 5.0 | 1 | 3.7 | 45.7 | 45.40 | 71.70 |
| **1984-85** | 171 | 3.1 | 43 | 7.9 | 48.04 | 44.46 | 59.25 |
| **1989** | 198 | 3.2 | 29 | 5.5 | 47.5 | 43.90 | 57.30 |
| **1991-92#** | 330 | 3.8 | 39 | 7.3 | 47.4 | 42.90 | 50.60 |
| **1996** | 599 | 4.3 | 40 | 7.4 | 47.7 | 44.00 | 53.40 |
| **1998** | 274 | 5.8 | 43 | 7.9 | 47.7 | 44.40 | 57.70 |
| **1999** | 284 | 6.1 | 49 | 9 | 47.7 | 44.30 | 55.60 |
| **2004** | 355 | 6.5 | 45 | 8.3 | 48.0 | 44.40 | 53.60 |
| **2009** | 556 | 6.9 | 59 | 10.9 | 47.7 | 45.80 | 55.80 |
| **2014** | 668 | 8.0 | 62 | 11.4 | 47.6 | 46.95 | 65.50 |

टीप: 1951 च्या निवडणुकीत महिलांच्या सहभागाची आकडेवारी उपलब्ध नाही

* आसाम आणि पंजाब राज्यांसाठी स्वतंत्रपणे निवडणुका घेण्यात आल्या

# पंजाब राज्यासाठी स्वतंत्रपणे निवडणुका घेण्यात आल्या

१९५१ ते २०१४ या कालावधीतील लोकसभा निवडणुकीला उभ्या राहणाऱ्या महिला उमेदवारांचा जर तुलनात्मकदृष्ट्या अभ्यास केला असता असे लक्षात येते की १९५१ पासून निवडणुकीला उभ्या राहणाऱ्या महिला उमेदवारांची व निवडून येणाऱ्या महिला उमेदवारांची संख्या ही दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच एकूण मतदारांच्या संदर्भात ज्यावेळेस महिला

मतदारांचा विचार केला जातो त्यावेळेस जवळपास ४८ टक्क्यापर्यंत पर्यंत महिला मतदार ह्या देशात असल्याचे आपल्याला दिसून येतात.

**१७ व्या लोकसभेत पक्षाने निवडून आलेल्या महिला उमेदवारांची संख्या:**

सतराव्या लोकसभेत एकूण ७८ महिला उमेदवार निवडून आल्या आहेत. त्यामध्ये सर्वाधिक ह्या भाजपाच्या महिला उमेदवार आहेत.

| Sl. No. | Party Name | No. of Members |
|---|---|---|
| 1 | Bharatiya Janata Party(BJP) | 42 |
| 2 | All India Trinamool Congress(AITC) | 9 |
| 3 | Indian National Congress(INC) | 7 |
| 4 | Biju Janata Dal(BJD) | 5 |
| 5 | Yuvajana Sramika Rythu Congress Party(YSR Congress Party) | 4 |
| 6 | Dravida Munnetra Kazhagam(DMK) | 2 |
| 7 | Independent(Ind.) | 2 |
| 8 | Shiv Sena(SS) | 2 |
| 9 | Apna Dal (Soneylal)(Apna Dal (S)) | 1 |
| 10 | Bahujan Samaj Party(BSP) | 1 |
| 11 | Janata Dal (United)(JD(U)) | 1 |
| 12 | Lok Jan Shakti Party(LJSP) | 1 |
| 13 | National People's Party(NPP) | 1 |
| 14 | Nationalist Congress Party(NCP) | 1 |
| 15 | Shiromani Akali Dal(SAD) | 1 |
| 16 | Telangana Rashtra Samithi(TRS) | 1 |

भारतातील महिला मतदारांची संख्या पाहता भारतीय राजकारणातील कार्यशील महिलांचे प्रमाण इतर देशांच्या तुलनेत ते प्रमाण अतिशय कमी आहे.एकंदरीतच भारतामध्ये राजकारणामध्ये काम करण्यासाठी महिलांचे प्रश्न सोडविण्याचे प्रामाणिक प्रयत्न राजकीय पातळीवर कितपत होतात याबाबतीतही शंका व्यक्त केल्या जातात.याबाबतही स्त्रियांकडून शंकेचा सूर व्यक्त होतो. महिलांचा राजकारणातील सहभाग वाढवण्याची मागणी केली जात असली, तरी महिला उमेदवार शोधणे हे राजकीय पक्षांसाठी कठीण असते. या शिवाय प्रामुख्याने आपल्या निवडणुकीसाठी निधी मिळवणे हीदेखील महिलांसाठी अडचणीची बाब ठरते. तरीही राजकारणात महिलांना आरक्षण देण्याबाबत राजकीय पक्ष ठाम भूमिका घेताना दिसत नाहीत.निवडणुकीत महिला लोकप्रतिनिधींचा टक्का वाढवण्यासाठी महिलांना आरक्षण देण्याचे विधेयक पास करण्याची गरज ही आधुनिक भारतात सध्यातरी आहे. राजकीय प्रक्रियेमध्ये महिलांना सक्षम करण्यासाठी राजकीय पक्षांची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची आहे.महिलांच्या राजकीय भावनांना आकार देण्यामध्ये राजकीय पक्ष खूप प्रभावशाली असल्याने, निवडणुकांमध्ये महिलांचा सहभाग वाढवण्याचा प्रयत्न करणारी सरकारे आणि आंतरराष्ट्रीय संस्था राजकीय पक्षांच्या भूमिकेवर न्याय्यपणे लक्ष केंद्रित करत असतात.महिलांच्या राजकीय सहभागाचे महत्त्व लक्षात घेता आज देशांमध्ये जवळपास एकूण मतदानापैकी ५० टक्के मतदान हे महिला मतदारांचे असूनही त्यांना त्यांचा वाटा योग्य

प्रमाणात मिळत नाही. आज देशात शिक्षणाचे प्रमाण वाढल्यामुळे महिला स्वतंत्र कृतीद्वारे- विशेषत:स्थानिक पातळीवर-आणि नागरी समाज संघटनांमध्ये सामील होऊन निवडणूक प्रक्रियेच्या काही पैलूंमध्ये सहभागी होताना दिसून येतात. तसेच देशांतील काही महिला ह्या राजकारणापासून अलिप्त राहून ही वेगवेगळ्या संमेलनामध्ये, वेगवेगळ्या सामाजिक संघटनांमध्ये, शासन पातळीवर, सहभागी होऊन नेतृत्वाचा व राजकीय अनुभव प्राप्त करतानाही आपल्याला दिसून येतात.म्हणून महिलांचे नेटवर्क, कामगार संघटना, गैर-सरकारी संस्था आणि माध्यमे हे सर्व महिलांच्या राजकीय सहभागासाठी वेगवेगळी मार्ग ठरू शकतात.

**महिलांच्या राजकीय सहभागासाठी निर्माण होणारे अडथळे:**

अनेक देशांमध्ये महिलांचे अधिकार कायद्यात निहित आहेत. तसेच भारतातही महिलांच्या अधिकार कायद्याने निहित केलेले आहेत. भारतात निवडणूक प्रक्रियेत महिलांच्या राजकीय सहभागासाठी कोणतेही औपचारिक कायदेशीर अडथळे नसले तरीही. व्यवहारात, महिलांच्या राजकीय सक्रिय सहभागामध्ये अनेकदा मोठे अडथळे येतात. निवडणुकात सहभागी होणे व निवडणुका जिंकण्यातील महिलांना येणाऱ्या अडचणी पाहता महिलांच्या सामाजिक-राजकीय स्थानाबाबत आणि खऱ्याखुऱ्या प्रतिनिधित्वाबाबत आपल्याकडील चित्र काय आहे? हे आपल्याला आता तपासावे लागत आहे.

राजकारण ह्या क्षेत्रात पारंपरिकपणे पुरुषांची मक्तेदारी असल्याची दिसून येते.भारतासारख्या देशात आजही महिलांना घराबाहेर जाण्याची परवानगी दिल्या जात नाही. महिलांचे काम फक्त चूल आणि मूल हे एवढेच असल्याची भारतीय लोकांची जी काही मानसिकता आहे त्या मानसिकतेच्या पोटी काही समूहामध्ये महिलांना घराबाहेर जाऊ दिल्या जात नाही. तसेच परपुरुषांशी बोलणे हे सुद्धा भारतीय समाजामध्ये काही ठिकाणी निषेधार्य मांणले जाते. एकंदरीत राजकाकीय क्षेत्र म्हटले की इतर लोकांशी संबंध येतात. ते संबंध काही कुटुंबाला मान्य नसतात त्यामुळे महिलांनी केवळ घरातीलच कामे करावी ही जी काही पुरुषी मानसिकता आहे त्या मानसिकतेमुळे राजकारणात पुरुषांची मक्तेदारी वाढलेली आहे. परंतु स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये देशात ५० टक्के महिलांना आरक्षण दिल्यामुळे आज महिला लोकप्रतिनिधींची संख्या वाढत जरी असली तरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना स्वतंत्ररित्या काम करू दिल्या जात नाही ही एक मोठी शोकांतिका महिलांच्या बाबतीत म्हणावी लागेल. आज भारतात महिला उमेदवारांना उमेदवारी दिली जाते, काही निवडूनही येतात आणि जबाबदारीचे पद मिळवतात; पण व्यापकदृष्टीने पाहता, सामाजिक पातळीवर मात्र, राजकीय सत्ता पुरुषी वर्चस्वाखाली असल्याचे दिसते. तसेच महिलांना राजकारणात येण्यासाठी आर्थिक पाठबळांचा अभाव, शिक्षणाची निम्न पातळी, राजकीय सामाजीकरणाचा अभाव, राजकीय माहिती महिलांपर्यंत न पोहोचणे, राजकारणावर कुटुंबात चर्चा न होणे, राजकारणात महिलांना आत्मसन्मान न देणे, महिलांच्या अधिकारपदाचा गैरवापर करणे, राजकीय वारशाचा अभाव,मोठ्या कौटुंबिक जबाबदाऱ्या इ. कारणामुळे महिलांना राजकीय सहभागापासून व त्यांच्या अधिकारांपासून वंचित राहावे लागते.

**महिलांचा राजकीय सहभाग वाढवण्यासाठी उपाय योजना:**

राजकीय पक्षांतील पदांमध्ये महिलांना आरक्षण देण्याचा विचार ही आता करायला हवा. पक्षीय राजकारणातील पक्षांतर्गत पदाधिकाऱ्यांच्या मांडणीमध्ये सुद्धा महिला पदाधिकाऱ्यांची उणीव आपल्याला दिसून येत असली तरीही आज अनेक राजकीय पक्षांमध्ये महिला आघाडी कार्यरत असल्याचे आपल्याला दिसून येते.

राजकीय पक्षांनी महिलांसाठी विशेष शाखा स्थापन केल्या आहेत जे त्यांच्या प्रगतीमध्ये योगदान देऊ शकतात. ही यंत्रणा महिलांना सक्रिय होण्यासाठी, राजकीय कौशल्ये शिकण्यासाठी आणि पक्षांतर्गत नेटवर्क विकसित करण्यासाठी एक मार्ग प्रदान करू शकते. महिला शाखा अनेकदा पक्षाच्या पदांवर प्रभाव टाकू शकतात, पक्ष नेतृत्व आणि निर्णय घेणाऱ्या संस्थांशी थेट जोडले गेल्यास महिला सर्वात प्रभावी ठरतील. त्यामुळे प्रत्येक राजकीय पक्षाने महिला आघाडी ही सक्षम करायला हवी.

पक्षाच्या अंतर्गत पदाधिकाऱ्यांच्या उतरंडीपासून अनेकदा महिला दूरच राहिलेल्या दिसतात. मात्र विविध राजकीय पक्षांशी निगडित असलेल्या महिला आघाडीचा उपयोग सामाजिक उपक्रम आणि मोहिमांसाठी केला जातो. म्हणून सामाजिक उपक्रमांमध्ये अग्रेसर असलेल्या महिलांना पक्षांतर्गत चौकटीमध्ये आणण्याचा मोठ्या प्रमाणात प्रयत्न करणे गरजेचे आहे.

महिलांचा राजकीय सहभाग वाढवण्याचे एकमेव साधन म्हणजे राजकीय पक्ष हा आहे. लोकशाहीतील निवडणुकांसाठी बहुतेक उमेदवार हे त्यांच्या नामनिर्देशनासाठी पक्षांवर अवलंबून असतात, कारण राजकारणात यशस्वी होण्यासाठी त्यांना पक्षाचा आधार, निवडणूक प्रचारादरम्यानची मदत, आर्थिक संसाधने इत्यादींची मदत लागताना आपल्याला दिसून येते.त्यामुळे राजकारणात प्रवेश करू इच्छिणाऱ्या महिलांनी सहसा राजकीय पक्षांकडे वळले पाहिजे.

महिलांच्या राजकीय सहभागासाठी आराखडा तयार करण्यासाठी राजकीय पक्ष हे महत्त्वाचा दुवा आहेत त्यामुळे प्रत्येक राजकीय पक्षांनी महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी राजकीय सहभागाचा राष्ट्रीय पातळीवरील आराखडा हा जाहीर करून त्याला कायदेशीर मान्यता द्यावी.

राजकीय पक्ष ज्या प्रमाणात महिलांना नेतृत्व पदावर पदोन्नती देण्याचा प्रयत्न करतात आणि पक्षाच्या उमेदवार म्हणून महिलांची नेमणूक करतातील तेव्हाच महिलांच्ये आर्थिक राजकीय सामाजिक प्रश्न सुटू शकतील यासाठी पक्षांतर्गत लोकशाही आणि स्त्री पुरुष समानतेचे तत्व हे प्रत्येक राजकीय पक्षांनी आत्मसात केले पाहिजे.

महिलाना निवडून आणण्याचा खात्रीलायक सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे पक्षाच्या उमेदवारांच्या याद्या लिंग संतुलित असणे किंवा त्यात महिलांचे विशिष्ट प्रमाण समाविष्ट करणे आवश्यक आहे.

प्रसार माध्यमे, प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक माध्यमे, समाज माध्यमे हे निवडणुकीबद्दल मतदारांची आवड आणि दृष्टिकोन निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. एकंदरीतच प्रसारमाध्यमे महिलांचे चित्रण कशाप्रकारे करतात यावर महिलांचे व्यक्तिमत्व ठरताना आपल्याला दिसून येते. त्यामुळे प्रसारमाध्यमे हे प्रभावी मतदार शिक्षण देण्याचे

माध्यम असल्यामुळे माध्यमांचा महिलांच्या जडणघडणीत खूप मोठा वाटा आहे. त्यामुळे प्रसारमाध्यमांची भूमिका ही महिलांच्या राजकीय नेतृत्वाबाबत व राजकीय सहभागाबद्दल जागरूक असली पाहिजे.

निवडणूक व्यवस्थापन संस्थांच्या सदस्यत्व आणि कर्मचाऱ्यांकरिता महिलांसाठी प्रत्येक राजकीय व्यवस्थेमध्ये प्रत्येक राजकीय पक्षाने आणि प्रशासनाने काही जागा राखीव ठेवाव्यात.

राजकीय पक्षांना त्यांच्या उमेदवारांच्या यादीत महिलांचे लक्षणीय प्रमाण समाविष्ट करणे आवश्यक आहे.

कायदे, निवडणूक प्रणालीबद्दल महिलांना सल्ला द्या ज्यामुळे निवडणूक प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढू शकेल.

महिलांचा राजकीय सहभाग वाढवण्यासाठी महिला प्रशिक्षण वर्ग भरवणे गरजेचे आहे. महिला प्रशिक्षण वर्गातून नेतृत्व गुण विकसित केले जावेत.

महिलांच्या राजकीय सहभागाचे आणि लैंगिक संवेदनशीलतेचे महत्त्व सांगण्यासाठी राजकीय पक्ष, पत्रकार, सुरक्षा दल आणि इतरांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.

महिलांमध्ये परस्पर-पक्षीय सहकार्य प्रस्थापित करण्यात आणि समर्थन करण्यास सहकार्य करण्याची गरज ही समाजाला आहे.

पदावर निवडून आलेल्या महिलांना त्यांच्या नवीन भूमिकांमध्ये अधिक प्रभावीपणे कार्य करण्यास व सक्षम करण्यासाठी त्यांना समर्थन आणि प्रशिक्षण दिले पाहिजे.

राजकीय पदासाठी इच्छुक महिला ह्या समाजाला ओळखता आल्या पाहिजे.

महिला सक्षमीकरणासाठी कायदेमंडळातील बदलांसाठी लॉबी सक्षम असली पाहिजे.

### ४.३.४ दलितांचा निवडणूक प्रक्रियेतील सहभाग:

निवडणूक प्रक्रियेतील सहभाग आणि प्रभाव पाहता भारतीय राजकारणामध्ये जात हा अत्यंत महत्त्वाचा राजकीय प्रक्रियेतील घटक आहे. देशात असलेली जातीय व्यवस्था आणि त्या जातीय व्यवस्थेतील विषमतेमुळे सत्तेचे वाटप आणि निवडणूक प्रक्रियेतील सहभाग हा सुद्धा देशात विषम असल्याचे आपल्याला दिसून येते. एकंदरीतच भारतीय स्वातंत्र्यानंतरही भारतातील अनेक कनिष्ठ जातींना राजकीय सत्तेपासून वंचित राहावे लागले आहे. देशातील जे काही उच्च जाती समूह आहेत त्या जाती समूहानी आपल्या जातीच्या आधारावर सत्तेतील प्रभावीपणे जास्तीत जास्त वाटा मिळवला आहे. त्यामुळे निवडणुका,जात आणि वेगवेगळ्या जाती समूहाचा निवडणुकातील सहभाग पाहता देशातील निवडणुकांवर जातींचा आणि वेगवेगळ्या समूहाचा मोठा प्रभाव राहिल्याचे आपल्याला दिसून येते.एकंदरीत देशातील निवडणुकांचे जर आपण राजकारण पाहिले तर आजच्या काळामध्ये जातीय व्यवस्था ह्या दबावगटाच्या माध्यमातून पुढे येत आहेत.वेगवेगळे जाती समूह त्या दबावगटाच्या माध्यमातून आपले राजकीय हितसंबंध साधताना आपल्याला दिसतात.भारतीय समाजातील उच्च

जातींचे हितसंबंध आणि कनिष्ठ जातींचे हितसंबंध पाहता यामध्ये मोठ्या प्रमाणात भेद आहे हे महात्मा फुले यांनी मांडले. छत्रपती शाहू महाराजांनी ही कनिष्ठ जातींनी राजकीय सत्ता संघर्षात सत्तेसाठी पुढे आले पाहिजे हा मुद्दा मांडला. पुढील काळात बाबासाहेब आंबेडकरांनी मुख्यतः दलित जातींच्या राजकीय हक्काच्या मुद्दा पुढे आणून दलितांमध्ये राजकीय जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. एकंदरीतच समाजातील अस्पृश्यतेचा मुद्दा, राजकीय हक्क व त्या हक्काची परिपुर्ततेसाठी कनिष्ठ जातींच्या लढ्यावर आणि त्याच्या मुक्तीवर फुले, शाहू, आंबेडकर, वि.रा शिंदे,गोपाळ बाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळेनी मोठ्या प्रमाणात कार्य केले आणि इथूनच खऱ्या अर्थाने कनिष्ठ जातीच्या राजकारणाला देशात काही प्रमाणात सुरुवात झाल्याचे आपल्याला दिसून येते.

देशात एकूण लोकसंख्येच्या १६ टक्क्यांहून अधिक दलित आहेत.भारतातील जवळपास १०० दशलक्ष दलित किंवा त्यांच्या एकूण संख्येपैकी एक तृतीयांश दलित आजही दारिद्र्यात जगत आहेत.वास्तविक पाहता स्वातंत्र्यानंतरच्या काळातही दलितांना मिळालेल्या घटनात्मक अधिकारामुळे समाजात काही अंशी त्यांना मानसन्मान हा मिळाला असला तरी सुद्धा आजही दलित हे राजकारणापासून वेगळे पडताना आपल्याला दिसून येतात.स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात देशभरातील दलितांसाठी काँग्रेस हा पर्याय असला तरीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखे नेतृत्व हे दलितांच्या सोबतीला होते.त्यांनी सत्ता, अधिकारामध्ये वंचितांची संख्या ही सर्वात कमी आहे त्यामुळे अत्याचारित आणि उपेक्षित लोकांसाठी त्यांनी सन्माननीय अस्तित्वाचा मार्ग हा राज्यघटनेच्या माध्यमातून स्पष्ट केला. सोबतच बाबू जगजीवन राम यांचेही नाव अधोरेखित करावे लागते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राजकीय सत्तेतील महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्व म्हणून बाबू जगजीवन राम यांच्याकडे पाहिले जाते. ज्यांनी उपेक्षित लोकांच्ये प्रश्न सातत्याने मांडले. सर्वात जास्त काळ खासदार म्हणूनही त्यांनी आपली कारकीर्द गाजवली. म्हणून स्वातंत्र्यानंतर दलित राजकारण प्रामुख्याने आंबेडकर आणि जगजीवन राम यांच्याभोवती केंद्रित होते, असे मानणे अयोग्य ठरणार नाही. एकंदरीतच आज दलित राजकारण आणि दलित नेतृत्वाचा सत्तेतील सहभाग पाहता आज दलित नेतृत्व सत्तेमधील आपला वाटा मिळवण्यात यशस्वी झाले असले तरी मात्र त्या दलित नेतृत्वाच्या माध्यमातून दलित समाजाचा विकास किती झाला हा प्रश्न मात्र अधोरेखित होतो. आज दलितांचा राजकारणातील सहभाग पाहता प्रत्येक राजकीय पक्ष दलित समाजाचे भांडवल करून आपली राजकीय पोळी भाजताना दिसून येतात. वास्तविक पाहता दलित समाजाच्या राजकीय अशा आकांक्षा पाहता दलित समाजांकडे आज केवळ राजकीय भांडवल याच दृष्टिकोनातून पाहिल्या जाते त्यामुळे दलितांचा राजकारणातील सहभाग हा कोणत्या दिशेने चालला आहे, हे समजून घेण्यासाठी दलितांच्या राजकीय अभिव्यक्तीचा मार्ग समजून घेणे अत्यावश्यक ठरते.

संपूर्ण भारतात दलित समाजाच्या राजकारणाला दिशा आणि गती देण्याचं काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखन आणि राजकीय भूमिकांमुळे झाले. अस्पृश्य समाजाला समान अधिकार मिळाले पाहिजे या दृष्टिकोनातून त्यांनी सुरुवातीपासूनच भर दिला. दलित समाजाला स्वतंत्र प्रतिनिधीत्वाची आग्रही भूमिका आंबेडकरांनी सुरुवातीच्या काळात मांडली. अस्पृश्यांना सामाजिक व राजकीय दृष्टिकोनातून जागृत करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २०जुलै १९२४ ला बहिष्कृत हितकरणी सभा नावाची एक संघटना स्थापन केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राजकीय भूमिका घेताना स्वतंत्र मजूर पक्षाची १५ ऑगस्ट

१९३७ ला स्थापना केली त्यातून दलित, शेतमजूर आणि कष्टकरी यांना उचित न्याय मिळाला पाहिजे हा त्यामागचा हेतू होता.तसेच दलित समाजाच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आंबेडकरांनी १९४२ मध्ये शेड्युल कास्ट फेडरेशनची ही स्थापना केली. आंबेडकरांच्या मृत्यूनंतर ३ऑक्टोबर १९५७ ला रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्यात आली. रावबहादुर .एन.शिवराज यांची रिपब्लिकन पक्षाच्या अध्यक्षपदासाठी नेमणूक करण्यात आली.रिपब्लिकन पक्ष आणि निवडणूक याचा सहसंबंध पाहता १९५७ च्या निवडणुकीपूर्वी बाबासाहेब आंबेडकरांचा रिपब्लिकन पक्ष स्थापन करण्याचा विचार होता. परंतु त्यांच्या महापरिनिर्वानामुळे ते शक्य झाले नाही म्हणून १९५७ची सार्वत्रिक निवडणूक ही शेड्युल कास्ट फेडरेशनच्या नावावर लढवण्यात आली.

रिपब्लिकन पक्षाने १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये लोकसभेसाठी जवळपास ६९ उमेदवार दिले होते. त्यापैकी त्यांचे बी.पी मौर्य अलीगड, मुजफ्फर हुसेन मोरादाबाद, ज्योती स्वरूप हथरस हे उत्तर प्रदेशातून तीन उमेदवार विजयी झाले होते. १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाने जवळपास ७२जागा लढवल्या होत्या. परंतु रिपब्लिकन पक्षाचे उत्तरप्रदेशमधील अकबरपुर लोकसभा मतदारसंघातून श्री रामजी राम हेच एकमेव उमेदवार निवडून आले होते. १९७१च्या लोकसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाने व रिपब्लिकन पक्षाच्या वेगवेगळ्या गटांनी २९ उमेदवार उभे केले होते.त्यापैकी महाराष्ट्रातील पंढरपूर लोकसभा मतदारसंघातून एन. एस कांबळे हे एकमेव उमेदवार निवडून आले होते. १९७७ च्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीतही रिपब्लिकन पक्षाचे वेगवेगळे गट हे लोकसभा निवडणुकीला सामोरे गेले. निवडणुकीत मात्र रिपब्लिकन पक्षाचे खोब्रागडे गटाचे कचरूलाल हेमराज जैन बालाघाट, मध्य प्रदेश आणि डी.सी गवई बुलढाणा, महाराष्ट्र हे दोन उमेदवार निवडून आले होते. एकंदरीतच रिपब्लिकन पक्षाला लागलेली फुटीरतेची कीड लक्षात घेता रिपब्लिकन पक्षाचे प्राबल्य असूनही रिपब्लिकन पक्ष निवडणुकांच्या राजकारणात यशस्वी होऊ शकला नाही ही वस्तुस्थिती आहे. आज रिपब्लिकन पक्षाच्या राजकारणाची पार्श्वभूमी तपासताना रिपब्लिकन पक्ष अनेक गटातटात विभागलेला गेलेला आहे.रिपब्लिकन नेते आपल्या स्वार्थासाठी आज कोणत्याही राजकीय पक्षाशी आज युती करताना दिसून येतात. रिपब्लिकन पक्षाची विचारधारा इतर पक्षाची जुळत नसतानाही राजकीय सत्तेच्या सारीपाठांमध्ये सत्तेचा काही भाग आपल्याला मिळेल या उद्देशाने रिपब्लिकन राजकीय नेतृत्व आज वाटचाल करीत आहे. एकंदरीतच रिपब्लिकन राजकारणाची वस्तुस्थिती तपासताना रिपब्लिकन पक्षाचे गट ज्या राजकीय पक्षासोबत युती करतात त्या राजकीय पक्षांना दलित समूहाच्या एक गठ्ठा मतदानाचा मोठा फायदा होतो.परंतु त्या राजकीय पक्षांचा फायदा रिपब्लिकन गटांच्या उमेदवारांना होत नाही ही वस्तुस्थिती आहे. ज्या ज्या ज्या वेळी रिपब्लिकन पक्षात एक्य झाले त्यावेळी रिपब्लिकन पक्षांने निवडणुकीत आपला चांगला प्रभाव दाखवला आहे.१९९६ मध्ये काँग्रेस पक्षासोबत युती केलेली असताना रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्रातून चार खासदार निवडून गेले होते.रिपब्लिकन पक्षाच्या राजकारणाच्या निवडणुकीतील सहभागाची पार्श्वभूमी तपासून घेताना रिपब्लिकन पक्षाच्या गटाच्या नेतृत्वाच्या वेगवेगळ्या भूमिका आहेत. एकंदरीतच रिपब्लिकन नेतृत्वाला देशामध्ये पर्यायाने महाराष्ट्रामध्ये कोणताही आपला हक्काचा मतदारसंघ निर्माण करता आला नाही, त्याला अपवाद प्रकाश आंबेडकर हे आहेत त्यांनी अकोला हा मतदारसंघ स्वतःसाठी बांधून ठेवलेला आहे. परंतु त्यांनाही त्या मतदारसंघातून ज्याप्रमाणे यश मिळायला पाहिजे त्या प्रमाणात यश

मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. एकंदरीतच रिपब्लिकन पक्षाच्या राजकारणाची भूमिका पाहता सत्तेच्या सारी पाठांमध्ये रिपब्लिकन पक्षाला सुरुवातीपासूनच विघटनाची आणि ऐक्याची परंपरा लाभलेली आहे.त्यामुळे रिपब्लिकन पक्षात अनेक वेळा विघटन झालेले आहे तसेच अनेक वेळा ऐक्याचे प्रयत्न ही झाल्याचे आपल्याला दिसून येतात.तसेच महाराष्ट्रात दलित पँथर या संघटनेच्या माध्यमातूनही दलितांच्या अस्मिता जोपासण्याचा व राजकीय सहभाग वाढवण्याचा प्रयत्न झालेला आहे.

१९८० पासून उत्तर प्रदेशांमध्ये दलितांमध्ये राजकीय चेतना जागृत होऊन आणि सक्षम चळवळींचा उदय झाला.या काळात भारतीय जनता पक्ष आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस सारखे राष्ट्रीय पक्ष उत्तर प्रदेश मध्ये आपला प्रभाव पाडू शकले नाही. म्हणून सामाजिक न्यायाचा समर्थन करणारा पक्ष म्हणून बहुजन समाज या पक्षाची स्थापना मा. काशीरामजी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली करण्यात आली. स्वाभिमान आणि प्रतिष्ठा या मुद्द्यांना अधोरेखित करून बसपाने काही काळ उत्तरप्रदेश मध्ये प्रभावी राजकारण करून दलितांना राजकारणामध्ये मोठ्या प्रमाणात वाटा मिळवून देण्याचे काम प्रामुख्याने केले आहे. काशीरामजीच्या निधनानंतर बहुजन समाज पक्षाचे नेतृत्व हे मायावतीकडे आले. मायावतीने ही सत्तेच्या सारीपाठात उजवी विचारसरणी असलेल्या भाजपसोबत युती करूनही काही वेळा सत्ता मिळवलेली आहे. परिणामी दलित मतदार दूर गेला. कालांतराने मायावतीने स्वतःच्या क्षमतेवरही उत्तरप्रदेश मध्ये आपली राजकीय सत्ता स्थापन केली. परंतु कालांतराने उत्तरप्रदेश मधील वाढत्या राजकीय सत्ता स्पर्धेच्या स्पर्धेत मायावती यांचा टिकाव लागणे शक्य झाले नाही म्हणून मायावती यांनी पुढील राजकारणामध्ये समाजवादी पार्टीशी युती केली परंतु त्यांनाही त्या ठिकाणी यश मिळाले नाही. कालांतराने उत्तर प्रदेश सारख्या प्रभावी राज्यात भाजपचा प्रभाव वाढत गेला परिणामी सत्तेच्या सारीपाटात पुढे असलेले बसपा सारखे दलित राजकारण करणारे पक्ष पाठीमागे पडले एकंदरीतच अलीकडील काळात उत्तरप्रदेश मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत बसपाचे अस्तित्व संपुष्टात आलेले आहे.

समकालीन राजकारणात देशातील दलित चळवळीचे आणि राजकारणाचे विश्लेषण केल्यास एक विरोधाभास समोर येतो. तो म्हणजे आज दलितांचे राजकीय पक्ष हे निवडणुकीत सहभागी होत असले तरीसुद्धा दलितांचा जो काही मताचा टक्का आहे तो टक्का मात्र आज दलितेतर पक्षांकडे गेलेला आहे हे मात्र नक्की आहे. त्यामुळे आज दलित चळवळीची एकता आणि ताकद काही प्रमाणात कमी झाली आहे. देशातील अलीकडील काळातील काही घटना लक्षात घेता दलितांवरील अत्याचारांचे प्रमाण वाढलेले आहे हे दिसून येते. त्यातूनच अत्याचारांवरील तीव्र प्रतिक्रिया म्हणून उत्तर प्रदेशमध्ये भीम आर्मी सारख्या संघटनेच्या माध्यमातून नवीन दलित नेतृत्व उदयास येत आहे. सोबतच गुजरात मधील जिग्नेश मेवाणी, महाराष्ट्रातील प्रकाश आंबेडकर यांची वंचित बहुजन आघाडी (शोषित बहुजनांची युती) शिक्षित पिढी आणि ग्रामीण भागातील लहान दलित गटांना एकत्र येण्याचे आवाहन करताना आपल्याला दिसून येतात.

एकंदरीतच दलित राजकारणाचा आणि दलितांचा निवडणुकीतील सहभाग पाहता जे मतदारसंघ राखीव आहेत त्या मतदार संघात दलित नेतृत्वाला वेगवेगळ्या राजकीय पक्षाकडून मोठ्या प्रमाणात संधी मिळत आहे. निवडणुकातील दलितांचा जर सहभाग पाहिला तर निवडणुकातील दलितांचा सहभाग हा केवळ आणि केवळ मते देण्यापुरताच आहे. आज

दलित समाजाचे नेते आपल्या समाजाची एक गठ्ठा मते विकण्यात गुंग झाल्याचे दिसून येतात. त्यामुळे दलितांना राखीव जागा शिवाय इतर कोणत्याही ठिकाणी दलित नेतृत्वाचा टिकाव लागू शकत नाही. त्यामुळे दलितांचा निवडणुकीतील सहभाग हा केवळ आणि केवळ नाममात्रच राहताना आपल्याला दिसून येतो. त्यामुळे दलित समूहामध्ये क्षमतावान असलेले दलित नेतृत्व हे विकसित होऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे.

### ४.३.५ आदिवासींचा निवडणूक प्रक्रियेतील सहभाग:

भारतीय राजकारणातील प्रवाहात लोकांचे दोन गट आपल्याला पहावयास मिळतात. एक म्हणजे वर्चस्ववादी समूह आणि दुसरा म्हणजे वंचित समूह.भारतीय राजकारणाचे स्वरूप पाहता आज राजकारणातील वर्चस्ववादी असलेल्या समुदाय हा राजकीयदृष्ट्या वंचित समूहाला आर्थिक सामाजिक दृष्टिकोनातून नेहमीच अस्थिर करण्यात यशस्वी झालेला आहे.भारतातील सामाजिक-आर्थिक विकासातील सर्वात वंचित घटक म्हणून आज आदिवासी समुदायाकडे पाहिले जाते. आज भारताची लोकसंख्या १२१०८.५५ इतकी असून त्यामध्ये देशात आदिवासींची लोकसंख्या १०४५.४६ इतकी आहे त्याची प्रमाण हे ८.६ इतके आहे. तसेच महाराष्ट्र राज्याची ११२३.७४ असून त्यापैकी आदिवासींची लोकसंख्या १०५.१० इतकी आहे, त्याचे प्रमाण ९.३५ टक्के आहे. महाराष्ट्र राज्यात एकूण ४५ अनुसूचित जमाती असून त्यात प्रामुख्याने भिल्ल, गोंड, महादेव काळी, पावरा, ठाकुर, वारली यांचा समावेश आहे. यवतमाळ जिल्हयातील कोलाम, रायगड, ठाणे व पालघर जिल्हयातील कातकरी आणि गडचिरोली जिल्हयातील माडिया गोंड अशा तीन जमाती केंद्र शासनाने अदिम जमाती म्हणून अधिसूचित केलेल्या आहेत.राज्यात एकूण ३६ जिल्हे असून त्यापैकी धुळे, नंदुरबार, जळगांव, नाशिक, पालघर व ठाणे (सहयाद्री प्रदेश) तसेच चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपूर, अमरावती व यवतमाळ (गोंडवन प्रदेश) या पुर्वेकडील वनाच्छादित जिल्हयांमध्ये आदिवासींची संख्या मोठया प्रमाणात आहे.गेल्या दशकात देशात गरिबी कमी होत असताना, नुकत्याच प्रकाशित झालेल्या जागतिक बहुआयामी गरीबी निर्देशांक २०२१ नुसार, भारतात दारिद्र्यात असलेल्या समूहाचे प्रमाण पाहता अनुसूचित जमाती (ST), अनुसूचित जाती (SC), आणि इतर मागासवर्गीय (OBC) मध्ये सर्वाधिक आहे.

आदिवासी लोकांचा राजकीय सहभाग पाहताना देशातील सर्वात वंचित असलेल्या या समुदायातील राजकीय सहभागाचा प्रश्न हा गंभीर आणि चिंतन करायला लावणारा आहे. स्वातंत्र्याच्या प्राप्तीनंतर संविधानाने आदिवासींना काही विशेष अधिकार दिले आणि त्या विशेष अधिकाराच्या आधारावर आदिवासी राजकारणात सहभागी होताना आपल्याला दिसून येतात.राजकीयदृष्ट्या जागृत नसलेला व उदासीन असलेला समुदाय म्हणून आदिवासी समुदायाकडे बघितल्या जायचे.परंतु वर्तमान परिस्थितीमध्ये आदिवासींचा राजकीय सहभाग हा वाढताना दिसत असला तरी सुद्धा आदिवासी निर्णय प्रक्रियेतील सहभागावर अध्यापही प्रभाव टाकू शकले नाही ही वस्तुस्थिती आहे.आज राजकीय पक्षात भारतातील आदिवासी समुदायाची मते मिळविण्यासाठी मोठी स्पर्धा लागलेली आहे याकडेही आपल्याला लक्ष देणे गरजेचे आहे.आज आदिवासी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष प्रक्रियेद्वारे स्थानिक राजकारणात सहभागी होत आहेत.पेसा कायद्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणात आदिवासी समुदायांचा राजकीय सहभाग हा मोठ्या प्रमाणात वाढलेला

आहे.गेल्या काही वर्षांपासून भारतीय राजकारणाचे स्वरूप पाहता सर्वच राजकीय पक्ष आदिवासी विकासाच्या प्रश्नांवर ठाम आहेत. तसेच आदिवासी विकास हा अजेंडा त्यांच्यासमोर नेहमीच असतो परंतु प्रत्यक्ष मात्र कृती आणि युक्ती मध्ये मोठा फरक असल्याचे आपल्याला दिसून येते. आज प्रत्येक राजकीय पक्षांमध्ये आदिवासी सेल/विभाग आहेत. पण प्रत्येक राजकीय पक्षांच्या आदिवासी हा राजकारणाचा भाग आहे हे ही आपल्याला लक्षात घेण्यासारखे आहे.आज अनेक राजकीय पक्षांमध्ये खरे आदिवासी नेते नाहीत. कोणताही राजकीय पक्ष आदिवासींना राजकीय दृष्ट्या सक्षम होऊ देत नाहीत . सर्वच राजकीय पक्षांची ही स्थिती आहे. राजकीय पक्षांमधील आदिवासी हे केवळ कार्यकर्ते असतात. ते स्वतःसाठी किंवा लोकांसाठी बोलत नाहीत. तर आपल्या राजकीय पक्षांसाठी बोलतात . वेगवेगळ्या राजकीय पक्षांमध्ये पक्षांमध्ये काम करणाऱ्या आदिवासी नेत्यांनी आदिवासींच्या हिताचा सध्या त्याग केला आहे.आदिवासींचा सर्वांगीण विकास सरकारच्या कार्यक्रमावर आणि धोरणांवर अवलंबून असतो.त्यामुळे आदिवासींचा राजकीय सहभाग वाढवणे गरजेचे आहे.

आज आदिवासी नेते देखील भारतीय लोकशाहीच्या अस्मितेच्या राजकारणात सत्ताधाऱ्यांच्या हातातील बाहुले बनलेले आहेत.आदिवासी नेतृत्वांना निवडणुकीतील फायद्यांसाठी आदिवासी समुदायांना एकत्र करणे त्यांना सोयीचे वाटते.देशातील राजकारणातील प्रभावी राजकीय पक्षांमध्ये आदिवासी नेत्यांना फारच कमी महत्त्व दिल्या जाते.राजकीय पक्षांमधील आदिवासी नेते हे पूर्णपणे गैर-आदिवासी नेत्यांवर अवलंबून असतात.आदिवासी नेत्यांनी केवळ प्रचार करायचा आणि आपल्या समाजाची मते आपल्या राजकीय पक्षाला मिळवून द्यायची हा एक कलमी कार्यक्रम सध्या आदिवासींच्या संदर्भात देशात चाललेला आहे. वेगवेगळ्या राजकीय पक्षातील आदिवासी नेत्यांच्या आपण भूमिका पाहिल्या तर त्यांच्या भूमिका ह्या आदिवासी समाजासाठी मारक ठरणाऱ्या आहेत. म्हणून कोणत्याही राजकीय पक्षाच्या राजकीय भूमिकेतून विश्लेषण करताना कोणताही राजकीय पक्ष आदिवासींच्या हिताचे प्रतिनिधित्व करताना आपल्याला दिसत नाही.आदिवासींचे हित हे बिगर-आदिवासी हिताच्या आड येत असल्यामुळे आदिवासी नेतृत्व आदिवासींच्या हिताचे रक्षण करू शकत नाही. म्हणून आदिवासी नेतृत्वांचे राजकीय अस्तित्व बिगर गैर आदिवासींवर नेतृत्वावर अवलंबून आहे. कारण अनेक मतदारसंघात बिगर आदिवासी मतदारांची संख्या ही अधिक असते.म्हणूनच आदिवासी नेते हे तिकीट वाटपाच्या संदर्भात राजकीय पक्षांवर प्रभाव टाकू शकलेले नाहीत ही वस्तुस्थिती आहे.भारतातील समकालीन लोकशाही व्यवस्था स्वातंत्र्य, समानता, न्याय, समान हिताचा प्रचार आणि प्रसार या घटकांवर स्थापन झाली असतानाही समकालीन लोकशाही व्यवस्थेतील आदिवासी समुदायांच्या स्थितीचे परीक्षण, प्रभावी राजकीय सहभाग, शासन आणि प्रशासन यासाठी भारतीय संविधानाच्या पाचव्या अनुसूचीचा अभ्यास करणे आवश्यक आहे.पाचव्या अनुसूची अंतर्गत घटनात्मक तरतुदी असूनही आदिवासींच्या आवाजाकडे आज दुर्लक्ष केल्या जाते तसेच आदिवासींचा राजकीय आवाज हा आजही भारतीय लोकशाहीचा भाग मानल्या जात नाही, आदिवासी नेतृत्वाला आदिवासी महिला नेतृत्वांना जरी घटनात्मकदृष्ट्या राजकीय सहभागाच्या माध्यमातून पुरेसे प्रतिनिधीत्व दिले जात असले तरीही त्यांचा वेळोवेळी आवाज दाबण्याचे काम देशातील लोकशाही व्यवस्थेमध्ये राजकीय पक्ष करताना दिसतात.आदिवासींना एकदा राजकीय व्यवस्थेमध्ये स्थान मिळाल्यानंतर त्यांना हवंय

काय? अशी राजकीय पक्षांची भूमिका असल्यामुळे आज राजकीय पक्ष केवळ आदिवासींना वापरून घेताना आपल्याला दिसून येतात.

लोकसभेत ५४३ पैकी ४१जागा अनुसूचित जमातीसाठी राखीव आहेत. तसेच प्रत्येक राज्याच्या विधानसभेत आदिवासी समुदायासाठी विधानसभेच्या जागा राखीव आहेत. परंतु या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीचा जर आपण विचार केला तर असे लक्षात येते की ज्या जागा आदिवासींसाठी राखीव आहेत त्याच जागांवर आदिवासी निवडून येताना आपल्याला दिसून येतात. सर्वसाधारण जागेवर आदिवासी नेतृत्व निवडून येऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. पण ज्या राज्यामध्ये आदिवासी समाजाचे प्राबल्य आहे त्या ठिकाणी मात्र आदिवासी समुदायाचा राजकारणावर प्रभाव असल्याचे आपल्याला दिसून येते. त्यामध्ये प्रामुख्याने पूर्वेकडील राज्य, ओरिसा, झारखंड या राज्याचा आपल्याला विचार करावा लागतो. आज स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आदिवासी नेतृत्वाची संख्या जरी वाढत असली पण ती संख्या मात्र गुणात्मक स्वरूपाची नाही तर ती संख्यात्मक वाढ झालेली आहे हे आपल्याला लक्षात घेणे गरजेचे आहे.

आज आदिवासी समाजातील महिला नेतृत्व ही स्थानिक राजकारणामध्ये मोठ्या प्रमाणात पुढे येत आहे. परंतु आदिवासी महिला नेतृत्वांनाही स्थानिक पातळीवर काम करताना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यामध्ये प्रामुख्याने निरक्षरतेचे प्रमाण हे जास्त असल्यामुळे आदिवासी नेतृत्व, महिला नेतृत्व हे स्थानिक राजकारणावर आपला प्रभाव टाकू शकलेले नाही. एकंदरीतच आदिवासीच्या राजकारणातील सहभागाच्या ज्या काही कक्षा आहेत त्या कक्षा आरक्षणाच्या बाहेर येऊ शकलेल्या नाहीत ही वस्तुस्थिती आपल्याला नाकारता येत नाही. म्हणजेच जागा आरक्षित आहेत म्हणून निवडणुकीला उभे राहावे लागते ही जी काही आदिवासींची मानसिकता झालेली आहे ती मानसिकता सुद्धा आज बदलणे काळाची गरज आहे. त्यासाठी आदिवासी महिला नेतृत्वाला व आदिवासी नेतृत्वाला अधिकाधिक सामाजिक आणि राजकीय संपर्क आणि संबंध वाढवणे गरजेचे आहेत. त्यामुळेच त्याची वाटचाल सक्रिय राजकारणात गतिमान होईल. सोबतच आदिवासी नेतृत्व व महिला नेतृत्वाला आज चांगल्या शिक्षणाची गरज आहे. शिक्षणाच्या माध्यमातून त्यांचा आत्मविश्वास वाढेल व त्यामुळे ते आपले स्वतःचे प्रश्न स्वतः सभागृहात मांडण्याचा प्रयत्न करतील त्यातून आदिवासींच्या विकासाला हातभार लागेल. तसेच निवडून आलेल्या राजकीय नेतृत्वाला आवश्यक कौशल्य प्रदान करण्याचे शिक्षण देणे ही गरजेचे आहे. तसेच समाजामध्ये आदिवासी संदर्भातला जो काही संकुचित दृष्टिकोन आहे तो दृष्टिकोन काढून टाकून त्यांच्यामध्ये सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याची जबाबदारी ही समाजावर आहे. तेव्हाच तरच खऱ्या अर्थाने आदिवासींचा सहभाग हा राजकारणामधला वाढेल यात शंका नाही.

आज देशाच्या संविधानिक सर्वोच्च अशा राष्ट्रपतीपदावर द्रौपदी मुर्मू या आदिवासी महिला नेतृत्वाची निवड झाल्यामुळे आदिवासींच्या राजकीय आशा आकांक्षाचा आणि सहभागाच्या विचार करता व भारतीय राजकारणाचे स्वरूप पाहता आदिवासींसाठी ही एक आनंदात्मक आणि सकारात्मक बाब असल्याचे आपल्याला दिसून येते. भारताच्या संविधानिक सर्वोच्च राष्ट्रपती पदांवर एखाद्या आदिवासीची निवड होऊ शकते या प्रेरणास्तोत्रातून आदिवासी समुदायाचा राजकीय सहभाग वाढवण्यासाठी ही घटना नक्कीच हातभार लावेल यात शंका नाही.

### ४.३.६ अल्पसंख्याकांचा निवडणुकीतील सहभाग:

राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग १९९२ कायदा कलम 2 (c) अंतर्गत देशात अल्पसंख्याक समुदाय म्हणून अधिसूचित करण्यात आलेले समुदायामध्ये मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, बौद्ध, जैन आणि झोरास्ट्रियन (पारशी) यांचा समावेश करण्यात आला आहे.जनगणना २०११ नुसार देशातील एकूण लोकसंख्येच्या सुमारे १९.३% अल्पसंख्याक आहेत.देशात मुस्लिमांची लोकसंख्या १४.२%, ख्रिश्चन २.३ %, शीख १.७ %,बौद्ध०.७ %, जैन ०.४% आणि पारशी ०.०००६% आहे.

अल्पसंख्याक हा एक समाजशास्त्रीय गट आहे जो सामाजिक स्थिती, शिक्षण, रोजगार, संपत्ती आणि राजकीय शक्ती या बाबतीत प्रबळ गटच्या संदर्भात असामान्य आहे.लोकसंख्येचा एक भाग एखाद्या सामाजिक वांशिक गट,राष्ट्रीयत्व, धर्म आणि/किंवा संस्कृती,भाषिक काही वैशिष्ट्यांमध्ये इतरांपेक्षा वेगळा असतो त्या समूहाला अल्पसंख्यांक समूह या नावाने ओळखले जाते.

बहुतेक देशांमध्ये अल्पसंख्याकांना राजकीयदृष्ट्या फार कमी प्रतिनिधित्व मिळते, त्याला भारतही अपवाद नाही. एकंदरीतच राजकीय जीवनात सहभागी होण्यास सक्षम असतानाही, अल्पसंख्याकांना बहुसंख्यांकडून सार्वजनिक निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत, विचारात घेतल्या जात नाही. त्यामुळे अल्पसंख्याकांना बहुसंख्यांकांच्या विचाराने अधीन राहावे लागत असल्याने अल्पसंख्याक हे राजकीय वर्चस्व निर्माण करू शकत नाहीत.अशावेळी अल्पसंख्याकांची मतदान करण्याची, निवडणुकी दरम्यान उमेदवार बनण्याची किंवा अगदी राजकीय पक्ष तयार करण्याची क्षमता सक्रियपणे प्रतिबंधित होत असते. काही वेळा तर मतदार होण्यासाठी किंवा राजकीय पदावर निवडून येण्यासाठी परवानगी दिली जात नाही. परंतु लोकशाहीमध्ये प्रत्येक व्यक्तीच्या मताला समान अधिकार असल्यामुळे लोकशाहीत अल्पसंख्यांकही राजकीय प्रक्रियेत सहभागी होताना आपल्याला दिसून येतात.अल्पसंख्याकांना त्यांच्या राज्यात राजकीयदृष्ट्या सहभागी होण्याच्या क्षमतेमध्ये अनेकदा अडथळे येत असतात. परंतु काही राजकीय व्यवस्थेमध्ये अल्पसंख्यांकांना कायदेशीर मार्गाद्वारे त्यांच्या हक्काचे रक्षण करण्याची जबाबदारी ही त्या राज्यव्यवस्थेवर येऊन पडताना आपल्याला दिसून येते. त्यातूनच भारतीय संविधानामध्ये कलम २९ आणि ३० मध्ये सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क देण्यात आले आहेत.

भारतातील राजकीयदृष्ट्या सत्ता संघर्षाचा आणि सहभागाचा विचार करता बहुसंख्य हिंदू समुदाय आणि अल्पसंख्याक धार्मिक समुदाय यांच्यातील सत्ता संबंधांच्या रचनेतील स्वरूप पाहता मोठ्या प्रमाणात प्रचंड असमानता असल्याचे आपल्याला दिसून येते.भारतीय राज्यघटनेच्या धर्मनिरपेक्ष मूलतत्त्ववादी दृष्टीकोनाचा विचार करता व्यावहारिकदृष्ट्या आज बहुसंख्य सांप्रदायिक असलेल्या गटांच्या शक्तींना बळकटी देण्याचे काम या ठिकाणी मोठ्या प्रमाणात केले जाते. त्यातूनच आज धार्मिक दृष्टिकोनातून भारतीय राजकारणाचा विचार करणाऱ्या विचारसरण्या विकसित झाल्या त्यामुळे भारतातील धार्मिक अल्पसंख्याकांची असुरक्षा आज मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. एकंदरीतच भारतीय राजकीय व्यवस्थेचा आणि राजकारणाचा विचार करता आज देशात जो काही सांस्कृतिक, प्रखर राष्ट्रवादी विचार

पेटवला जातोय त्यातून राजकीय शक्ती स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या दृष्टिकोनाचा पराभव करताना आपल्याला दिसून येत आहेत.


आज भारतीय राजकारणातील अल्पसंख्याकांचा सहभाग पाहता मुस्लिम अल्पसंख्याक हा समुदाय भारतातील सर्वात मोठा धार्मिक अल्पसंख्याक आहे. त्यामुळे अल्पसंख्याकांचा राजकारणातील सहभाग पाहताना जैन, ख्रिश्चन, बौद्ध हे समुदाय अल्पसंख्याक ठरत असले तरीसुद्धा काही ठराविक ठिकाणी यांचे लोकप्रतिनिधी निवडून येताना आपल्याला दिसून येतात. शिख समुदायाच्या संदर्भात ज्यावेळेस आपण बोलतो त्यावेळेस या समुदायाचे अस्तित्व हे पंजाब या राज्यात मोठ्या प्रमाणात आढळून येते. शीख समुदायांमध्ये वेगवेगळ्या पंथांमध्ये राजकीय सत्तेचा संघर्ष या ठिकाणी आपल्या पाहायला मिळतो. त्यातून पंजाब या राज्यात देशात शीख समुदाय अल्पसंख्यांक असला तरी पंजाब मध्ये शिखांचा वेगवेगळ्या राजकीय पक्षातील राजकीय सहभाग आणि त्यांचे राजकीय पक्ष पाहता ते सत्ता स्थानी येताना आपल्याला दिसून येतात. त्यामुळे एकंदरीतच अल्पसंख्याकांच्या राजकारणाच्या राजकीय भूमिका स्पष्ट करताना या देशातील प्रभावी हिंदू आणि अल्पसंख्यांका मधला प्रभावी समूह मुस्लिम या दोन समुदायाच्या भोवतीच राजकीय केंद्रबिंदू फिरताना आपल्याला दिसून येतो. देशातील प्रत्येक राज्यामध्ये मुस्लिम समुदायाचे प्रमाण हे लक्षणीय स्वरूपाचे असल्यामुळे प्रत्येक मतदार संघात मुस्लिम मतदारांचा वाटा हा लक्षणीय स्वरूपाचा आहे. म्हणून ज्या उमेदवाराच्या पाठीमागे हा समुदाय उभा राहतो तो उमेदवार हा निश्चितपणे विजयी होतो हे आत्तापर्यंतचे सूत्र होते. याचा फायदा देशातील काही राजकीय पक्षांनी उचलला ही वस्तुस्थिती आहे. देशातील काही मुस्लिम बहुल भागातील मतदार संघाचा विचार करता काही मुस्लिम बहुल भागातून मुस्लिम उमेदवारच निवडून येताना आपल्याला दिसून येतात . परंतु मतदारसंघनिहाय निवडणुकीच्या राजकारणात मुस्लिम समुदायांला कोणतीही संधी नसल्याचे दिसून येते. आज देशात मुस्लिमांचे प्रतिनिधित्व करण्याचा दावा करणारे काही राजकीय पक्ष अस्तित्वात आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन, जमात-ए-इस्लामी, जमात-ए-इस्लामी हिंद, ऑल इंडिया मुस्लिम मजलिस इ. पक्षाच्या माध्यमातून सुद्धा मुस्लिम अल्पसंख्याक आपला राजकीय हक्क जागृत ठेवण्याचा प्रयत्न करताना दिसून येतात. म्हणजेच निवडणुकांच्या वेळी व आपल्या राजकीय हक्काच्या दृष्टिकोनातून जो राजकीय पक्ष आपल्या राजकीय भूमिका अवगत करेल त्या पक्षाच्या पाठीमागे उभे राहण्याची भूमिका ही मुस्लिम समुदायाची असते असे चित्र आपल्याला दिसून येते.त्यामुळे या राजकीय फायद्याचा विचार करता आणि राजकीय सत्ता प्राप्त करण्यासाठी या ठिकाणी बहुसंख्यांक आणि मुस्लिम समुदायांमध्ये सांप्रदायिक ध्रुवीकरण करण्याचा विचार आज देशात मोठ्या प्रमाणात केला जात आहे. आज देशात लोकशाही पद्धत स्वीकारल्यामुळे लोकशाहीत निवडणुकांना असलेले महत्त्व पाहता आज देशाची राजकीय परिस्थिती निवडणुकीच्या माध्यमातून बदलण्यासाठी या ठिकाणी सांप्रदायिकतेचे ध्रुवीकरण करण्यात राजकीय पक्ष या ठिकाणी यशस्वी होताना आपल्याला दिसून येतात. म्हणून लोकशाहीत

अल्पसंख्याक उपेक्षित नाहीत तर त्या लोकशाहीत अल्पसंख्यांकांच्या मताचा खेळ करून राजकीय सत्ता मिळवण्याचे साधन हा आज अल्पसंख्यांक समुदाय ठरताना आपल्याला दिसून येतो.

भारतीय राजकीय व्यवस्थेचा आणि राजकीय पक्षांचा विचार करता आज देशात भाजप हा उच्चभ्रू, हिंदू आणि सोबतच आदिवासी, ओबीसी समाजाचे पाठबळ मिळवताना आपल्याला दिसून येतो. एकंदरीतच एकेकाळी काँग्रेसचे पाठीराखे असलेले आदिवासी, मुस्लिम, दलित आज हे ही मतदार काही प्रमाणात भाजपकडे मोठ्या प्रमाणात वळताना आपल्याला दिसून येतात. म्हणजेच काँग्रेसच्या राजवटीत अल्पसंख्याकांना एक प्रकारची सवलत मिळते हा जो काही एक संदेश भाजपने पुढे आणला तो मतदारापर्यंत यशस्वीरित्या भाजप पोहोचवण्यात यशस्वी झाला आहे.त्यामुळे आज देशात मोठ्या प्रमाणात सांप्रदायकतेचे ध्रुवीकरण झालेले आपल्याला दिसून येते.वास्तविक पाहता आज भारतातील वेगवेगळ्या धर्माचे धार्मिक स्वरूप पाहता आज धर्माच्या आधारावर मते मिळवणे हा एक कलमी कार्यक्रम राजकीय पक्षांनी राबवलेला आहे त्यामध्ये अल्पसंख्यांक किंवा प्रभावी समाज ही यात पाठीमागे नाहीत.

एकंदरीतच अल्पसंख्यांकांचा निवडणुकीतील सहभाग पाहता सांप्रदायिक ध्रुवीकरणा सोबतच प्रबळ जाती समूहाची मते एका राजकीय पक्षाला जातात त्यावेळी अल्पसंख्यांकांची भूमिका काय असते? देशातील बहुपक्ष पद्धतीचे स्वरूप पाहता अल्पसंख्यांकाचे मत निवडणुकीत काही फरक पडू शकतात का? याचा विचार अल्पसंख्यांकाच्या राजकारणातील भूमिका/सहभाग तपासताना आपल्याला करावा लागतो.आज देशाच्या समकालीन राजकीय व्यवस्थेचा विचार करताना आज उजव्या विचारसरणीची मोठी चालती आहे आणि त्यासोबतच उजव्या विचारसरणीला विरोध करण्यासाठी आज अनेक ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारच्या युती आणि आघाड्या होताना आपल्याला दिसून येतात. युती आणि आघाडीच्या माध्यमातून आपला जो विरोधक आहे त्या विरोधकाला नामोहरण करण्याच्या संदर्भात अल्पसंख्यांक समूह त्यावेळी बहुसंख्यांकाच्या विरोधात आपली भूमिका मतपेटीतून वटवताना आपल्याला दिसून येतात. त्यामुळे अल्पसंख्यांकांच्या मताचा ज्यावेळेस आपण विचार करतो त्यावेळी अल्पसंख्यांकाची मते ही एक निर्णायक स्वरूपाची असतात आणि त्यावेळी अल्पसंख्यांक समूह त्या मतदारसंघाचा निर्णय फिरवण्याची क्षमता त्यांच्यामध्ये ठेवतात ही या अल्पसंख्यांकाच्या राजकारणातील सहभागाची महत्त्वाची भूमिका आपल्याला अधोरेखित करता येईल.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीचा विचार करता लोकसभेसाठी एकूण २७ मुस्लिम खासदार लोकसभेवर निवडून गेलेले आहेत.एकूण धार्मिक रचनेच्या दृष्टीने १७ लोकसभेत ९०.४% खासदार हे हिंदू आहेत.ज्यामुळे मुस्लिमांचे प्रतिनिधित्व ४.८% इतर धार्मिक अल्पसंख्याक, जसे की शीख आणि ख्रिश्चन ४% खासदारांचे प्रतिनिधित्व करतात.




आज अल्पसंख्याक समुदायाकडून त्यांच्या सामाजिक-सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरांवर ठाम राहण्याचा ज्यावेळी प्रयत्न होतो त्यावेळी त्यांना राजकीय पाठिंबा देण्याचा प्रयत्नही अनेक राजकीय पक्ष आपल्याला करताना दिसून येतात. तर अल्पसंख्यांक समुदायाचे आपल्याला मते मिळत नाहीत हा विचार डोक्यात ठेवून अल्पसंख्यांक समुदायाच्या सामाजिक सांस्कृतिक धार्मिक परंपराचा विरोध करण्यासाठी काही राजकीय पक्ष ही या ठिकाणी भूमिका घेताना आपल्याला दिसून येतात. त्यामुळे अल्पसंख्यांकांचा राजकारणातील सहभाग पाहता प्रबळ जाती समूहाच्या आधारावर अल्पसंख्यांकाचा होणारा छळ आणि त्यातून येणाऱ्या त्यांच्या हक्कांवर येणारी गदा पाहता अल्पसंख्याक राजकारण हे प्रबळ जाती समूहाच्या राजकीय पक्षांच्या विरोधात ठामपणे भूमिका घेताना आपल्याला दिसून येते. अल्पसंख्यांकाची होणारी राजकीय गळचेपी पाहता आज अल्पसंख्यांक नेतृत्वाने व्यावहारिक दृष्टिकोनातून निवडणुका लढवण्यावर भर दिला आहे. त्यामुळे आज देशात अल्पसंख्यांक समुदायाचा पाठिंबा मिळवण्यासाठी राजकीय पक्षांमध्ये मोठ्या प्रमाणात चढाओढ लागलेली दिसून येते. यातूनच आज देशात वेगवेगळ्या राजकीय आघाड्या युत्या निर्माण होताना आपल्याला दिसून येतात. त्यामध्ये प्रामुख्याने अल्पसंख्याक समाजाच्या हिताशी जे संबंधित आहेत किंवा ते आपल्याशी संवाद साधू शकतात अशा घटकांच्या पाठीशी अल्पसंख्यांक समूह उभे राहताना दिसून येतात. त्यामुळे आज अल्पसंख्यांक समूहाच्या मतांमध्ये फूट होताना दिसून येत नाही. एकंदरीतच आज अल्पसंख्यांक मताचा वाटा मिळवण्यासाठी प्रत्येक राजकीय पक्ष वेगवेगळ्या घोषणा करताना आपल्याला दिसून येतात वास्तविक पाहता या घोषणा तत्कालीन स्वरूपाच्या असतात त्यामुळे अल्पसंख्याक समूहाने आपले राजकारण करताना दीर्घकालीन कोणते परिणाम आपल्या समुदायावर होणार आहेत याचा विचार करून आपल्या राजकीय भूमिका ह्या पुढे नेल्या पाहिजे तरच अल्पसंख्यांकांचा राजकारणातील सहभाग हा वाढेल यात शंका नाही.

**सारांश:**

देशातील प्रबळ राजकीय समूहाने दलित, महिला, अल्पसंख्यांक, आदिवासी यांना कायमच उपेक्षित ठेवलेले आहे. त्यामुळे राजकारणातील वंचित समूहाचा राजकीय सहभाग पाहताना त्यांच्या राजकीय सहभागाचे प्रमाण काही अंशी वाढत असले तरी ते भारतीय लोकशाहीच्या दृष्टिकोनातून चिंतनीय स्वरूपाचे आहे. त्यामुळे जोपर्यंत लोकशाहीत वंचित समूहाचा राजकीय प्रक्रियेतील सहभाग वाढत नाही तोपर्यंत लोकशाहीचे सामाजिकीकरण होणार नाही. यासाठी देशातील वंचित समूहाने आपल्या राजकीय हक्कासाठी आता जागृत होण्याची वेळ आलेली आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. भारतातील निवडणूक सहभाग या विषयी माहिती सांगा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

२. महिलांचा निवडणुकीतील सहभाग याविषयी माहिती लिहा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**अधिक वाचनासाठी संदर्भ**


कपूर, एस आणि ए मॅगेसन. (2020), 'भारतातील प्रादेशिकता आणि आदिवासी असुरक्षितता', SSRN ऑनलाइन जर्नल्स.

अलोन्सो सोनिया आणि रुबेन रुइझ-रुफिनो (2007), "नवीन लोकशाहीमध्ये राजकीय प्रतिनिधित्व आणि वांशिक संघर्ष", युरोपियन जर्नल ऑफ पॉलिटिकल रिसर्च.

विमर अँड्रियास, लार्स-एरिक सेडरमन आणि ब्रायन मिन (2009), "जातीय राजकारण आणि सशस्त्र संघर्ष: नवीन जागतिक डेटा सेटचे कॉन्फिगरेशनल विश्लेषण", अमेरिकन समाजशास्त्रीय पुनरावलोकन.

सेडरमन लार्स-एरिक, अँड्रियास विमर आणि ब्रायन मि (2010), “वांशिक गट बंड का करतात? नवीन डेटा आणि विश्लेषण", जागतिक राजकारण.

https://eci.gov.in/

https://www.epw.in/engage/article/electoral-alliances-and-majority-versus-minority

https://scroll.in/article/925440/verdict-2019-in-charts-and-maps-nearly-half-of-indias-muslim-mps-come-from-only-two-stateshttps://www.loksatta.com/lokprabha/women-career-in-politics-393896/

❄❄❄❄❄❄❄